41 वा वर्धापन दिन

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

४१ वा वर्धापन दिन

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, ५ ऑगस्ट २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २६७ | पाने १२+१२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com





सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## भागलपुरातील अपघातात पाच कावडधारींचा मृत्यू

◆ **भागलपूर, ४ ऑगस्ट**

रस्त्याच्या बाजूला असलेल्या पाणी भरलेल्या खड्ड्यात वाहन कोसळून झालेल्या झालेल्या अपघातात पाच कावडधारींचा मृत्यू झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. हा अपघात रविवारी रात्री शाहकुंड परिसरात झाला, असे उपविभागीय न्यायदंडाधिकारी विकास कुमार यांनी सांगितले.

मृत्युमुखी पडलेले सर्व कावडधारी स्थानिक होते आणि ते शेजारच्या बांका जिल्ह्यातील मंदिरात चालले होते. वाहन उच्च दाबाच्या तारेच्या संपर्कात आल्यानंतर विजेचा धक्का बसल्याने कावडधारींचा मृत्यू झाल्याच्या वृत्ताचे खंडन कुमार यांनी केले. स्थानिक रहिवाशांनी संतापाने निदर्शने केली आणि रस्त्यावरील वाहतूक रोखली. परंतु, संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन त्यांना शांत केल्यानंतर वाहतूक पूर्ववत झाली, असे त्यांनी सांगितले.

राज्य सरकारच्या धोरणानुसार प्रत्येक मृताच्या नातेवाईकांना सानुग्रह अनुदान मिळेल. शोकाकूल कुटुंबातील सदस्यांकडून कोणतीही औपचारिक तक्रार आल्यास संबंधित पोलिस ठाण्यातही त्यांची नोंद केली जाईल आणि त्यानंतर योग्य ती कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# पहलगामचे हल्लेखोर पाकिस्तानीच

**● सुरक्षा दलांनी गोळा केले पुरावे ● दाचिगाम जंगलात उडाली होती चकमक**

◆ **श्रीनगर, ४ ऑगस्ट**

पहलगाममध्ये भीषण दहशतवादी हल्ला करणारे हल्लेखोर पाकिस्तानी नागरिक असल्याचे पुरावे सुरक्षा यंत्रणांनी गोळा केले आहेत. यामध्ये पाकिस्तान सरकारने जारी केलेले दस्तावेज आणि बायोमेट्रिक डाटाचा समावेश आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. सुलेमान, अफगाण आणि जिब्रान, अशी ठार झालेल्या दहशतवाद्यांची नावे आहेत.

२८ जुलै रोजी श्रीनगरच्या बाहेरील दाचिगाम जंगलात 'महादेव' नावाच्या कारवाईत सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत लष्कर-ए-तोयबाच्या वरिष्ठ दहशतवाद्यासह तीन जणांना सुरक्षा दलाने कंठस्नान घातले होते. २२ एप्रिल रोजी पहलगामच्या बैसरन येथे झालेल्या हल्ल्यानंतर ते दाचिगाम-हारवन जंगलात लपून बसले होते. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता.



ऑपरेशन महादेव अंतर्गत ठार झालेले दहशतवादी

या हल्लेखोरांसोबत कोणताही स्थानिक अतिरेकी नव्हता, असे गोळा केलेल्या पुराव्यातून सिद्ध झाले असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. पाकिस्तानच्या राष्ट्रीय डेटाबेस आणि नोंदणी प्राधिकरणाचे (एनडीआरए) बायोमेट्रिक रेकॉर्ड, मतदार ओळखपत्रे आणि डिजिटल सॅटेलाईट फोन डेटा, ज्यात लॉग आणि जीपीएस वे-पॉईंट्सचा समावेश आहे, हे तिन्ही दहशतवाद्यांच्या पाकिस्तानी नागरिकत्वाला दुजोरा देणारे ठोस पुरावे आहेत, असे अधिकाऱ्याने सांगितले.

चकमकीनंतर या प्रकरणाचा तपास करण्यात आला. त्यात शस्त्रे ते काडतूस बॅलेस्टिक जुळवणी आणि ताब्यात घेतलेल्या दोन काश्मिरी मदतनिसांच्या बयाणाचा समावेश आहे. त्यातून पहलगाम हल्ल्यात पाकिस्तानी दहशतवाद्यांचा हात असल्याचे सिद्ध झाले.

प्रथमच आमच्याकडे सरकारने जारी केलेले पाकिस्तानी दस्तावेज हाती लागली आहेत, जी पहलगाम हल्लेखोरांचे राष्ट्रीयत्व निःसंशयपणे सिद्ध करतात, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. (वृत्तसंस्था)

### स्मार्ट आयडी चिप्स ठरली महत्त्वाची

» दहशतवाद्यांकडे एनडीएआरएसोबत लिंक अशलेली स्मार्ट आयडी चिप आढळली. ही एका खराब झालेल्या सॅटफोनमध्ये होती. त्यात एनएडीआरएचा बायोमेट्रिक रेकॉर्ड होता. त्यावरून त्यांचे पाकिस्तानी नागरिकत्व सिद्ध झाले. यात चांगा मांगा (कसूर जिल्हा) आणि कोयान गावातील पत्ता मिळाला.



# कुलगाममधील कारवाई चौथ्या दिवशीही सुरूच

◆ **श्रीनगर, ४ ऑगस्ट**

कुलगाम येथील दहशतवाद विरोधी मोहीम चौथ्या दिवशीही सुरूच असून, सुरक्षा दलांनी वेढ्यात अडकलेल्या दहशतवाद्यांवर फास आवळला असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली.

दहशतवाद्यांच्या विरोधातील कारवाई चौथ्या दिवशीही सुरूच आहे. सोमवारी सकाळी थांबून थांबून गोळीबार झाला. दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा दल सर्वच ड्रोन्स आणि हेलिकॉप्टरसह सर्वच उपकरणांचा वापर करीत आहे. दक्षिण काश्मीर जिल्ह्यातील अखल येथील जंगलात दहशतवादी असल्याची गुप्तचर माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी शुक्रवारी शोधमोहीम सुरू केली. यावेळी झडलेल्या चकमकीत दोन दहशतवादी ठार झाले, तर सुरक्षा दलाचे दोन जवान जखमी झाले आहेत. शुक्रवारी संध्याकाळी दोन्ही बाजूंमध्ये सुरुवातीच्या गोळीबारानंतर रात्रभर कारवाई थांबवण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. दहशतवाद्यांना घातलेला वेढा आणखी आवळण्यात आला. येथे अतिरिक्त कुमक पाचारण करण्यात आली. शनिवारी सकाळी सुरू झालेल्या चकमकीत दोन दहशतवाद्यांना ठार करण्यात आले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# भारताचा युक्रेन युद्धाला वित्तपुरवठा स्वीकारार्ह नाही

## ट्रम्प यांच्या वरिष्ठ सहायकाची बडबड

◆ **न्यू यॉर्क, ४ ऑगस्ट**

भारत जगभरात आपण अमेरिकेच्या जवळच्या मित्रांपैकी एक असल्याचे दाखवतो. पण, तो मोठ्या प्रमाणात शुल्क लादतो. इमिग्रेशन धोरणांवर फसवणूक करतो आणि रशियन तेल खरेदी करून युक्रेन युद्धाला वित्तपुरवठा करीत असल्याचा आरोप राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या एका वरिष्ठ सहाय्यकाने केला.

रशियाकडून तेल खरेदी करून भारताने या युद्धाला वित्तपुरवठा सुरू ठेवणे स्वीकारार्ह नाही, असे ट्रम्प यांनी अगदी स्पष्टपणे सांगितले असल्याचे व्हाईट हाऊसचे चीफ ऑफ स्टाफ स्टिफन मिलर यांनी रविवारी फॉक्स न्यूजला दिलेल्या



मुलाखतीत म्हटले आहे. रशियन तेल खरेदी करण्यात भारत मुळात चीनशी जुळलेला आहे, हे जाणून लोकांना धक्का बसेल. हे एक आश्चर्यजनक सत्य आहे, असे मिलर यांनी मुलाखतीत सांगितले.

भारत स्वतःला जगात आमच्या जवळच्या मित्रांपैकी एक म्हणून दाखवतो. परंतु, ते आमची उत्पादने स्वीकारत नाहीत, ते आमच्यावर मोठ्या प्रमाणात शुल्क लादतात. ते इमिग्रेशन धोरणात खूप फसवणूक करतात. हा प्रकार अमेरिकी कामगारांसाठी खूप हानिकारक आहे आणि आम्ही या देशाला रशियाकडून तेल खरेदी करताना पाहतो, असे मिलर म्हणाले. ट्रम्प यांना बळकट संबंध हवे आहेत आणि भारत तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी त्यांचे संबंध नेहमीच चांगले राहिले आहेत. मात्र, अमेरिकेला युक्रेन युद्धाच्या वित्तपुरवठ्याला सामोरे जाण्याबाबत वास्तववादी दृष्टिकोन बाळगण्याची गरज आहे.

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याकडे युक्रेनमधील सुरू असलेल्या युद्धाला राजनैतिक, आर्थिक आणि अन्यथा सामोरे जाण्यासाठी सर्व पर्याय उपलब्ध आहेत. जेणेकरून आपण शांतता प्रस्थापित करू शकू आणि डेमोक्रॅट पक्ष आणि ज्यो बायडेन ज्या युद्धासाठी जबाबदार आहेत, ते संपवून टाकू असे मिलर यांनी म्हटले. (वृत्तसंस्था)

### भारतासोबतच्या व्यापारात मोठे अडथळे

» भारतासोबतच्या व्यापारात प्रचंड तूट आहे, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी मागील आठवड्यात म्हटले आहे. भारत आमचा मित्र असला, तरी मागील काही वर्षांत आम्ही त्यांच्याशी तुलनेने कमी व्यवसाय केला. कारण, त्यांचे दर खूप जास्त आहेत. जगातील सर्वात जास्त दर भारताचे आहेत त्यांच्याकडे कोणत्याही देशापेक्षा सर्वात कठीण आणि घृणास्पद गैर-मौद्रिक व्यापार अडथळे आहेत, असे ट्रम्प यांनी म्हटले होते.

# पुण्यातील तीन महिलांचा पोलिसांवर छळाचा आरोप

## पोलिसांविरोधात कारवाईची वंचितची मागणी

◆ **पुणे, ४ ऑगस्ट**

छत्रपती संभाजीनगर येथून बेपत्ता झालेल्या एका महिलेच्या चौकशीदरम्यान पोलिस कर्मचाऱ्यांनी शारीरिक छळ केला आणि जातीवाचक टिप्पणी केली, असा आरोप पुण्यातील तीन महिलांनी केला. बेपत्ता झालेली महिला काही काळ त्यांच्यासोबत राहिली होती.

या आरोपांनंतर राजकीय पक्ष सक्रिय झाले असून, वंचित बहुजन आघाडी आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने कोथरूड पोलिस ठाण्याचे संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्याची मागणी केली. राकाँ शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे रविवारी रात्री तीन महिला आणि काही कार्यकर्त्यांसह पुणे पोलिस आयुक्तालयात गेले आणि सहपोलिस आयुक्त (कायदा आणि सुव्यवस्था) रंजनकुमार शर्मा यांची भेट घेतली तसेच पोलिस कर्मचाऱ्यांविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

या तीन महिलांनी केलेला आरोप पोलिसांनी फेटाळला आहे. शुक्रवारी कोथरूड आणि छत्रपती संभाजीनगर पोलिस ठाण्यातील कर्मचारी त्यांच्यासोबत राहणाऱ्या एका महिलेच्या बेपत्ता होण्याच्या तक्रारीची चौकशी करीत असताना तिन्ही महिलांच्या घरात घुसले होते, अशी माहिती कार्यकर्त्यांनी दिली.

**वारंट नसताना तपासणी केल्याचा आरोप**

मराठवाड्यातील एक महिला कौटुंबिक प्रकरणात न्याय मिळवण्यासाठी पुण्यात आली आणि कोथरूडमध्ये मैत्रिणीकडे राहिली. या प्रकरणात पोलिसांनी वॉरंटशिवाय चौकशी केली, असे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

## रजिस्टर्ड पोस्ट सेवा बंद होणार

**नवी दिल्ली :** पोस्ट ऑफिस आपली रजिस्टर्ड पोस्ट सेवा बंद करण्याची योजना आखत आहे. हा निर्णय १ सप्टेंबर २०२५ पासून लागू होणार आहे. भारतीय पोस्टाची रजिस्टर्ड पोस्ट सेवा ५० वर्षांहून अधिक काळ सुरू आहे. ही सेवा स्पीड पोस्टमध्ये विलीन करण्याचा विभागाचा विचार आहे. पोस्टाने आपले कामकाज जलद आणि आधुनिक बनवण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेतला आहे.

# धर्मांतर आणि लग्नाला नकार दिल्याने महिलेची हत्या

## आरोपी रईस शेखला अटक

◆ **भोपाळ, ४ ऑगस्ट**

एका ३५ वर्षीय महिलेची गळा चिरून,चाकूचे वार करून हत्या करण्यात आली. या महिलेने लग्नाला नकार दिला होता आणि इस्लाम धर्मात धर्मांतर करून घ्यायलाही नकार दिला होता. आरोपी रईस शेखला अटक करण्यात आली आहे.

मध्यप्रदेशातील नवारा भागातील ही धक्कादायक घटना आहे. भाग्यश्री असे या महिलेचे नाव आहे. तिच्यावर शेख रईसने हल्ला केला. या प्रकरणी शेख रईसला काही तासांमध्ये अटक करण्यात आली. पोलिसांनी या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असल्याची माहिती दिली आहे.

भाग्यश्रीची बहीण सुभद्राने सांगितले की रईस शेखने तिला केस पकडून ओढले. त्यानंतर तिला मारहाण केली, तिला शारीरिक त्रास दिला. धर्मांतर कर आणि लग्नाला होकार दे असे सांगत होता. गेल्या काही दिवसांपासून तो हे करत होता. माझ्या बहिणीने लग्नाला आणि धर्मांतराला नकार दिला. त्यामुळे रईसने तिची हत्या केली. तिला रुग्णालयात नेण्यात आले. पण डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

**पोलिसांनी या प्रकरणी नेमकी काय माहिती दिली?**

अतिरिक्त पोलिस अधीक्षक अंतर सिंग यांनी असे सांगितले की या प्रकरणी आम्ही आरोपीला अटक केली आहे. त्याची चौकशी आम्ही करत आहोत. त्याच्यावर हत्या, मारहाण आणि धर्मांतराचा दबाव या संबंधीची कलमं लावण्यात आली आहेत. (वृत्तसंस्था)




दहशतवादी संघटना हमास आणि इस्त्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे सर्वसामान्य नागरिकांची मात्र, परवड होत आहे. गाझातील नागरिकही हमासच्या विरोधात उतरले आहेत. हमासमुळेच गाझातील नागरिकांना तात्पुरत्या राहुट्यांमध्ये दिवस काढावे लागत आहेत.

## चित्रपट वार्ता

### 'रांझणा'चा एआयने क्लायमॅक्स बदलल्याने संतापला धनुष

**मुंबई :** 'रांझणा' चित्रपटाच्या क्लायमॅक्समध्ये (आर्टिफिशियल इंटेलिजेंस) द्वारे बदल करण्यात आल्यानंतर वाद सुरू झाला आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक आनंद एल. राय यांच्यानंतर आता चित्रपटाचा मुख्य अभिनेता धनुषनेही यावर आक्षेप घेतला आहे. अभिनेत्याने म्हटले आहे की त्यांच्या स्पष्ट आक्षेपानंतरही, निर्मात्याने बदललेल्या क्लायमॅक्ससह चित्रपट पुन्हा प्रदर्शित केला आहे. यावर नाराजी व्यक्त करताना धनुषने एक अधिकृत निवेदन जारी केले आहे की, एआयने रांझणा चित्रपटाचा बदललेला क्लायमॅक्स पुन्हा प्रदर्शित केल्याने मला पूर्णपणे अस्वस्थ केले आहे. या पर्यायी शेवटामुळे चित्रपटाचा आत्मा हिरावून घेतला गेला आणि माझ्या स्पष्ट आक्षेप असूनही संबंधित पक्षाने तो सुरू ठेवला आहे.



### सिद्धू मूसेवाला पुन्हा स्टेजवर दिसणार

**अमृतसर :** जेव्हा सिद्धू मूसेवाला यांचा होलोग्राम चमकदार दिवे, उत्साही गर्दी आणि प्रतिध्वनीत सुपरहिट गाण्यांमध्ये स्टेजवर येतो, तेव्हा प्रेक्षकांना क्षणभर असे वाटेल की जणू ते त्याच्यासमोर उभे आहेत. 'साइन टू वॉर २०२६ वर्ल्ड टूर' अंतर्गत दिवंगत पंजाबी गायकाचे हे डिजिटल पुनरागमन ३डी प्रोजेक्शन तंत्रज्ञानाद्वारे होईल. हे तंत्रज्ञान त्यांच्या खऱ्या आवाजासह, गाण्यांसह आणि स्वॅगसह त्यांचा ३ अवतार स्टेजवर आणेल. हे यापूर्वी मायकल जॅक्सन, टुपॅक आणि व्हिटनी ह्यूस्टन सारख्या कलाकारांसोबत केले गेले आहे. पण मूसेवालाच्या चाहत्यांसाठी हा अनुभव भावनिक आणि आश्चर्यकारक दोन्ही असेल. हे तंत्रज्ञान भविष्यात केवळ संगीतातच नाही तर शिक्षण, नाट्य आणि वारसा संवर्धन यासारख्या क्षेत्रातही मोठे बदल घडवून आणू शकते.



### मोहित सुरीच्या 'सैयारा'ने इतिहास रचला

**मुंबई :** मोहित सुरीचा सैयारा हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. हा चित्रपट सतत नवीन विक्रम करत आहे. देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर कमाईच्या बाबतीत या चित्रपटाने ३०० कोटी रुपयांचा आकडा गाठला आहे. अशाप्रकारे, मोहित सुरीच्या कारकिर्दीतील हा पहिला ३०० कोटींचा ब्लॉकबस्टर चित्रपट आहे. त्याच वेळी, अहान पांडे आणि अनित पड्डा हे त्यांच्या पदार्पणाच्या चित्रपटाने ३०० कोटी क्लबमध्ये पोहोचणारे पहिले अभिनेते बनले आहेत. सैयाराने १७ व्या दिवशी बॉक्स ऑफिसवर ८ कोटी रुपये कमावले. तथापि, हा आकडा दुसऱ्या रविवारीपेक्षा खूपच कमी होता. या चित्रपटाने दुसऱ्या रविवारी ३० कोटी रुपये कमावले होते. मोहित सुरी दिग्दर्शित हा चित्रपट तिसऱ्या रविवारी म्हणजेच ३ ऑगस्ट रोजी एकूण ३९.१० टक्के प्रेक्षकांनी पाहिला.




# अनंतनागमध्ये आढळल्या हिंदू देव-देवतांच्या मूर्ती

## झऱ्याचे नूतनीकरण सुरू असताना निघाले शिवलिंग

◆ **जम्मू, ४ ऑगस्ट**

जम्मू-काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील एका झऱ्याच्या नूतनीकरणासाठी सुरू असलेल्या उत्खननादरम्यान अनेक प्राचीन हिंदू मूर्ती आणि शिवलिंग सापडले आहे. ऐशमुकाम परिसरातील सालिया येथील करकूट नाग येथे हा ऐतिहासिक ठेवा उजेडात आला असून, यामुळे या भागाच्या प्राचीन इतिहासावर नव्याने प्रकाश पडला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सालिया येथील प्राचीन झऱ्याचे पुनरुज्जीवन आणि जीर्णोद्धाराचे काम सुरू आहे. या कामासाठी शनिवारी उत्खनन करत असलेल्या मजुरांना काही दगडी मूर्ती आणि शिवलिंग आढळले. त्यांनी तात्काळ ही माहिती अधिकाऱ्यांना दिली. या सापडलेल्या मूर्तींमुळे



स्थानिक परिसरात कुतूहलाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. कश्यप ऋषींच्या नावावरून या प्रदेशाला काश्मीर हे नाव पडले आहे. काश्मीरातील अनेक शहरांची नावे आजही हिंदू राजवटीच्या काळातील आहेत. काश्मीरमध्ये हिंदू आणि बौद्ध शासकांनी अनेक शतके राज्य केले आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या मूर्तींचे वय आणि मूळ ओळखण्यासाठी त्यांची शास्त्रीय तपासणी केली जाईल. यासाठी त्यांना श्रीनगर येथील एसपीएस संग्रहालयात पाठवण्यात येणार आहे, जिथे संशोधक त्यांचा सखोल अभ्यास करतील. (वृत्तसंस्था)

### कारकोट राजवंशाशी संबंध

» हे स्थळ काश्मिरी पंडितांसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते, कारण याचा संबंध ६२५ ते ८५५ या कालखंडात दरम्यान काश्मीरवर राज्य करणाऱ्या 'कारकोट' राजवंशाशी जोडला जातो. या घटनेची माहिती मिळताच जम्मू-काश्मीरच्या पुरातत्व आणि संग्रहालय विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

## एअर इंडियाच्या विमानात आढळले झुरळ

◆ **नवी दिल्ली, ४ ऑगस्ट**

सॅन फ्रान्सिस्कोहून मुंबई मार्गे कोलकाताला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानात झुरळे आढळल्याची घटना समोर आली आहे.

दोन प्रवाशांनी त्यांच्या सीटजवळ झुरळे आढळल्याची तक्रार केली. यानंतर केबिन क्रूने दोघांच्याही सीट बदलल्या. झुरळे पाहून दोघेही अस्वस्थ झाले. एअरलाइनने एका निवेदनात म्हटले आहे की, आमच्या केबिन क्रूने दोन्ही प्रवाशांना त्याच केबिनमधील इतर जागांवर हलवले, जिथे ते मुंबई पोहोचेपर्यंत आरामात बसले होते. कोलकातामध्ये इंधन भरताना, ग्राउंड क्रूने विमानाची साफसफाई केली. त्यानंतर विमान मुंबईला रवाना झाले. (वृत्तसंस्था)

४१ वा वर्धापन दिन

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

४१ वा वर्धापन दिन

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित



## विचारपुष्प



संघाचा स्वयंसेवक म्हणजे निष्कलंक, नि:स्वार्थ भावनेने प्रेरित असा कार्यकर्ता, जो राष्ट्रसेवेसाठी स्वत:चे आयुष्य समर्पित करतो.

**- कृ. सूर्यनारायण राव**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. सेवा प्रमुख

## महत्त्वाचे

### आठवड्याच्या पहिल्या सत्रात निर्देशांकाची उसळी



**मुंबई :** जागतिक बाजारांमध्ये आलेल्या तेजीच्या बळावर तसेच धातू, वस्तू आणि वाहन क्षेत्रातील खरेदीमुळे आठवड्याच्या पहिल्या सत्रात मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकाने उसळी घेतली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ४१८ अंकांनी उसळून ८१,०१८ या पातळीवर बंद झाला. दिवसभराच्या सत्रात त्याने ४९३ अंकांची उसळी घेतली होती. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १५७ अंकांनी वधारून २४,७२२ या पातळीवर बंद झाला. आजच्या सत्रात टाटा स्टील, बीईल, अदानी पोर्ट्स, टीसीएस, टेक महिंद्रा, भारती एअरटेल, महिंद्रा अ‍ॅण्ड महिंद्रा, रिलायन्स इंडस्ट्रीज या कंपन्यांना आज सर्वाधिक फायदा झाला.

### आंतरराष्ट्रीय सीमेवर संशयास्पद व्यक्तीला अटक

**जम्मू :** जम्मू-काश्मिरातील कठुआ येथील आंतरराष्ट्रीय सीमेवर संशयास्पद अवस्थेत फिरणाऱ्या एका व्यक्तीला सुरक्षा दलांनी अटक केल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली. रविवारी रात्री उशिरा जिल्ह्यातील मारहीन भागात त्याला अटक करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. संशयास्पद कॉल्सबद्दल पोलिस आणि बीएसएफ त्याची चौकशी करीत आहेत.

### शिबू सोरेन यांचे योगदान स्मरणीय : राष्ट्रपती

**नवी दिल्ली :** झारखंडचे माजी मुख्यमंत्री आणि माजी केंद्रीय मंत्री शिबू सोरेन यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांच्यासह अनेक मान्यवरांनी तीव्र दु:ख व्यक्त केले. शिबू सोरेन यांच्या निधनामुळे सामाजिक न्यायाच्या क्षेत्राची मोठी हानी झाल्याचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे. आदिवासी अस्मिता आणि झारखंड राज्याच्या निर्मितीसाठी सोरेन यांनी सातत्याने संघर्ष केला, याकडे लक्ष वेधत मुर्मू यांनी म्हणाले की, आदिवासी समाजाच्या कल्याणासाठी त्यांनी दिलेले योगदान नेहमीच स्मरणात राहील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर गंगाराम रुग्णालयात जात शिबू सोरेन यांचे अंत्यदर्शन घेतले आणि त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. मोदी यांनी शिबू सोरेन यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण केल्यानंतर त्यांचे पुत्र आणि झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. दु:खाच्या प्रसंगी सोरेन यांच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांच्याबद्दल मी सहानुभूती व्यक्त केली, असे मोदी यांनी एक्सवर म्हटले.

# ओबीसी आरक्षणासह मनपा निवडणुका

## नवीन प्रभाग पद्धती कायम राहणार



## सर्वोच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब

◆ **नवी दिल्ली, ४ ऑगस्ट**

राज्यातील महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका या नवीन प्रभाग रचनेनुसार आणि ओबीसी आरक्षणासह घेतल्या जातील, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. यासंबंधी नवीन प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या याचिका न्यायालयाने फेटाळल्या. ओबीसी आरक्षणाला विरोध करणारी याचिका फेटाळून लावल्याने राज्यात आता महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका २७ टक्के आरक्षणानुसारच होणार आहेत.

वॉर्ड किंवा प्रभाग रचना हा पूर्णपणे राज्य सरकारचा अधिकार असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. या संबंधित दोन याचिका न्यायालयाने फेटाळल्या. त्यामुळे राज्य सरकारने दिलेल्या आदेशानुसार, नवीन प्रभाग रचनेनुसारच राज्यातील निवडणुका होणार आहेत.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मे २०२१ पासून रखडल्या आहेत. ओबीसी आरक्षणासंबंधी एक याचिका दाखल करण्यात आली होती. त्यामुळे या निवडणुका रखडल्या होत्या. त्यावर निर्णय देत या निवडणुका ओबीसी आरक्षणानुसारच घेतल्या जाव्या, असा निर्देश न्यायालयाने दिला होता. त्यानुसार नवीन प्रभाग रचनेचा आदेश राज्य सरकारने दिला होता.

६ मे रोजी न्यायालयाने या संबंधित निर्देश देऊन राज्य सरकारला निवडणुका घेण्याचा आदेश दिला होता. प्रभाग रचना करण्याचा अधिकार हा पूर्णपणे राज्य सरकारचा असल्याचे त्यावेळी न्यायालयाने म्हटले होते. त्यानुसार राज्य सरकारने नवीन प्रभाग रचनेचा आदेशही दिला होता. परंतु लातूरमधील औसा नगरपालिकेसंबंधी एक हस्तक्षेप याचिका दाखल करण्यात आली. त्यामध्ये नवीन प्रभाग रचनेवर आक्षेप घेण्यात आला होता. आता न्यायालयाने ही याचिका फेटाळली आहे.

राज्य सरकारला आणि राज्य निवडणूक आयोगने दिलेल्या कार्यकाळात कार्यवाही करावी असे न्यायालयाने यापूर्वी झालेल्या सुनावणीत म्हटले होते. २०२२ मध्ये जी प्रभागरचना झाली होती, तो कायदा रद्द करण्यात आला, तर २०१७ च्या पुनर्रचनेनुसार निवडणूक होणार आहेत. *(वृत्तसंस्था)*

### या आधी न्यायालयाने काय म्हटले?

**दोन महिन्यांपूर्वी न्यायालयाने राज्य सरकारला ओबीसी आरक्षणावरून काही निर्देश दिले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणुकीबाबत चार आठवड्यात अधिसूचना जारी करा आणि चार महिन्यांच्या आत निवडणूक घ्या, असे न्यायालयाने म्हटले. १९९४ ते २०२२ पर्यंत जी ओबीसी आरक्षणाची स्थिती होती, त्यानुसारच स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक घ्या, असा निर्देश न्यायालयाने दिला आहे.**



ओव्हलच्या मैदानावर जमलेल्या क्रिकेटप्रेमींना कसोटी क्रिकेटमधील थरार अनुभवायला मिळाला. चवथ्या दिवशी पाऊस आणि अंधुक प्रकाशाने इंग्लंडला विजयापासून दूर ठेवले. पाचव्या दिवशी दोन्ही संघांना विजयाची समान संधी होती. पण, ताजेतवाने झालेल्या भारतीय गोलंदाजांनी तिखट आणि त्वेषाने मारा करीत इंग्लंडच्या शेपटाची वळवळ थांबविली. सिराजने गस ॲटकिन्सनची उजवी दांडी उडवत भारताला संस्मरणीय विजय मिळवून दिला आणि मालिका २-२ ने बरोबरीत सोडविली.

### प्रारूप यादीसाठी राजकीय पक्षांचा अद्याप दावा नाही

**नवी दिल्ली :** १ ऑगस्ट रोजी बिहारमधील प्रारूप यादी प्रकाशित झाल्यापासून कोणत्याही राजकीय पक्षाने कागदपत्रांतून व्यक्तींची नावे समाविष्ट करण्यासाठी किंवा वगळण्यासाठी संपर्क साधलेला नाही, असे निवडणूक आयोगाने सोमवारी सांगितले. दावे आणि हरकतींसाठी मसुदा यादी १ सप्टेंबरपर्यंत उपलब्ध असेल.

# चीनने जमीन बळकावल्याचे तुम्हाला कसे माहीत?

## सर्वोच्च न्यायालयाचा राहुल गांधींना सवाल | मानहानीच्या कार्यवाहीला मात्र स्थगिती

◆ **नवी दिल्ली, ४ ऑगस्ट**

अरुणाचल प्रदेशात चिनी पथकांनी भारतीय जवानांना मारहाण केली, असे वक्तव्य करणारे काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने कडक शब्दांत कानउघाडणी केली. मात्र, या मुद्यावरून त्यांच्या विरोधात दाखल मानहानीच्या कार्यवाहीला न्यायालयाने स्थगिती दिली. चीनने भारताची दोन हजार वर्गकिमी जमीन बळकावल्याचे तुम्हाला कसे माहीत, असा अडचणीत आणणारा सवाल न्यायालयाने राहुल गांधी यांना केला.

अरुणाचल प्रदेशातील तवांग सेक्टरमध्ये डिसेंबर २०२२ मध्ये भारत आणि चीनचे लष्कर समोरासमोर आले होते. त्या मुद्यावर राहुल गांधी यांनी हे वक्तव्य केले. न्या. दीपांकर दत्ता आणि न्या. ए. जी. मसिह यांच्या न्यायासनाने त्यांच्या वक्तव्यावर तीव्र आक्षेप घेतला.

तुम्ही तिथे होते का? तुमच्याकडे तसे विश्वासार्ह पुरावे आहेत का, असे



प्रश्नही न्यायालयाने राहुल गांधी यांना केले. या बाबींवर राहुल गांधी बोलू शकणार नाहीत, तर ते विरोधी पक्षनेते कसे असू शकतील, असा युक्तिवाद राहुल गांधी यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ अभिषेक सिंघवी यांनी केला. यावर, तुम्ही या गोष्टी संसदेत का नाही बोलत, असे न्या. दत्ता यांनी उसळून म्हटले. तरीही न्यायालयाने राहुल गांधी यांनी आपल्या विरोधातील मानहानी याचिका रद्द करण्यात यावी, या मागणीसाठी दाखल केलेल्या याचिकेवर नोटीस जारी केली. आरोप दाखल करण्यातील स्पष्ट चुकांकडे सिंघवी यांनी लक्ष वेधल्यानंतर ही नोटीस जारी करण्यात आली. यात पोलिसांनी गुन्हेगारी तक्रारीची दखल घेण्यापूर्वी राहुल गांधींना पूर्व सुनावणीची परवानगी न देण्याचा समावेश होता.

लखनौ येथील विशेष न्यायालयाने फेब्रुवारीत जारी केलेल्या समन्सला आव्हान देत राहुल गांधी यांनी दाखल केलेली याचिका अलाहबाद उच्च न्यायालयाने फेब्रुवारीत फेटाळली होती. *(वृत्तसंस्था)*

### खरा भारतीय असे बोलूच शकत नाही

चीनने भारताचा दोन हजार वर्गकिमी भूभाग बळकावला आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनसमोर शरणागती पत्करली, असा आरोप राहुल गांधी यांनी केला होता. भारताची दोन हजार किमी जमीन चीनने बळकावल्याचे तुम्हाला कसे माहीत? तुम्ही खरे भारतीय असाल, तर तुम्ही असे काही बोलूच शकणार नाहीत, असा संताप न्या. दत्ता यांनी राहुल गांधी यांच्या वक्तव्यावर केला.

# आदिवासी नेते शिबू सोरेन यांचे निधन

◆ **नवी दिल्ली, ४ ऑगस्ट**



झारखंडचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आणि झारखंड मुक्ती मोर्चाचे सर्वेसर्वा शिबू सोरेन यांचे आज सकाळी राजधानी दिल्लीतील सर गंगाराम रुग्णालयात निधन झाले, मृत्युसमयी ते ८१ वर्षांचे होते.

झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे ते वडील होत . हदय आणि किडनीच्या त्रासामुळे शिबू सोरेन गेल्या महिनाभरापेक्षा जास्त काळापासून सर गंगाराम रुग्णालयात दाखल होते. तज्ञ डॉक्टरांची चमू त्यांच्यावर उपचार करत होती. आज सकाळी त्यांचे निधन झाले. शिबू सोरेन यांचे पुत्र आणि झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी ट्विट करत शिबू सोरेन यांच्या निधनाची माहिती दिली. आदरणीय दिशोम गुरुजी आपल्या सगळ्यांना सोडून गेले, आज मी शून्य झालो, असे हेमंत सोरेन यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले. शिबू सोरेन यांच्या निधनाच्या वृत्तामुळे संपूर्ण झारखंडमध्ये शोककळा पसरली.

सोरेन आजारी असल्यापासून त्यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी म्हणून झारखंडमधील मंदिर, मशीद आणि गुरुद्वारात पूजा आणि प्रार्थना सुरु झाल्या होत्या. स्वतंत्र झारखंड राज्याच्या मागणीसाठी शिबू सोरेन यांनी दीर्घकाळ आंदोलन केले, त्याचाच परिणाम म्हणून २००० मध्ये बिहार राज्यातून झारखंड राज्याची निर्मिती करण्यात आली.

२२ मे २००४ ला सर्वप्रथम ते केंद्रीय मंत्री झाले. मात्र ३० वर्ष जुन्या एका प्रकरणात जामताडा न्यायालयाने अटकवॉरंट जारी केल्यामुळे त्यांना जुलै २००४ मध्ये मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. जामिनावर त्यांची सुटका झाली. त्यानंतर नोव्हेंबर २००४ मध्ये पुन्हा त्यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला. २ मार्च २००५ ला त्यांनी पुन्हा मंत्रिपदाचा राजीनामा दिला. *(तभा वृत्तसेवा)*



### आदिवासी समुदायांचे केले सशक्तीकरण : मोदी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांना श्रद्धांजली अर्पण केली. शिबू सोरेन यांनी आदिवासी समुदाय, गरीब आणि दलितांचे सशक्तीकरण केले, असे मोदी यांनी म्हटले. नरेंद्र मोदी यांनी रुग्णालयात जाऊन शिबू सोरेन यांना आदरांजली अर्पण केली. मोदी यांनी सोरेन यांचे पुत्र व झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्यासोबत चर्चा करून दु:ख व्यक्त केले.

# आता आवाज ओळखणे होणार आणखी सोपे

## आयआयटीचे नवे संशोधन

**गुवाहाटी, ४ ऑगस्ट**

आयआयटी-गुवाहाटी येथील संशोधकांनी पाण्याखालील कंपन सेन्सर विकसित केला आहे जो स्वयंचलित आणि संपर्करहित आवाज ओळखण्यास सक्षम करतो. अमेरिकेतील ओहायो स्टेट युनिव्हर्सिटीच्या संशोधकांच्या सहकार्याने विकसित केलेला हा सेन्सर पारंपारिक आवाज-आधारित प्रणाली वापरण्यास असमर्थ असलेल्या आवाजाच्या समस्या असलेल्या व्यक्तीसाठी एक आशादायक पर्यायी संप्रेषण पद्धत प्रदान करतो.

आवाज ओळखणे हा आधुनिक जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे कारण तो वापरकर्त्यांना व्हॉइस कमांडद्वारे मोबाइल



फोन आणि घरगुती उपकरणांसह स्मार्ट डिव्हाइसेस चालविण्यास मदत करतो, असे त्यात म्हटले आहे. तथापि, आवाजाच्या समस्या असलेल्या लोकांसाठी, हा तांत्रिक विकास अद्यापही उपलब्ध नाही, असे त्यात म्हटले आहे. या मर्यादेचे निराकरण करण्यासाठी, संशोधन पथकाने बोलताना तोंडातून बाहेर पडणाऱ्या हवेवर लक्ष केंद्रित करून एक उपाय शोधला आहे.

**नेमके काय आहे तंत्रज्ञान... :** ज्या प्रकरणांमध्ये व्यक्ती आवाज निर्माण करू शकत नाहीत, तेव्हा बोलण्याचा प्रयत्न केल्याने त्यांच्या फुफ्फुसातून हवेचा प्रवाह निर्माण होतो. जेव्हा ही हवा पाण्याच्या पृष्ठभागावरून वाहते तेव्हा ती सूक्ष्म लाटा निर्माण करते. संशोधन पथकाने पाण्याखालील कंपन सेन्सर विकसित केला आहे जो या पाण्याच्या लाटा शोधू शकतो आणि ऐकू येणाऱ्या आवाजावर अवलंबून न राहता भाषण सिग्नलचे अर्थ लावू शकतो, त्यामुळे आवाज ओळखण्यासाठी एक नवीन मार्ग तयार होतो, असे निवेदनात म्हटले आहे. विकसित सेन्सर एका प्रवाहकीय, रासायनिकदृष्ट्या प्रतिक्रियाशील सच्छिद्र स्पंजपासून बनवला आहे, असे त्यात म्हटले आहे.



संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू असून सोमवारीही लोकसभेचे कामकाज होऊ शकले नाही. संसदेतून बाहेर पडत असताना संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि काँग्रेस खासदार प्रियांका वढेरा यांच्यात संवाद झाला.

### लढाऊ विमाने बनवणारे बोईंगचे कामगार संपावर

**न्यूयॉर्क, ४ ऑगस्ट**

लढाऊ विमाने बनवणारे बोईंग कंपनीचे कामगार सोमवारी मध्यरात्री संपावर गेले. वेतनवाढीच्या मुद्यावरून बोईंगचे कामगार संघर्षाच्या पावित्र्यात उतरले आहेत.

सेंट लुईस, सेंट चार्ल्स, मिसूरी, आणि मॅस्काउटा, इलिनॉय येथील बोईंग सुविधांमधील सुमारे ३,२०० कामगारांनी बोईंगसोबतच्या सुधारित चार वर्षांच्या कामगार कराराला नकार देण्यासाठी मतदान केले, असे इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ मशिनिस्ट्स अँड एरोस्पेस वर्कर्स युनियनने सांगितले. गेल्या आठवड्यात सदस्यांनी अडचणीत आलेल्या एरोस्पेस दिग्गज कंपनीच्या आधीच्या प्रस्तावाला नकार दिल्यानंतर हे मतदान झाले, ज्यामध्ये चार वर्षांत २० टक्के वेतनवाढ समाविष्ट होती. आधीच्या मतदानाच्या वेळी, युनियन नेत्यांनी या ऑफरला मान्यता देण्याची शिफारस केली होती, त्याला एक 'महत्वाचा करार' म्हटले होते आणि म्हटले होते की यामुळे पेन्शन आणि ओव्हरटाइम फायदे सुधारतील.

# प्रत्येक शाळेत १४ ऑगस्टला होणार पसायदान

## संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींचे ७५० वे जयंतीवर्ष

◆ **नागपूर, ४ ऑगस्ट**

विश्वाच्या निरंतर कल्याणासाठी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींनी ईश्वराजवळ पसायदान मागितले. मराठी साहित्यातील हा एक ठेवा अमूल्य ठेवा आहे. सन २०२५ हे माउलींच्या ७५० व्या जयंतीचे वर्ष आहे. यानिमित्ताने माउलींनी पसायदानातून दिलेला विचार राज्यातील प्रत्येक शाळेत एकाच वेळी पोहचावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार येत्या १४ ऑगस्ट रोजी राज्यातील प्रत्येक शाळेत पसायदानाचे पठण करण्यात यावे, असे आदेश शालेय शिक्षण विभागाने राज्यातील शाळांना दिले आहेत.



शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी पुणे येथील शिक्षण विभागाच आयुक्तांना यासंदर्भात कळविले आहे. शिक्षण आयुक्त कार्यालयाकडून हे आदेश राज्यातील सर्व अनुदानित, विना अनुदानित, खासगी, महापालिका, जिल्हा परिषद, संस्थात्मक शाळांना कळविण्यात आले आहेत. १५ ऑगस्ट रोजी गोकुळ अष्टमीला संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउली यांची ७५० वी जयंती आहे. या दिवशी स्वातंत्र्यदिनानिमित्त झेंडावंदन, प्रभातेरीचे कार्यक्रम शाळांमध्ये असल्याने पसायदान पठणाचा कार्यक्रम १४ ऑगस्ट रोजी करण्याचे शालेय शिक्षण विभागाचे आदेश आहेत. *(वृत्तसंस्था)*

### प्रत्येक शहरात पालखी मिरवणूक


**प्रत्येक शहरात ज्ञानेश्वर महाराज यांचे सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंतीवर्षा निमित्त येत्या १५ ऑगस्ट रोजी राज्यातील प्रत्येक नगर व शहरांमध्ये महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद यांनी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत माउलींची प्रतिमा, मूर्तीची पालखीतून मिरवणूक काढून हा उत्सव साजरा करावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहे.**

# ट्रम्प यांचे वक्तव्य शब्दश: घेऊ नये : थरूर

**पुणे, ४ ऑगस्ट**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला 'मृत अर्थव्यवस्था' असे संबोधले आहे, ही टिप्पणी 'अपमानास्पद' होती, पण ती 'शब्दश:' घेऊ नये, असे काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी म्हटले आहे. पुण्यात क्रॉसवर्डचे सीईओ आकाश गुप्ता यांनी ज्येष्ठ काँग्रेस नेते यांच्या नवीनतम पुस्तक 'द लिव्हिंग कॉन्स्टिट्यूशन'वर संवाद साधत होते. त्याप्रसंगी ते म्हणाले. यावेळी थरूर यांनी विविध मुद्यांवर भाष्य केले.

गत आठवड्यात अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी भारतीय



वस्तूंच्या आयातीवर २५ टक्के कर व 'मोठ्या प्रमाणात' रशियन लष्करी उपकरणे आणि कच्चे तेल खरेदी केल्याबद्दल अनिर्दिष्ट 'दंड' जाहीर केल्यानंतर काही तासांतच भारताला 'मृत अर्थव्यवस्था' म्हटले. ट्रम्प व्हाईट हाऊसमध्ये असल्यामुळे हे एक अशांत व अप्रत्याशित जग आहे. त्यामुळे ट्रम्प यांचे वक्तव्य शब्दश: घेऊ नये, परंतु तुम्हाला त्यांना गांभीर्याने घेण्याची गरज आहे. ते अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आहेत व त्यांनी घेतलेले निर्णय धोरणांवर परिणाम करू शकतात आणि धोरणे आपल्यावर परिणाम करू शकतात. म्हणून त्यांना गांभीर्याने घ्या, पण शब्दश: घेऊ नका, असे थरूर म्हणाले. जेव्हा काही मोठ्या शक्तींच्या सक्रिय सहभागाने युद्धे केली जात आहेत व जागतिक व्यवस्था राखणारे लोक अव्यवस्था वाढविण्यात हातभार लावत आहेत, तेव्हा भारताने आपल्या राष्ट्रीय हितांबद्दल स्पष्ट असले पाहिजे, असेही ते म्हणाले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# टवाळी नावडे विनोदास...

विनोद हे आनंदी मनाचे पहिले लक्षण असते. जेव्हा मन आनंदी असते, चिंतामुक्त असते आणि सर्वत्र सारे काही आलबेल असल्याची शाश्वती असते, तेव्हा विनोदबुद्धीला बहर येतो. आजकाल विनोदाचे वावडे असलेल्यांची संख्या झपाट्याने वाढत असल्याने, विनोदबुद्धीची कदर करणाऱ्यांची मानसिकता त्याच वेगाने कमी होत चालली असावी. अन्यथा, विनोदाने केलेल्या कोट्या, टीका, व्यंगात्मक टिप्पण्या किंवा टोमणे हलकेच घेण्याची सवय समाजाने समंजसपणे जोपासली असती. विनोद हे निर्भेळ जगण्याचे निखळ माध्यम आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. विनोदाची एवढी महती जर सत्य असेल, तर विनोदाने केलेल्या कोणत्याही वक्तव्याचा बाऊ करून त्यावरून एखाद्यास लक्ष्य करत गदारोळ माजविणे हे मनाच्या कमकुवतपणाचे लक्षण म्हणावे लागेल. 'टवाळा आवडे विनोद' असे गंभीर प्रवृत्तीच्या माणसाचे अकारण झालेले मत असते.

कोणत्याही प्रसंगोपात्त विनोदास मनापासून अशी दिलदार दाद द्यावी, विनोदाच्या दर्जानुसार कमी-अधिक हसून त्यास खुला प्रतिसाद द्यावा किंवा त्यातील व्यंगाचे मर्म नेमके ओळखून ते व्यंग दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा, हे सामाजिक सुदृढतेचे खरे लक्षण असते. अलिकडे मात्र ते काहीसे बिघडत चालले आहे. अन्यथा, विनोदाने केलेल्या टिप्पणीची खुमारी लक्षात न घेता त्याचे काटे बोचल्याचा बाऊ करणाऱ्यांनी एखाद्या मंत्र्याच्या विनोदबुद्धीचा एवढा गहजब केला नसता. खरे म्हणजे, जेव्हा राज्यकर्त्यांना विनोद सुचतात, तेव्हा सारे काही आलबेल आहे असे समजावयास हवे. कारण परिस्थिती जेव्हा चिंताजनक असते, राज्यातील सामाजिक वातावरण बिघडलेले असते, समाज कोणत्या ना कोणत्या समस्यांशी सामना करताना मेटाकुटीस आलेला असतो आणि समस्यामुक्तीच्या आशेने समाजाच्या नजरा जेव्हा सरकारकडे किंवा संबंधित मंत्र्यांकडे लागलेल्या असतात, तेव्हा समाजाच्या अपेक्षांची गांभीर्याने दखल घेण्याएवढा समंजसपणा मंत्री वा सरकारांकडे खचितच असतो. त्यामुळे हे गांभीर्य खुंटीवर टांगून कोणीही जबाबदार व्यक्ती अकारण विनोदाची कारंजी फुलवत बसणार नाही आणि अशा कारंज्यातून मनाचे व समाजाचे मनोरंजन करण्याची बुद्धीही कोणास सुचणार नाही, हे लक्षात घ्यावयास हवे. राज्याचा एखादा मंत्री जनतेवर उदारहस्ते सुविधा, सोयींची अथवा कोणत्याही योजनांची खैरात करत असेल आणि त्यासाठी कोणत्याही समस्यांचा अडथळा नसल्याची त्यास खात्री वाटत असेल, तर राजा उदार झाला आहे, हे जनतेने समजून घ्यायला हवेच; पण उदाहरणे उधळण्याइतपत त्याच्या खजिन्यात पुरेसा साठादेखील आहे, याची खात्री वाटून आनंदी असावयास हवे. शेवटी, जनतेच्या खिशात हात घालून करांच्या रूपाने वा अन्य महसुलाच्या रूपाने सरकारच्या तिजोरीत येणारा प्रत्येक पैसा हा जनतेच्या हितासाठीच वापरला जाणे हे कल्याणकारी राज्यव्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण असते. त्यामुळे जनतेकडून घेतलेले पुन्हा जनतेला देताना हात सैल सोडणाऱ्या राज्यकर्त्यांच्या मनात, हा पैसा आपल्या बापजाद्यांचा नाही, याची जाणीव असणे हे त्याच्या प्रामाणिकपणाचे लक्षण समजावयास हवे. जे जनतेकडून गोळा केले, त्याचाच हिस्सा जनतेसाठी उधळताना, आपल्या बापजाद्यांचे काय जाते हा विचार म्हणजे उच्च पातळीच्या निरिच्छपणाचे आदर्श उदाहरण मानावयास हवेच, पण तसे बोलून दाखविण्याचे औदार्य हे त्याहूनही वेगळ्या उंचीच्या मानसिकतेचे उदाहरण मानावयास हवे. राज्याच्या कोणा मंत्र्याने जनतेस काही आश्वासने देताना, हीच निरिच्छ भावना त्याच्या हलक्याफुलक्या मानसिकतेने व्यक्त केली. खरे तर याकडे विनोदाने पाहावयास हवे आणि तसे पाहावयाचे ठरविले, तर राज्याच्या तिजोरीची स्थिती भक्कम असल्याच्या निश्चिंततेची खात्री संबंधित मंत्र्यास नक्कीच असावी, याचीही खूणगाठ मनामनात बांधली गेलेली असावयास हवी. मंत्र्याचे मन चिंतामुक्त असल्याखेरीज तो एवढ्या आश्वस्तपणे जनतेस दिलासा देण्याचा धजावला नसता, हेही लक्षात घ्यावयास हवे. विनोदाच्या अंगाने त्याच्या या निश्चिंततेकडे पाहिल्यास, राज्यात सारे काही आलबेल आहे आणि कोणत्याही समस्येस तोंड देण्याएवढा भदकमपणा तिजोरीतील पुंजीकडे आहे, याची खात्री पटते. तसे न होता, राज्याच्या एका मंत्र्याच्या अशा हलक्याफुलक्या टिप्पणीचा गदारोळ माजावा आणि त्या मंत्र्याच्या सैल जिभेतून उमटलेला सहजबुद्धीचा विनोद समाजास समजावून सांगण्याची वेळ खुद्द मुख्यमंत्र्यांवर यावी हे काही ठीक नाही. महाराष्ट्र ही विनोदाची कदर करणारी, विनोदाचा आदर करणारी आणि विनोदास निखळ दाद देणाऱ्या संस्कृतीची भूमी आहे. या भूमीत आचार्य अत्रे यांनी आपल्या विनोदी शब्दांच्या फटकाऱ्यांनी राज्यकर्त्यांस गुदगुल्या केल्या आणि हसवत हसवत अनेकांना वठणीवरही आणले. पु.ल. देशपांडेंच्यांचा विनोद याच मातीत बहरला. विनोदाचा असा प्रदीर्घ वारसा असलेल्या या भूमीत एखाद्या मंत्र्याने हलकेच केलेल्या एखाद्या विनोदाचे एवढे वावडे वाटावे आणि त्यावरून राजकारणाचे रंग दवडून निघावेत, हे विनोदाचा वारसा असलेल्या महाराष्ट्रात घडावयास नको होते. मंत्रीदेखील माणूस असतो आणि सारे काही ठाकठीक, आलबेल असल्याच्या जाणिवेने तो निश्चिंत असतो, तेव्हा एखादा विनोद सुचावा आणि विनोदास दाद देण्याच्या परंपरेने जागृत राजकारणाच्या गदारोळातही त्या विनोदाची कारंजी फुलवावी या अपेक्षेने त्याने आपली जीभ जराशी सैल सोडली, तर त्यास त्याचा जिभेचे घसरणे मानून त्यावर सर्वांनी घसरून पडावयास हवेच असे नाही. बरे, एकंदरीत समाजच गंभीर आहे, राजकारणातही सारे काही गांभीर्याने सुरू आहे असेही नाही.

एकीकडे समाजजीवनही वेगवेगळ्या कारणांनी विनोदी वाटू लागावे अशी परिस्थिती आहे. राजकारणातही अनेक जण टोमणे, कोट्या आणि विनोद करत रंग भरण्याचा प्रयत्न करत असतात. एकूणच गांभीर्याचे वातावरण सगळीकडेच कमी होत गेलेले असताना, दररोजचे जगणेच काहीसे विनोदी होत चालले असताना, त्यामध्ये आपल्याही विनोदाचा खारीचा वाटा उचलावा असे वाटून एखाद्या मंत्र्याने अशी काही टिप्पणी केलीच, तर तेही उदार मनाने समजून घ्यावयास हवे. तसे होत नसल्यामुळे समाजास विनोदाचे मर्म समजावून सांगण्याची वेळ आली तर विनोदबुद्धीचा बहर ओसरत चालल्याचे ते सामाजिक लक्षण समजावे लागेल. वसतिगृहासाठी हवा तेवढा निधी मागा, नाही दिला तर नाव सांगणार नाही, तसेही हा पैसा सरकारचा आहे, तो द्यायला आपल्या बापाचे काय जाते, हा राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांचा विचार दोन दिवसांपासून राज्यात आणि राजकारणात काहीसा गदारोळ माजवत आहे. पण विनोदाचे अंग जागृत असलेल्यांनी त्याकडे त्याच नजरेने पाहिले, तर शिरसाट यांच्यासारखा उदार राजा मिळाल्याच्या जाणिवेने त्यांना आनंदाचे भरते येईल. हा पैसा आपला नाही आणि आपल्या बापाचाही नाही, तर तो सरकारचा म्हणजेच जनतेच्या करातून व अन्य महसुलातून जमलेला असल्याने जनतेने मागत जावे आणि आपण देत जावे ही उदार मानसिकता म्हणजे स्थैर्याच्या शाश्वतीचे उत्तम उदाहरणच म्हणावे लागेल. त्यामुळेच त्यांची जीभ घसरली असे वाटून अनेकांनी त्यांच्या वक्तव्यास आक्षेप घेण्यास सुरुवात केली, तेव्हा खुद्द मुख्यमंत्र्यांना तो विनोद समजावून सांगण्याची वेळ आली. एखादा विनोद समजावून सांगण्याची वेळ कोणावरही येणे आणि एखाद्या नामवंताचे चित्र रेखाटल्यानंतर त्याची ओळख पटावी म्हणून त्याखाली त्या व्यक्तीचे नाव लिहावे लागणे या दोन्ही बाबी कलेस कमीपणा आणणाऱ्याच असतात. विनोद ही एक कलाच आहे. प्रत्येकास ती चपखलपणे जोपासता येतेच असे नाही. काही जणांकडे विनोदबुद्धी असते, पण आपल्या विनोदावर लोकांनी निखळ दाद देऊन मोकळेपणाने हसावे व विनोदाचा आस्वाद घ्यावा अशा रीतीने तो सादर करण्याची कला प्रत्येकाकडे असतेच असे नाही. शिरसाटांचे तसेच काहीसे झाले असावे. विनोद सादर करताना स्थळकाळाचे भान असावे लागते. अन्यथा, विनोदाचे अस्त्र अंगावरच उलटते. शिरसाटांचा विनोद त्यांच्यावर उलटला, त्यामागेही हेच कारण असावे. यापुढे विनोद करताना त्यांनी या बाबींचे भान राखले, तर मुख्यमंत्र्यांना पुढे येऊन तो समजावून सांगण्याची वेळ येणार नाही आणि समाजासही मोकळेपणाने दाद देण्याची मुभा राहील, एवढे त्यांनी करायलाच हवे!

## आंतरराष्ट्रीय

# भारत-अमेरिका दुराव्याचा पाकला फायदा?

प्रा. जयसिंग यादव

२०१९ मध्ये अमेरिकेतील टेक्सास येथे झालेल्या 'हाऊडी मोदी' कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या संदर्भात 'अबकी बार ट्रम्प सरकार'चा नारा दिला. पुढच्या वर्षी ट्रम्प भारतात आले, तेव्हा अहमदाबादमध्ये त्यांच्या स्वागतासाठी 'नमस्ते ट्रम्प' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ट्रम्प आणि मोदी यांची वैचारिक नाळ जुळली आहे, दोघे परस्परांचे मित्र आहेत, असे चित्र जगभर रंगवले गेले. २०२४ मध्ये पंतप्रधान मोदी तिसऱ्यांदा सत्तेत आले, तर ट्रम्प हेही चार वर्षांनंतर पुन्हा सत्तेत आले. माध्यमांनी पुन्हा दोन्ही नेत्यांमधील संबंधांच्या दृष्टिकोनातून भारत-अमेरिका संबंधांकडे पाहण्यास सुरुवात केली; परंतु गेल्या सुमारे सहा महिन्यांमध्ये असे दिसते की, दोन्ही नेत्यांमधील संबंध पूर्वीसारखे राहिलेले नाहीत. अध्यक्ष झाल्यानंतर ट्रम्प यांनी अनेक देशांवर शुल्क म्हणजेच व्यापार शुल्क लादण्याची घोषणा केली. त्यात त्यांचा भारतावर अधिक रोष आहे. भारत जगात सर्वाधिक आयात शुल्क आकारतो, असा आरोप त्यांनी वारंवार केला आहे. अमेरिकेने भारताला रशियाकडून एस-४०० क्षेपणास्त्र खरेदी करू नका, असे सांगितले होते; परंतु भारताने अमेरिकेला न जुमानता रशियाकडून ही क्षेपणास्त्रे खरेदी केली. युक्रेन-रशिया युद्ध सुरू झाल्यानंतर अमेरिका आणि 'नाटो'ने रशियावर अनेक निर्बंध लादले. हे निर्बंध धुडकावून भारत आणि चीनने रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी सुरू केली. भारताला रशियातून स्वस्तात कच्चे तेल मिळते. भारतीय कंपन्यांनी रशियातून कच्चे तेल खरेदी करून, त्यावर प्रक्रिया करून जगातील अनेक देशांना विकले. यामुळे अमेरिकेचा तिळपापड झाला आहे. रशिया आणि अमेरिकेत सध्या तणावाचे वातावरण आहे. या पृष्ठभूमीवर ही भारताने रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणे सुरूच ठेवले आहे. ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के शुल्क लावण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतरही भारताने रशियाशी मैत्रीसंबंध पूर्वीसारखेच राहतील, असे जाहीर केल्यामुळे ट्रम्प यांचे पित्त खवळले. याच वळणावर अमेरिकेने पाकिस्तानसोबत तेलाचे साठे विकसित करण्यावर करार केला. अर्थात पाकिस्तानला ते इतक्या सहजासहजी करता येणार नाही. त्याचे कारण हे साठे बलुचिस्तान प्रांतात आहेत आणि तिथे आता बंडखोरांची सत्ता चालते. अमेरिका आणि पाकिस्तानच्या करारानंतर बलुचिस्तानमधून या कराराविरोधात भाष्य व्हायला लागले आहे. ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के कर लादल्यामुळे अल्पकालीन काळात निर्यात निश्चितच कमी होईल. निर्यातदारांचे उत्पन्नही कमी होईल. त्याचा दीर्घकालीन परिणाम अधिक महत्त्वाचा आहे, कारण जर हे शुल्क एका वर्षापेक्षा जास्त काळ असेच राहिले, तर पुरवठा साखळीत बदल होऊ शकतो. पहलगाम हल्ल्यानंतर ट्रम्प यांनी आगाऊपणा केला. 'ऑपरेशन सिंदूर' आपणच थांबवायला भाग पाडले, असे त्यांनी वारंवार सांगितले. त्यामुळे विरोधकांच्या हाती आयते कोलित आले. विरोधकांनी प्रश्न उपस्थित केला की, तुम्ही द्विपक्षीय बाबींमध्ये अमेरिकेचा हस्तक्षेप कसा होऊ दिला? विशेषतः संरक्षण बाबींमध्ये नेहमीच कठोर भूमिका घेणाऱ्या भाजपाला बॅकफूटवर जावे लागले. पंतप्रधानांना संसदेत स्पष्टीकरण द्यावे लागले.

अमेरिकेला भारताकडून हवे आहे, ते भारत देऊ शकत नाही. ट्रम्प यांना वाटते की, अमेरिकेच्या कृषी उत्पादनांसाठी भारताने दरवाजे खुले केले पाहिजेत. भारताने या उत्पादनांवर आधीच कर लादून भारतीय शेती क्षेत्र संरक्षित केले आहे. याशिवाय मांसभक्षक अमेरिकन गायींचे दूध आणि दुग्धजन्य पदार्थ भारतात येऊ द्यायला अनेकांचा विरोध आहे. हा प्रश्न भावनिक झाला असून अमेरिकेशी असणाऱ्या मैत्रीसाठी भाजपा आपली मतपेढी दुखावू शकत नाही. ट्रम्प यांचा झालेला सत्कार, त्यांना मिळालेली वागणूक यामुळे त्यांचा असा समज झाला की आपण म्हणू ते मोदी करतील; परंतु तसे झाले नाही. त्यामुळे त्यांचे पित्त खवळले. ट्रम्प यांनी ज्या प्रकारे भारतावर शुल्क लादले आहे आणि रशियाकडून तेल आणि संरक्षण उपकरणे खरेदी केल्याबद्दल दंड लावला आहे, तो एक प्रकारे आपल्या सार्वभौमत्वावर हल्ला आहे. आपण कुठून काय खरेदी करावे हे अमेरिका कसे सांगू शकते? इराणसोबत व्यवसाय केल्याबद्दलही अमेरिकेने सहा भारतीय कंपन्यांवर बंदी घातली आहे. एकीकडे भारत आणि अमेरिका संबंधांमध्ये कटुता येत असताना अमेरिका आणि पाकिस्तानमध्ये तेलाच्या साठ्यांबाबत करार झाला. दोन्ही देशांमधील व्यापार कराराचीही चर्चा झाली. पाकिस्तानमध्ये या कराराचे स्वागत केले गेले आहे. त्या देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी हा एक अतिशय महत्त्वाचा करार आहे. अमेरिका आणि इतर देशांसोबतच्या राजनैतिक संबंधांसाठीही हा एक मोठा विजय मानला जात आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये पाकिस्तानची अर्थव्यवस्था खूप वाईट परिस्थितीतून गेली आहे. आता सरकार दावा करत आहे की, ती 'टेक ऑफ पोझिशन'वर आली आहे. या प्रसंगी पाकिस्तानी निर्यातीला चालना मिळाली, तर पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला मोठा आधार मिळेल. गेल्या २० वर्षांपासून किंवा त्याहूनही अधिक काळ पाकिस्तान सरकार विविध खासगी कंपन्या आणि देशांना तेलाच्या साठ्यावर किंवा वायूच्या साठ्यावर काम करण्यासाठी आवाहन करत होते; परंतु सुरक्षेच्या कारणास्तव आणि तंत्रज्ञानामुळे किंवा इतर कारणांमुळे कंपन्या येत नव्हत्या. या पृष्ठभूमीवर ट्रम्प यांनी पाकिस्तानला आश्वस्त केले आहे. एखादी मोठी अमेरिकन कंपनी त्यांच्या तंत्रज्ञानासह आली, तर ती त्यांच्याकडे असलेल्या तेल आणि वायूच्या साठ्यांचा शोध घेण्यासाठी खूप उपयुक्त ठरेल. याचा अर्थ असा की, गेल्या २० वर्षांपासून पाकिस्तान सामना करत असलेले ऊर्जा संकट सोडवण्यास मदत होईल. पाकिस्तान सरकार हा आपला राजनैतिक विजय म्हणूनही साजरा करत आहे. दरम्यान, अधिक शुल्क लादण्यात आल्याचा फटका भारतीय वस्त्रोद्योगासह अन्य उद्योगांना बसणार आहे. त्याचा फायदा पाकिस्तान आणि बांगलादेशमधील कापड उद्योगाला होईल. पाकिस्तानच्या निर्यातीत कापड उद्योगाचा वाटा ८० टक्के आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताचा विजय झाला असला, तरी पाकिस्तान मात्र आपलाच विजय झाल्याचा दावा करतो. आता तर त्याने राजनैतिक आघाडीवरही भारताचा पराभव केला आहे, असे सांगायला सुरुवात केली आहे. भारताची विमाने पाडल्याचे सांगत ट्रम्प यांनी पाकिस्तानची तळी उचलून धरली.

अमेरिकेत सरकारी तेल कंपन्या नाहीत. तिथल्या सर्व कंपन्या खासगी आहेत, मग कोणत्या कंपनीने हा करार केला आणि कधी केला, असा प्रश्न उपस्थित केला जातो. अमेरिका आणि पाकिस्तान जगाच्या डोळ्यात धूळफेक करत असल्याचा सूर तज्ज्ञांनी लावला आहे. कोणत्याही कंपनीने कोणताही करार केलेला नाही. ट्रम्प काहीही बोलतील आणि कंपन्या पाकिस्तानात येतील, असे अजिबात घडणार नाही. अमेरिकन सरकार पाकिस्तानमध्ये जाऊन काम करण्याचा आपला हेतू व्यक्त करू शकते; पण कंपन्या सुरक्षित वातावरण असतील तरच जातील. बलुचिस्तानमध्ये काम करणे किती अवघड आहे, याचा अनुभव चिनी कंपन्यांना आला आहे. या पृष्ठभूमीवर अमेरिकन कंपन्या हे कच्च्या तेलाच्या संशोधनासाठी बलुचिस्तानमध्ये कितपत येतील, याबाबत साशंकता आहे. पाकिस्तान काही काळापासून म्हणत आहे की, त्यांच्याकडे गॅस आणि तेलाचे मोठे साठे आहेत. म्यानमार आणि बांगलादेश अनेक वर्षांपासून म्हणत आहेत की, त्यांच्याकडे मोठे साठे आहेत; परंतु आंतरराष्ट्रीय कंपन्या ते प्रमाणित करेपर्यंत हे साठे वैध नाहीत. या कंपन्या वैज्ञानिक आधारावर ते प्रमाणित करतात आणि संपूर्ण जग तो डेटा पाहू शकते. अजून असे काहीही घडलेले नाही.


(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# नैराश्याच्या खोल गर्तेत राहुल गांधी

नैराश्याने ग्रासलेल्या राहुल गांधी यांनी देशविरोधी वक्तव्य करून या देशामधील १४० कोटी जनतेचा अपमान केला आहे. सत्तेसाठी वाटेल ते करण्याची परंपरा काँग्रेस पक्ष इमाने इतबारे पुढे रेटत असला, तरी त्या पक्षाच्या या नीतीने देशाचे फार मोठे नुकसान होऊ शकते, याची तमा न बाळगता राहुल गांधी मुक्ताफळे उधळीत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशहिताच्या आड येणारी प्रत्येक कृती उधळून लावत असून आपल्या धमक्यांना भीक घालीत नसल्याचे बघून चवताळलेल्या अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताच्या अर्थव्यवस्थेला 'डेड इकॉनामी' म्हणून भारताला हिणवण्याचा गंभीर प्रयत्न केला. डोनाल्ड ट्रम्प यांच्या सुरात सूर मिसळून राहुल गांधी नरेंद्र मोदी यांच्यावर तुटून पडले. डोनाल्ड ट्रम्प अगदी सत्य बोलतात असा ढिंढोरा पिटायला सुरुवात केली. राहुल गांधी यांच्या या बेताल वक्तव्याने राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाच्या देशभक्तीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सत्तेसाठी देशहित वेशीवर टांगून राहुल गांधी कोणत्याही थराला जाऊ शकतात, याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. खरे तर असे वक्तव्य देशद्रोहाचा गुन्हा ठरायला हवा. परंतु, दुर्दैवाने असे होत नाही. अमेरिका स्वतःला संपूर्ण जगाचा दादा मानत असला, तरी भारताच्या प्रगतीने त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. भारतीय अर्थव्यवस्था जगामध्ये चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत आहे. हेच डोनाल्ड ट्रम्प यांचे खरे दुखणे आहे. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची वाढ १.९ टक्के असून



चीनची ४.८ टक्के, ब्रिटनची १.२ टक्के, जर्मनी ०.१ टक्के तर जपानची अर्थव्यवस्था ०.७ टक्के एवढ्या कमी दराने पुढे सरकत आहे. तर, भारताची अर्थव्यवस्था ६.४ टक्क्याने वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. 'राष्ट्र सर्वोपरी' हे ध्येय समोर ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या एकाही कृतीला भीक घातली नाही. भविष्यामध्ये भारत जर आपल्या बरोबरीने येऊन बसला तर जगामध्ये आपणास कुत्राही विचारणार नाही, या गहन चिंतेने डोनाल्ड ट्रम्प यांची झोप उडाली आहे. संपूर्ण जग मंदीच्या सावटाखाली असताना भारतीय अर्थव्यवस्था उभारी घेत आहे. अमेरिकेच्या दादागिरीला कंटाळलेले अनेक देश त्यामुळेच भारताकडे आशेने बघत आहे. आपल्या अथक प्रयत्नांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आम्ही सर्व एक समान आहोत असा दृढ विश्वास जगामध्ये रुजविला आहे. आजमितीस प्रत्येक आघाडीवर भारत आपला ठसा जगावर उमटवित आहे. ज्या भारतीय अर्थव्यवस्थेला राहुल गांधी डेड इकॉनामी म्हणून संबोधतात त्याच राहुल गांधींनी नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्षांच्या कार्यकाळामध्ये शेअर मार्केटमध्ये करोडो रुपयांची कमाई केली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या परिवारानेही भारतामध्ये उद्योगामध्ये करोडो रुपये गुंतविले आहेत. भारताच्या मुंबई, पुणे, गुरुग्राम आणि कोलकाता या चार शहरांमध्ये ट्रम्प टॉवरची मालमत्ता आहे. ट्रम्प टॉवरमध्ये लक्झरी अपार्टमेंट असून या प्रॉपर्टीची किंमत फार जास्त आहे असे म्हणतात. डोनाल्ड ट्रम्प परिवाराने भारतात ट्रम्प कार्ड खेळून मोठी कमाई केली आहे. त्यामुळे राहुल गांधी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना जाब विचारायला हवा. जर भारतीय अर्थव्यवस्था मृतप्राय असेल तर ट्रम्प टॉवरची करोडोंची मालमत्ता कशी विकली जात आहे. परंतु, काँग्रेस पक्षाचा इतिहास बघता राहुल गांधींकडून अशा देशहिताच्या गोष्टीची अपेक्षा करताच येऊ शकत नाही. मताच्या लालसेपायी लांगूलचालन करणाऱ्या काँग्रेस पक्षाचे ओझे भारतीय जनतेने कधीचेच फेकून दिले आहे. हे अजूनही राहुल गांधी यांच्या लक्षात येत नाही. देशहित बाजूला ठेवून परकीय शक्तीशी हातमिळवणी करणाऱ्या काँग्रेसला जनतेने गव्हामधील खड्यासारखे उचलून बाहेर फेकले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वारंवार अपमानित करूनही आपले ध्येय साध्य होत नाही, हे लक्षात येताच राहुल गांधी आता देशविरोधी वक्तव्य करून स्वतःचे हसे करून घेत आहेत. आपल्या नावापुढे 'गांधी' हे बिरूद लावलेल्या या परिवारास देशाने काय नाही दिले; त्याची परतफेड तर दूरच, उलट राहुल गांधी यांनी भारताला जगामध्ये बदनाम करण्याचा चंग बांधल्याचे दिसून येत आहे. हे कोणाच्या इशाऱ्यावर होत आहे, हे शोधण्याची खरी गरज आहे.

९८८१७१७८५६

## इतस्ततः

# शिक्षण आणि रोजगार : सारे बेजार!

दत्तात्रेय आंबुलकर

आपल्याकडे गेल्या ५० वर्षांत एकीकडे शैक्षणिक क्षेत्रातील उच्च-शिक्षणाचा प्रसार आणि व्याप वाढत आहे. दरवर्षी वाढणाऱ्या या संख्येत उच्च-माध्यमिक, पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण घेत असतानाच आज मोठ्या प्रमाणात सुशिक्षित बेरोजगारांची संख्याही देश आणि समाजापुढे उभी ठाकली आहे. या सुशिक्षित विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण मिळत नाही; विविध उद्योग क्षेत्रांना त्यांच्या कौशल्यविषयक गरजांची पूर्तता करणारे विद्यार्थी-उमेदवारही त्यामुळे मिळत नसल्याची तक्रार विद्यार्थी-पालक व उद्योग क्षेत्रातून सातत्याने होत असल्याचे दिसून येते.

१९६० च्या दशकातील शैक्षणिक अभ्यासक्रम व पद्धतीनुसार विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील उच्च शिक्षणामध्ये, कौशल्य विकास शिक्षणासंबंधित विकासाची जोड देण्यावर औपचारिकपणे पहिल्यांदाच विचार करण्यात आला. कोणत्याही स्वरूपातील शिक्षणाला प्रत्यक्ष प्रशिक्षणाची जोड मिळाली, तरच त्यातून संबंधित विद्यार्थी-उमेदवारांना नोकरी मिळून रोजगार निर्मिती होऊ शकते. अभ्यासक्रमावर आधारित पुस्तकी ज्ञान वा पदविका-पदवी, प्रत्येक नोकरी-रोजगारासाठी पूरक ठरेलच असे नाही. यातूनच शैक्षणिक अभ्यासक्रमांना व त्यातही विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या जोडीला, कौशल्याची जोड देण्याची वाढती मागणी उद्योगविश्वातून होऊ लागली.

महाविद्यालये वा विद्यापीठांमधून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना, कौशल्य प्रशिक्षण देण्याची कल्पना शिक्षण व उद्योग क्षेत्रांतर्गतच्या विचारविनिमयातून पुढे आली. यातूनच अभियांत्रिकी-तंत्रज्ञानासारख्या विषयांमधून नव्याने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना, त्यांच्या शैक्षणिक विषयाशी संबंधित प्रत्यक्ष सराव व विषयतज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळण्यासाठी, उमेदवारी प्रशिक्षण कायद्यांतर्गत व्यापक प्रशिक्षण योजना अस्तित्वात आली. यामुळे महाविद्यालयीन शिक्षणामध्येच विषयाशी संबंधित प्रशिक्षणाची जोड मिळू लागली. त्यापूर्वी चीनसारख्या उद्योगप्रधान देशाने जागतिक स्तरावर दाखवून दिले होते की, जेव्हा तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये विविध विषयातील शिक्षणाला मार्गदर्शनासह प्रत्यक्ष सरावाची योजनापूर्वक जोड दिली जात नाही, तोपर्यंत देशाच्या उद्योग-व्यवसायाच्या वाढीसाठी त्याचा परिणामकारक उपयोग होत नाही. चीनने ३० वर्षांमध्ये ४५ हजार किमीचे बुलेट ट्रेनचे जाळे जागतिक स्तरावर सर्वप्रथम विणल्याचा व्यावहारिक दाखला त्यावेळी दिला गेला.

विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्राप्रमाणेच इतर क्षेत्र व अभ्यासक्रमांमध्ये केवळ पाठ्यपुस्तके व शैक्षणिक अभ्यासक्रम कधीच पुरेसा ठरू शकत नाही. गैर अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्येही, शैक्षणिक अभ्यासक्रम व पात्रतेला संबंधित क्षेत्र वा विषयातील ज्ञानाची जोड मिळणे तेवढचे महत्त्वाचे ठरते. अशा प्रकारे अभ्यासासह ज्ञान असणारे विद्यार्थी-उमेदवार, स्वाभाविकपणे अधिक रोजगारक्षम ठरतात. एवढेच नव्हे, त्यांच्या संबंधित क्षेत्रातील ज्ञानाचा उपयोग त्यांना, प्रसंगी संबंधित विषय-क्षेत्रातील अधिक जाणकार बनवतात. उद्योग-व्यवसायाला नेहमी अशाच अनुभवी आणि ज्ञानसंपन्न कौशल्यप्राप्त उमेदवारांची गरज भासते. अर्थात त्याचवेळी शासन-शिक्षण क्षेत्राला या मुद्याची जाणीव झाली की, विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील फक्त शिक्षण दिल्याने, विद्यार्थ्यांमध्ये त्या त्या क्षेत्रातील कौशल्ये निर्माण होतातच असे नाही. मात्र, त्यांच्यामध्ये शिक्षण व कौशल्य विकास दोन्ही केल्यास, त्यांना नोकरी-रोजगार मिळण्यासाठी त्याचा फायदा नक्कीच होऊ शकतो. गैर-अभियांत्रिकी शिक्षण-कौशल्याच्या संदर्भात हीच बाब सांगता येईल. यासंदर्भातील प्रमुख उदाहरण पुणे-खडकवासला येथील 'राष्ट्रीय संरक्षण अकादमी' (एनडीए) चे देता येईल. त्याठिकाणी प्रशिक्षित युवा उमेदवार संरक्षण क्षेत्राशिवाय संगणकशास्त्र, प्रशासन, कायदा, वित्तीय सेवा इ. क्षेत्रांत, सहज व सक्षमपणे कार्यरत होऊ शकतात. हीच बाब वाणिज्य, कर क्षेत्र, बँकिंग इ. क्षेत्रांतील प्रशिक्षित उमेदवारांच्या संदर्भातही सांगता येईल. अशा प्रशिक्षित व कौशल्यपूर्ण उमेदवारांचा फायदा, उद्योग-व्यवसाय क्षेत्राला कायमस्वरूपी व दीर्घकालीन संदर्भात होतो.

शिक्षण-प्रशिक्षण व त्याद्वारे नोकरी-रोजगारासाठी आवश्यक कौशल्यप्राप्ती व विद्यार्थी-उमेदवारांना मिळणाऱ्या प्रत्यक्ष संधी यासंदर्भात करण्यात आलेल्या एका अभ्यासानुसार, ३.५ कोटी विद्यार्थ्यांपैकी सुमारे ६० टक्के विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाशी संबंधित नसणाऱ्या क्षेत्रात नाईलाजाने नोकरी स्वीकारावी लागत असल्याचे समोर आले. हीच आजची समाजातील वस्तुस्थिती आहे. या अभ्यासात स्पष्ट झालेली अन्य बाब म्हणजे, अभ्यासात समाविष्ट दोन कोटी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या शिक्षणातून, त्यांना रोजगाराची संधी मिळू शकली नाही व त्यांचे शिक्षण यासंदर्भात पूर्णपणे निरुपयोगी ठरले. यासंदर्भात शासन, शैक्षणिक संस्था व शिक्षक-प्रशिक्षक या साऱ्यांपुढे निर्माण होणारा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, पदवी-पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात शिक्षण-पात्रता व कौशल्यांसह रोजगार क्षमता यांची नेमकी सांगड कोण व कशी घालणार? अशा प्रकारचे प्रयत्न आणि त्यांची यशाची अंमलबजावणी यावरच विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास व त्याद्वारे रोजगार क्षमता अवलंबून राहणार असून त्यासाठी उद्योग-व्यवसायांचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक असणार आहे.

उद्योगांसह शिक्षण व कौशल्य क्षेत्रांचे संयुक्त प्रयत्न यासंदर्भात यशस्वी होतात, असे प्रयोग काही सरकारी व खासगी कंपन्यांनी केले आहेत. ज्या कंपन्यांनी नव्याने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थी-उमेदवारांसाठी कौशल्य विकासाचे उपक्रम राबविले, त्यांनी त्यासाठी प्रसंगी आर्थिक, मार्गदर्शनपर प्रशिक्षण, संसाधनांचा वापर व आवश्यक अशा सर्व प्रकारची गुंतवणूक केली होती, हे उल्लेखनीय आहे. विद्यार्थ्यांच्या कौशल्यवाढीसाठी उद्योग-व्यवसायातील विज्ञान-तंत्रज्ञान व संशोधन-विकास, याच धर्तीवर प्राधान्यासह गुंतवणूक करणे गरजेचे ठरते. ही गुंतवणूक त्यांना व्यावसायिकदृष्ट्या फायदेशीर ठरते. कारण संबंधित व्यवसाय-उद्योगाला त्यांच्यासाठी आवश्यक असेच शिक्षित-प्रशिक्षित उमेदवार सहजगत्या मिळतात. यासाठी त्यांना वेगळा खर्च करावा लागत नाही. शिक्षण क्षेत्र व विद्यापीठ स्तरावरसुद्धा नव्या संदर्भासह विशेष प्रयत्नांची नेहमीच गरज भासते. विशेषतः अभियांत्रिकी, विज्ञान-तंत्रज्ञान, संशोधन, व्यवस्थापनशास्त्र, आर्थिक पैलू, व्यवसायविस्तार इ. विषयांचा विचार व समावेश शैक्षणिकदृष्ट्या केला जाणे आवश्यक ठरते. यासाठी शासन, प्रशासन व व्यवस्थापन या सर्वच स्तरांवरील प्रयत्न लक्षात घेऊन, तशी अंमलबजावणी करायला हवी.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

## वाचक पत्रे


### हिंदू आतंकवाद हा वदतोव्याघ्यात

१७ वर्षांपूर्वी काँग्रेसने मालेगाव बॉम्बस्फोट केसमध्ये हिंदू आतंकवाद हा विकृत शब्द चलनात आणला. हिंदू जन्माने, मनाने, विचाराने मानवतेचा पूजक होता, आहे आणि राहील. हिंदू आतंकवाद हा वदतोव्याघ्यातच म्हणावा लागेल. थंडगार आग किंवा गरम बर्फ जसे वदतोव्याघ्यातचे उदाहरण आहे तसेच हिंदू आतंकवाद. मुंबई साखळी स्फोटात १२ बॉम्बस्फोट झाले असताना काकांनी मुस्लिम वस्तीत १३ वा बॉम्बस्फोट झाला, असे स्फोटक(?) विधान करून त्याची आता कबुलीही दिली. किती हा सच्चेपणा(?). शुक्रवार असल्याने पकडलेले गुन्हेगार शुक्रवारी असा भयानक अपराध करूच शकत नाही, असे म्हणत गुन्हेगार शोधाचा बह्याबोळ केला. खरे अपराधी वाचवण्याकरिता हिंदू आतंकवादी हा नरेटिव्ह सेट केला गेला, जर शांततेत प्रार्थना करणारे सात लोक धर्मस्थानाजवळ मारले गेले असतील तर ते निश्चितच अयोग्य आहे; पण खरे अपराधी सापडू नये म्हणून एका खरोखर शांतिप्रिय धर्मालाच आतंकवादी म्हणणे ही काँग्रेसची (अ)नीती राहिली आहे. पुलवामा, सर्जिकल स्ट्राईक, पहलगाम, ऑपरेशन सिंदूरवर सतत भ्रम निर्माण करणारे आता तरी माफी मागतील का?

**रवी वाघमारे**/नागपूर

### शिवाला बेल अर्पण करण्याचे शास्त्र

श्रावण मासात महादेवाची आराधना करतात. श्रावण सोमवारी उपवास करून शिवाची विधिवत पूजा करतात. श्रावण महिन्यातील दर सोमवारी शंकराच्या देवळात जाऊन त्याची पूजा करावी आणि शक्य असल्यास निराहार उपवास करावा. शिवाला बेल अतिशय प्रिय आहे आणि म्हणूनच बेलपत्राचे फार महत्त्व आहे. तीन पाने असलेले बेलाचे पान त्रिगुणाचे प्रतीक असून भगवान शंकराच्या तीन डोळ्यांप्रमाणे आहे. बेलाचे पान शिवपिंडीवर उपडे वाहिल्यावर शिवतत्त्वाचा अधिक प्रमाणात लाभ होतो. बेलाच्या पानाचे अग्र देवाकडे आणि देठ आपल्याकडे करून बेलाचे पान वाहावे. शिवाला



बेल ताजा न मिळाल्यास शिळा चालतो; परंतु सोमवारचा बेल दुसऱ्या दिवशी चालत नाही. समुद्र मंथनातून निघालेले विष प्राशन केल्यावर भगवान शंकराला घशात जळजळ होऊ लागली; तेव्हा त्यांच्या डोक्यावर बेलाचे पान ठेवण्यात आले. बेलामध्ये विषनिवारक गुणधर्म आहेत. त्यामुळेच विषाचा प्रभाव कमी झाला. तेव्हापासून शिवाला बेल अर्पण करण्याची परंपरा सुरू झाली. असे म्हणतात की, शंकराच्या पुजेत इतर कुठले साहित्य नसले तरी चालेल; फक्त एक बेलाचे पान शिवपिंडीवर अर्पण केले तरी शंकर पुजेचा स्वीकार करून आशीर्वाद देतात.

**वर्षा आवदे**/नागपूर

### काँग्रेसवर कायदेशीर कारवाई करा

मालेगाव बॉम्बस्फोट खटल्याचा न्यायालयाने निकाल दिल्यानंतर अनेक धक्कादायक खुलासे, माहिती बाहेर येत आहे. मालेगाव मधील २००६ आणि २००८ या वर्षांमध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या दोन वेगवेगळ्या बॉम्बस्फोटात अनेक निरपराध नागरिक मारले गेले आणि शेकडो जखमी झाले. २००६ चा दहशतवादी हल्ला 'सिमी'ने पाकिस्तानी अतिरेक्यांच्या मदतीने केला होता. नंतर या अतिरेक्यांवरील आरोप महाराष्ट्रातील तत्कालीन काँग्रेस सरकारने रद्द केले. पाकिस्तानी अतिरेक्यांना पाकिस्तानात जाऊ दिले आणि ती केस बंद केली. त्यानंतर २००८ मध्ये मालेगावात पुन्हा बॉम्बस्फोट घडवले. यावेळी काँग्रेसच्या नेत्यांनी केलेल्या कारस्थानाप्रमाणे त्यांना हिंदू आतंकवादाला जन्म द्यायचा होता. या खटल्याचा निकाल देताना न्यायालयाने अत्यंत गंभीर टिप्पणी केल्या आहेत. या खटल्याच्या तपासात सहभागी असलेल्या तत्कालीन महाराष्ट्र एटीएसचे अधिकारी महबूब मुजावर यांनी केलेल्या खुलाशांमुळे या प्रकरणाचे गांभीर्य खूपच वाढले आहे. मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यांमध्येही हिंदू संघटनांच्या नेत्यांना अडकवण्याचा काँग्रेसचा डाव असल्याचाही खुलासा होत आहे. ही सगळी देशविरोधी कारस्थाने करून देशात, आपल्या तथाकथित मतपेढीला खूश करण्यासाठी, धार्मिक तणाव निर्माण करण्याचा काँग्रेसच्या नेत्यांचा मनसूबा होता, हे स्पष्ट आहे. न्यायालयाने सगळ्या संशयित आरोपींना निर्दोष सोडल्यामुळे बॉम्बस्फोट करून सर्वसामान्य नागरिकांना मारणारे मूळ आरोपी कोण होते, याचा तपास करणे अत्यावश्यक आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# रेल्वे पूल पाडण्यासाठी सर्व मंजुरी मिळाल्या, एका दिवसात पाडणार

## आषाढी वारी म्हणजे मिनी कुंभ; विभागीय रेल्वे व्यवस्थापक सुजित मिश्रा



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट -** मरीआई चौकातील असलेला पूल पाडण्यासाठीचा सर्व परवानग्या गेल्या पाच ते सहा महिन्यात घेतल्या आहेत. पूल पडण्यावेळेस काही रेल्वे गाड्या बंद ठेवण्यात येतील तर काही गाड्यांचे मार्ग बदलण्यात येतील. एका दिवसात रेल्वे पूल पाडण्यात येईल. पूल पाडण्यासाठी सर्व मंजुरी मिळाल्या आहेत अशी माहिती विभागीय रेल्वे व्यवस्थापक सुजित मिश्रा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

आषाढी वारी म्हणजे मिनी कुंभ असल्याचे मला वाटते. या एकादशी मध्ये एकही अपघात, चोरी अश्या कोणत्याही घटना घडल्या नाहीत. नियोजनबद्ध बंदोबस्त करण्यात आला होता.



गेल्या वर्षीपेक्षा लोकांची संख्या ही २४ टक्के जास्त होती तर रेल्वेच्या उत्पन्नांचे २५ टक्के वाढ झाली. पंढरपूर मध्ये झालेल्या आषाढी वारीमध्ये रेल्वे प्रशासनाच्या वतीने उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल डी आर एम ऑफिस कडून ५० हजारांचे बक्षीस देण्यात आले. मध्य रेल्वे व्यवस्थापक यांनी ७५ हजाराचे बक्षीस दिले आणि विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांच्याकडून एकावन्न ५१ हजाराचे सोलापूरच्या टीमला बक्षीस असे एकूण १ लाख ७६ हजराचे बक्षीस सोलापूर रेल्वे विभागाच्या टीमला मिळाले असल्याची माहिती देण्यात आली. यावेळी विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील, विभागीय कार्मिक अधिकारी मच्छिंद्र गळवे, जनसंपर्क निरीक्षक विक्रम सिंग आदी उपस्थित होते.

## इंडिया आघाडीच्या बैठकीला उद्धव ठाकरे जाणार

**नवी दिल्ली :** इंडिया आघाडीची बैठक राजधानी दिल्लीत होणार असून उद्धव ठाकरे दिल्लीला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. विधानसभा निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर इंडिया आघाडीची बैठक झाली नाही. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच होणार असल्याने आता बैठक आयोजित करण्यात आली आहे. उद्धव ठाकरे ६ ऑगस्ट रोजी सायंकाळी दिल्लीत पोहोचणार असल्याची माहिती आहे.

## आयुर्वेदिक वनस्पती दिनानिमित्त आयुर्वेदिक रोपांचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-** पतंजली योग समितीच्या माध्यमातून श्री आचार्य गुरु बाळकृष्ण यांच्या वाढदिवसानिमित्त औषधी वन दिवस साजरा केला जातो. त्याच अनुषंगाने पतंजली योग समितीच्या माध्यमातून औषधी वनस्पतीचे वाटप करण्यात आले.

शुभराय मठ येथे होमहवन व औषधी वनस्पती वाटप करण्यात आले. उपस्थिती महाराष्ट्र प्रभारी अध्यक्ष सुधाताई आळ्ळीमोरे, संगीता जाधव, नीलिमा शितोळे शास्त्री, सुतार व पतंजली योग समितीच्या सर्व सदस्या उपस्थित होते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षीमध्ये पर्यावरण दूत डॉ. मनोज देवकर यांच्या विशेष सहकार्यामुळे ही १०१ औषधी वनस्पती उपलब्ध करून योग समितीला देण्यात आले. हा सप्ताह वृक्ष लागवड व वृक्ष वाटप म्हणून करण्यात येणार आहे सोलापुरात विविध ठिकाणी औषधी वृक्षांची लागवड होणार आहे.


### महाराष्ट्र महसूल व वन विभाग
### तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात
संकलन अभिलेख कक्ष
दूरध्वनी नं. ०२१८१-२२०२३३ Email- tahakkalot@.gmail.com
जा.क्र.२०२५/अभिलेख/कावि/०४/२०२५ दि. ०४/०८/२०२५

### जाहिर प्रसिध्दीकरण
प्रति,
**श्री. महमदफारुख बंदेनवाज बागवान** - **अर्जदार**
रा. सलगर, ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय** - **सामनेवाल**
**ग्रामपंचायत, सलगर, ता. अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील महमदफारुख बंदेनवाज बागवान रा. सलगर ता. अक्कलकोट जि. सोलापूर यानी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा जन्म दि. ०२/०१/१९९६ रोजी मौजे सलगर ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या जन्माची नोंद हे साम नेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद करुन महमदफारुख यंदेनवाज बागवान या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म-मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ०९/०७/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल. हे आज दि. ०४/०८/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसीलदार, अक्कलकोट**




## लोकमान्य टिळक जहाल राष्ट्रवादाचे जनक : डॉ. काकडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-** ब्रिटिशांविरुद्ध देशातील नागरिकांचा स्वाभिमान राष्ट्रवाद देशभक्ती प्रफुल्लित करण्याचे कार्य लोकमान्य टिळक यांनी केले त्यामुळे जहाल राष्ट्रवादाची पायाभरणी मजबूत झाली म्हणूनच भारत स्वातंत्र्याची चळवळ गतिमान झाली असे प्रतिपादन इतिहास संशोधक डॉ नभा काकडे यांनी व्यक्त केली.मराठी साहित्य मंडळ कलबुर्गी यांच्यावतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त डॉ वा कृ जोशी सभागृहात लोकमान्य टिळक आणि राष्ट्रवाद या विषयावर डॉ काकडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते त्यावेळी त्या बोलत होता व्यासपीठावर डॉ सुभाष शहा सौ शितल देऊळगावकर अँड पवनकुमार देशपांडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा सर्वोत्तम सताळकर यांनी केले सूत्रसंचलन डॉ. योगेश देशपांडे यांनी केले. विद्याधर मुरूमकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रा पुष्पा आगरकर व प्रा सुलभा पिशवीकर उपस्थित होते.

### मराठी साहित्य मंडळाच्यावतीने विद्यार्थ्यांना पारितोषिके

मराठी साहित्य मंडळाच्या वतीने लोकमान्य टिळक यांच्या जीवन कार्यावर वक्तृत्व व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या त्या स्पर्धेत विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे डॉ नभा काकडे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. यावेळी व्यासपीठावर सतीश देशपांडे, डॉ. सास्तुरकर, डॉ. वैद्य प्रभाकर सलगरे, गुरुया स्वामी, शोभा रामदुर्ग, डॉ किशोर देऊळगावकर उपस्थित होते.


### नावात बदल
माझे जुने नाव - **सृष्टी** असे होते ते बदलून मी माझे नवीन नाव - **सृष्टी राहुल मुळे** असे केले आहे. (पत्ता - प्लॉट नं. बी-३०, रामचंद्रप्पा शेटे विहार, विजापूर रोड, पोदार इंटरनॅशनल शाळेजवळ, राजस्व नगर, सोलापूर)
**अफि. नं. ३७५६९**
**दि. ०४/०८/२०२५**



### महाराष्ट्र महसूल व वन विभाग
### तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात
संकलन अभिलेख कक्ष
दूरध्वनी नं. ०२१८१-२२०२३३ Email- tahakkalot@.gmail.com
जा.क्र.२०२५/अभिलेख/कावि/०५/२०२५ दि. ०४/०८/२०२५

### जाहिर प्रसिध्दीकरण
प्रति,
**श्री. बंदेनवाज हसन बागवान** - **अर्जदार**
रा. सलगर, ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय** - **सामनेवाल**
**ग्रामपंचायत, सलगर, ता. अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील बंदेनवाज हसन बागवान रा. सलगर ता. अक्कलकोट जि. सोलापूर यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा जन्म दि. ०१/०६/१९७२ रोजी मौजे सलगर ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतु माझ्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद करुन बंदेनवाज हसन बागवान या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म-मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ०९/०७/२०२५ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल. हे आज दि. ०४/०८/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसीलदार, अक्कलकोट**



### जाहीर समन्स व नोटीस
रे.मु. नं-३७२/२०२४
### मोहोळ येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
**श्रीमती सुनिता संभाजी केवळे - वादी**
विरुद्ध
**शहनाज बाबाजान कोरबू वगैरे - प्रतिवादी**
**वशिम नजरमहम्मद खान - नि. प्रतिवादी**
राहणार पत्ता - १) क्रांती नगर, मोहोळ
१) सिध्दार्थ नगर, मोहोळ

ज्याअर्थी वादी यांनी वशिम नजरमहम्मद खान यांना या कामी नियोजित प्रतिवादी क्रमांक ४ म्हणून सामील करणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे. तसेच सदर इसमास वेगवेगळे पत्त्यावर मा. न्यायालयाने बेलिफ मार्फत समन्स / नोटीस बजावण्याचे साठी गेले असता नि. प्रतिवादी त्या पत्यावर मिळून येत नाही. असा शेरा मारून समन्स परत करण्यात आले आहे. त्यामुळे दाव्याचे काम लांबणीवर पडत आहे. त्याअर्थी उपरोक्त दाव्या कामी आपणांस प्रतिवादी क्रमांक ४ म्हणून सामील करणे बद्दल दिलेल्या अर्जास म्हणणे देणे कामी दिनांक १२/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता आपले विधिज्ञामार्फत या न्यायालयात हजर राहावे उपरोक्त तारखेस हज हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येऊन एकतर्फी आदेश पारित होईल तो तुमच्यावर बंधनकारक राहील. दिनांक - ०३/०७/२०२५ रोजी मा. न्यायालयाच्या सही शिक्कयानिशी ही जाहीर समन्स व नोटीस दिली.

कोर्टाचा शिक्का
**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, मोहोळ**



### जाहीर नोटीस
तमाम लोकांस विशेषतः मौजे झाडी, ता. बार्शी येथील व त्या परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे - झाडी, ता. बार्शी येथील, जमीन गट नं. १९८ क्षेत्र ०० हे. ५६ आर, आकार ०० रू. १२ पै., या जमीनीपैकी मधील बाजू पैकी, उत्तरेकडील बाजूची २००० चौ. फुट मापाची प्लॉटची जागा, याची पुर्व बाजू फुट २३.९ इंच, दक्षिण बाजू ३४ फुट, पश्चिम बाजू ४७.६ इंच आणि उत्तर बाजू फुट ४२, या मापाची खुली प्लॉटची जागा, यासी **चतुःसिमा :- पुर्वेस -** ८ फुटाचा रस्ता, **दक्षिणेस -** अभिजित जगदाळे, **पश्चिमेस -** सचिन मते यांची जागा, **उत्तरेस -** शाहू लोखंडे यांची जागा, येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक वर्णनाची प्लॉटची जागा, आतील सर्व तदंगभूत वस्तुसह, याचा ग्रामपंचायत घर नंबर ३१८ असून, याचे वागणूक व पाणी पूर्व बाजूने जाते व आहे.

सदरची प्लॉटची जागा संपत रामहारी मते रा. झाडी, ता. बार्शी यांनी, आमचे अशिलास, र.रू. १,००,०००/- (अक्षरी रू. एक लाख) या किंमतीस, कायमखुष खरेदी देण्याचे ठरवून, ता. २४/०९/२०१४ रोजी सदरची रक्कम रोख घेवून, आमचे अशिलाचे हक्कात, करारपत्राचा नोटरीकृत दस्त लिहून नोंदवून दिला. तसेच कराराचा एक भाग म्हणून, सदर मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जाही, त्यांनी आमचे अशिलास दिला. त्या दिवशीपासून सदर जागेत, आमचे अशिलाची मालकी हक्काने कब्जेवहीवाट होती व आहे.

सदरची जागा झाडी गावचे गावठाणालगत असल्याने, ग्रामपंचायत झाडी यांनी, सदरची जागा गावठाणात समाविष्ट करून, त्या जागेस ग्रामपंचायत घर नं. ३१८ हा दिलेला आहे. सदर जागेत, आमचे अशिलाचे राहते घर, जनावराचा गोठा, सरफेस बोअर, तसेच शेती अवजारे आहेत. ते या जागेचा मालक या नात्याने, ग्रामपंचायतीचे कर भरत आलेले आहेत.

सदर जागेचे ग्रामपंचायत मालमत्ता रजिस्टरला, आमचे अशिलाचे नावाची नोंद झालेली आहे. परंतु सदर गट नं. १९८ जमीनीचे रेकॉर्ड ऑफ राईटला, संपत मते यांचे नावाची पोकळ नोंद आहे. सदर पोकळ नोंदीचा गैरफायदा घेवून, सदर संपत मते सदर मिळकतीची विल्हेवाट लावण्याचे व रक्कम हडप करण्याच्या प्रयत्नात आहे.

तेव्हा सदर संपत मते याचेशी, सदर जमीनीस असणाऱ्या पोकळ नोंदी आधारे, कोणीही, त्यांचे बरोबर, गहाण, दान, लिज, भाडेपट्टा, बक्षिसपत्र, खरेदी, वहीवाटीचे हक्क, फेडपत्र, तसेच अन्य हस्तांतरणाचे स्वरूपाचे व्यवहार आणि कर्ज बोजाचे स्वरूपाचे व्यवहार करू नयेत, केलेस ते बेकायदेशीर व रद्दबातल होतील. तसेच आमचे आशिलाचे हक्क हिश्यावर बंधनकारक राहणार नाहीत. तशा स्वरूपाचे व्यवहार करणाऱ्यावर आमचे आशिल कायदेशीर कारवाई करतील. मग खर्चाची व परिणामाची संपूर्ण जबाबदारी त्यांचेवरच राहील. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून हि जाहीर नोटीस दिली. कळावे ता. ०१/०८/२०२५

**सही/-**
**ॲड. श्री. गुंड एस.एम. (लाडोळेकर)**
**ॲड. श्री. गुंड ए.एस. (लाडोळेकर)**
**ॲडव्होकेटस्, बार्शी 'सदानंद' ७३०/२/३७**
**सिध्देश्वर नगर, कासारवाडी रोड,**
**बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**अभिजित सुरेश जगदाळे, रा. झाडी, ता. बार्शी**
**तर्फे ॲडव्होकेट्स**



विठ्ठल प्रतिष्ठान निमगाव (टे.) संचलित व
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी मान्यताप्राप्त
### आर्या कृषी महाविद्यालय
मानेगाव, ता. माढा, जि. सोलापूर ४१३४१०
B.Sc. (Hons.) Agriculture पदवी
### प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया कार्यक्रम २०२५-२६
कॉलेज कोड : ११३१८
केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया वेळापत्रक

| | |
|---|---|
| प्रथम प्रवेश फेरी प्राधान्यक्रम देण्याचा कालावधी | ०६/०८/२०२५ व ०७/०८/२०२५ |
| द्वितीय प्रवेश फेरी प्राधान्यक्रम देण्याचा कालावधी | १३/०८/२०२५ व १४/०८/२०२५ |
| तृतीय प्रवेश फेरी प्राधान्यक्रम देण्याचा कालावधी | २०/०८/२०२५ व २१/०८/२०२५ |
| रिक्त जागांकरिता केंद्रीयभूत केंद्रनिहाय प्रवेश फेरी | २९/०८/२०२५ ते ०३/०९/२०२५ |
| महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरी | ०४/०९/२०२५ व ०८/०९/२०२५ |

**अधिक माहितीसाठी**
**सीईटी सेल संकेतस्थळ** : https://agri2025.mahacet.org/
**संपर्क** : डॉ. नितीन उबाळे प्राचार्य (९९७५६७८१७५)
**प्रवेश प्रक्रिया विभाग प्रमुख** : प्रा. तुषार नामदे (८२७५९२३७८९)
**ई-मेल** : vitthalpratishthan55@gmail.com



### जाहीर समन्स
### अपर मुख्य सचिव तथा विशेष कार्य अधिकारी (अ. व रि.),
महसूल व वन विभाग, मुख्य इमारत, पहिला मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
क्र. आरटीएस-३७२४/प्र.क्र.५१७/ज-५, प्र.क्र. ०२ (०१)२०२५ अवपु

**शामसुंदर मोहनदास मेहता** - **अर्जदार**
विरुध्द
**प्रकाश रामराव मोतीवाले व इतर** - **गैरअर्जदार**

मौजे मजरेवाडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथील गट क्रमांक ११३/२/१-ब/१ या वादमिळकतीविषयीच्या उपआयुक्त (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे यांच्या दि. ३१/०३/२०१८ रोजीच्या आदेशाविरूध्द प्रस्तुत अर्जदार यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम २५७ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाकडे दाखल केलेला फेरतपासणी अर्जावर अपर मुख्य सचिव (अपिल व रिव्हीजन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुबई यांचेकडे सुनावणीची कार्यवाही सुरू आहे.

२. सदर फेरतपासणी अर्जाच्या अनुषंगाने दि. ०१/०८/२०२५ रोजी आयोजित सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आले की, खालील तक्त्यात नमुद गैरअर्जदार यांना पाठविण्यात आलेली दि. ०७/०३/२०२५ व दि. १६/०५/२०२५ रोजीची सुनावणीची नोटीस सदर इसम तेथे राहत नसल्यामुळे किंवा पत्ता अपुर्ण असल्यामुळे परत आलेली आहे.

| अ. क्र. | गैरअर्जदाराचे नाव व पत्ता | प्रतिवादीचे नाव व पत्ता |
|---|---|---|
| १ | **श्रीमती अन्नपुर्णा गुरूप्रसाद शागालोलू,** रा. मॉर्डन हायस्कूल समोर, दक्षिण सदर बझार, सोलापूर | नमुद पत्त्यावर राहत नाही. |
| २ | **कांचन गुरुप्रसाद शागालोलू,** रा. मॉर्डन हायस्कूल समोर, दक्षिण सदर बझार, सोलापूर | नमुद पत्त्यावर राहत नाही. |
| ३ | **अश्विनी गुरुप्रसाद शागालोलू,** रा. मॉर्डन हायस्कूल समोर, दक्षिण सदर बझार, सोलापूर | नमुद पत्त्यावर राहत नाही. |
| ४ | **सपना गुरुप्रसाद शागालोलू,** रा. मॉर्डन हायस्कूल समोर, दक्षिण सदर बझार, सोलापूर | नमुद पत्त्यावर राहत नाही. |
| ५ | **आनंद गुरुप्रसाद शागालोलू,** रा. मॉर्डन हायस्कूल समोर, दक्षिण सदर बझार, सोलापूर | नमुद पत्त्यावर राहत नाही. |
| ६ | **मल्लिकार्जुन महादेव कळसदौवरू,** रा. २००/५ दक्षिण सदर बझार, मॉर्डन हायस्कूल समोर, सोलापूर | नमुद पत्त्यावर राहत नाही. |
| ७ | **केशव विठ्ठलराव शागालोलू,** रा. विकास हाटेलच्या पाठीमागे, रेल्वे लाईन्स, सोलापूर | नमुद पत्त्यावर राहत नाही. |
| ८ | **पंडीत विठ्ठलराव शागालोलू,** दक्षिण सदर बझार, सोलापूर | नमुद पत्त्यावर राहत नाही. |
| ९ | **विक्रम विठ्ठलराव शागालोलू,** दक्षिण सदर बझार, सोलापूर | नमुद पत्त्यावर राहत नाही. |
| १० | **संजय विठ्ठलराव शागालोलू,** दक्षिण सदर बझार, सोलापूर | नमुद पत्त्यावर राहत नाही. |
| ११ | **श्रीमती शेवंताबाई विठ्ठलराव शागालोलू,** दक्षिण सदर बझार, सोलापूर | नमुद पत्त्यावर राहत नाही. |

३. फेरतपासणी अर्जातील उक्त नमुद पक्षकारांना सुनावणीची नोटीस प्रयत्न करूनही प्राप्त झालेली नाही. त्यामुळे, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश क्रमांक V मधील कलम २० नुसार सदर पक्षकारांना पर्यायी मार्गाचा अवलंब करून सुनावणीच्या नोटीसीची बजावणी करणे आवश्यक आहे.

४. सदर फेरतपासणी अर्जाची पुढील सुनावणी दि. ०६/११/२०२५ रोजी ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे, उक्त नमुद तक्त्यात नमुद पक्षकार त्या सुनावणीस उपस्थित राहण्याच्या अनुषंगाने, सदर पक्षकार यांना दि. ०६/११/२०२५ रोजीच्या सुनावणीचा सोबत जोडलेला समन्स वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करून (एक वर्तमानपत्र राज्य स्तरावरील (लोकसत्ता) व सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक वितरित होणारे एक स्थानिक मराठी वर्तमानपत्र) बजावण्याची कार्यवाही अर्जदार यांनी सदर आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसात करावी असा आदेश देण्यात येत आहे.

**दिनांक : ०१/०८/२०२५**
**ठिकाण : मुंबई**

**सही/-**
**(संतोष कुमार)**
**अपर मुख्य सचिव तथा वि.का.अ. (अ. व रि.)**



अुत्तम सेवा
मंगळवार दि. ५ ऑगस्ट २०२५
### नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, MPSC** | | | |
| १ | सहा कक्ष अधिकारी / राज्य कर निरीक्षक (२८२ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | २१/०८/२५ |
| २) | **इंस्टीट्युट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन, IBPS** | | | |
| १ | लिपीक (१०,२७७ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार व संगणक ज्ञान असावे | २८ पर्यंत | २१/०८/२५ |
| ३) | **ओरिएंटल इन्शुरन्स कं. लि., OICL** | | | |
| १ | असिस्टंट (५०० पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार | ३० पर्यंत | १७/०८/२५ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्‌ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला "जॉईन" असा मेसेज व्हॉटस्‌ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ४) | **केंद्रीय गुप्तचर विभाग, IB** | | | |
| १ | सिक्युरिटी असिस्टंट (४९८७ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २७ पर्यंत | १७/०८/२५ |
| ५) | **बॉर्डर सिक्युरिटी फोर्स, BSF** | | | |
| १ | ट्रेड्समन (३५८८ पदे) | दहावी व ITI (इले/स्वीपर/वेटर/बार्बर/वॉशरमन/वॉटर कॅरिअर/पंप/पेंटर/प्लंबर/कार्पेंटर/टेलर/कॉब्लर/अपहोल्स्टर) उत्तीर्ण स्त्री/पुरुष असावे | २७ पर्यंत | २३/०८/२५ |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा
१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.
www.uttamseva.org



### श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर
६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

### जाहिर प्रसिध्दीकरण
नमुना झेड
नमुना झेड (नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) पहा)
### स्थावर मालमत्ता ताब्यात घेण्याबाबतची नोटीस

ज्या अर्थी खाली सही करणार विशेष वसुली व विर्की अधिकारी श्री कृष्णाहरी यल्लप्पा मैसूर C/O श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर हि संस्था महाराष्ट्र सहकारी कायदा १९६१ अन्वये यादीतील ऋणको (थकबाकीदार) याने रक्कम जमा करण्यास कसूर केले आहे. त्या अर्थी खाली सही करणाऱ्याने खालील नमूद यादीतील ऋणको यांची स्थावर मिळकतबाबत जप्तीची नोटीस देऊन व रजी. गहाणखत अन्वये गहाण ठेवलेली या पुढे निर्दिष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त केलेली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला आणि सर्व नागरिकांना जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करण्यार्याने त्यांना महाराष्ट सहकारी संस्था नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) अन्वये दिलेल्या अधिकारा नुसार प्रतीकात्मक (सिम्बोलिक) ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात हेत आहे की, खाली नमूद केलेल्या यादीतील मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर या संस्थेच्या खाली नमूद केलेल्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यात होणारे इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील, याची नोंद घ्या.

| अ. क्र. | कर्जदार/जामिनदाराचे/ मिळकतदाराचे नाव | मिळकतीचे वर्णन | सिसनं/गट नं/ क्षेत्र | दिनांक मागणी नोटीस व प्रतिकात्मक ताबा |
|---|---|---|---|---|
| १ | **सादिक अब्दुल्ला जकलेर** (जे के इंडस्ट्रीज प्रोप्रा सादिक अब्दुल्ला जकलेर कर्जदार) | डी. व सब डी. सोलापूर पैकी तालुका द. सोलापूर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे कर्दे हळ्ळी ग्रामपंचायत हद्दीतील मिळकती | **१.** गट नं. ६१/१, याचे क्षेत्र १.६१.०० हे.आर.चौ.मी. आकार ०.७० **२.** गट नं. ६१/२, याचे क्षेत्र १.२५.०० हे.आर.चौ.मी. आकार ०.५० | १३/०३/२०२३ ३०/०७/२०२५ |
| | **अ. गफार अब्दुल्ला जकलेर** (जे के इंडस्ट्रीज प्रोप्रा.सादिक अब्दुल्ला जकलेर यांचे जामीनदार | डी. व सब डी. सोलापूर पैकी सो.म.पा. हद्दीतील साखर पेठ येथील मिळकत | सि.स.नं. १०२७७ याचे क्षेत्र ७८.५० चौ.मी. यांचे हिस्सेवर | |
| २ | **शकील अब्दुल्ला जकलेर** (शोएब ट्रेडर्स प्रोप्रा. शकील अब्दुल्ला जकलेर कर्जदार) | डी. व सब डी. सोलापूर पैकी सोमपा हद्दीतील रविवार पेठ मधील मिळकत | सि.स.नं. ९५११/२ क्षेत्र ५०.२ चौ. मी. | १३/०३/२०२३ ३१/०७/२०२५ |
| | **अ. गफार अब्दुल्ला जकलेर** (शोएब ट्रेडर्स प्रोप्रा. शकील अब्दुल्ला जकलेर यांचे जामीनदार | डी. व सब डी. सोलापूर पैकी सो.म.पा. हद्दीतील साखर पेठ येथील मिळकत | सि.स.नं. १०२७७ याचे क्षेत्र ७८.५० चौ.मी. यांचे हिस्सेवर | |
| ३ | **लक्ष्मण नामदेव बोरकर** (तानाजी लक्ष्मण बोरकर कर्जदार) | डी. व सब डी. सोलापूर पैकी तालुका अक्कलकोट मौजे चुंगी ग्रामपंचायत हद्दीतील | गट नं. ५७/१ यांसी क्षेत्र १.१२.०० हे.आर. चौ.मी. आकार १.०८ पो.ख. ०.१०.०० | ०४/०३/२०२३ ०१/०८/२०२५ |

वरील सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा, ताबा पत्रावर सही करून, खाली नमूद वसुली अधिकारी यांच्याकडे या जाहीर प्रसिद्धीकरण दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत घ्यावा अन्यथा, तसे न केल्यास मुदतीनंतर सदर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रिया मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे अर्ज करून पार पडले जाईल व तसेच उपरोक्त स्थावर मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल. तरी त्यापुढील होणाऱ्या सर्व परिणामास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : ०४/०८/२०२५**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### अर्जेंटिना संघाचा केरळ दौरा रद्द

**तिरुवनंतपुरम्** : महान फुटबॉलपटू लियोनेल मेस्सीच्या नेतृत्वाखालील अर्जेंटिनाचा राष्ट्रीय फुटबॉल संघ केरळला भेट देणार नाही, असे राज्याचे क्रीडामंत्री व्ही. अब्दुरहिमान यांनी सोमवारी सांगितले. सरकारने जाहीर केल्याप्रमाणे मेस्सीच्या नेतृत्वाखालील अर्जेंटिना संघ केरळला भेट देईल असा आग्रह मंत्र्यांनी यापूर्वीच धरला होता आणि प्रायोजकाने या स्पर्धेसाठी सामना शुल्क आधीच भरले आहे. तथापि, सोमवारी त्यांनी पत्रकारांना सांगितले की अर्जेंटिनाला संघटनेने त्यांना कळवले आहे की त्यांना या वर्षी ऑक्टोबरमध्ये राज्याला भेट देण्यात अडचणी येत आहेत, परंतु प्रायोजकाने आम्हाला केवळ ऑक्टोबर महिन्यात भेट देण्यात रस आहे असे उत्तर दिले. अब्दुरहिमान यांनी यापूर्वी सांगितले होते की, संघ या वर्षी ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरमध्ये येण्याची शक्यता जास्त आहे आणि त्यांना राज्य पाहुणे म्हणून वागवले जाईल, त्यांची सुरक्षा, निवास आणि इतर सुविधा सरकारकडून पुरविल्या जातील. ■

### कोबोलीला नमवून शेल्टन उपांत्यपूर्व फेरीत

**टोरंटो** : येथो सुरु असलेल्या नॅशनल बँक ओपन टेनिस स्पर्धेत अमेरिकेच्या चौथ्या मानांकित बेन शेल्टनने इटलीच्या १३ व्या मानांकित फ्लेव्हियो कोबोलीचा ६-४, ४-६, ७-६ (१) असा पराभव केला आणि स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. हा विजय १६९ टूर सामन्यांमधील त्याचा १०० वा होता. २२ वर्षीय शेल्टनने एटीपी टूरमध्ये दोन विजय मिळवले आहेत. आता शेल्टनचा सामना नवव्या मानांकित ऑस्ट्रेलियाच्या ॲलेक्स डी मिनौरशी होईल. ॲलेक्सने सातव्या मानांकित अमेरिकेच्या फ्रान्सिस टियाफोचा ६-२, ४-६, ६-४ असा पराभव केला.२३ वर्षीय कोबोलीने या वर्षी हॅम्बुर्ग आणि बुखारेस्टमध्ये क्ले स्पर्धा जिंकल्या आणि त्याचे एकमेव टूर जेतेपद पटकावले.तत्पूर्वी, सहाव्या मानांकित रशियाच्या आंद्रे रुबलेव्हने स्पेनच्या अलेजांद्रो डेव्हिडोविच फोकिनाविरुद्ध ६-७ (३), ७-६ (२), ३-० असा विजय मिळवला. डेव्हिडोविच फोकिना थकव्यामुळे निवृत्त झाला. आता रुबलेव्हचा सामना अमेरिकेच्या दुसऱ्या मानांकित टेलर फ्रिट्झ आणि झेक प्रजासत्ताकाच्या जिरी लेहेका यांच्यातील शेवटच्या सामन्यातील विजेत्याशी होईल.

### मेस्सीला किरकोळ स्नायू दुखापत

**फोर्ट लॉडरडेल** : इंटर मियामीचा स्टार लियोनेल मेस्सी नेकाक्सा विरुद्धच्या लीग्स चषक फुटबॉल स्पर्धेतील सामन्याच्या सुरुवातीच्या मिनिटांत दुखापतग्रस्त झाला.



मेस्सी उजव्या पायाच्या स्नायू दुखापतीशी झुंजत आहे, असे क्लबने म्हटले आहे. पेनॉल्टी किकवर इंटर मियामी जिंकलेल्या सामन्यात नेकाक्साच्या बचावपटूंनी आव्हान दिले तेव्हा तो मैदानावर पडला. त्याला अस्वस्थता जाणवल्यामुळे त्याच्या उजव्या पायाच्या चाचण्या करण्यात आल्या. मेस्सी दुखापतीतून सावरून केव्हा परतेल, याबाबत अद्याप काहीही निश्चित नाही. त्यामुळे बुधवारी युएनएएम पुमास विरुद्ध मियामीच्या पुढील लीग्स चषक सामन्यासाठी तो उपलब्ध असण्याची शक्यता कमी दिसते. मेस्सीची मैदानावर परतण्याची वेळ वैद्यकीय उपचारांना कसा प्रतिसाद देतो, यावर अवलंबून आहे, असे इंटर मियामीने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. शनिवारच्या सामन्याच्या पहिल्या १० मिनिटांत पडल्यानंतर मेस्सीने निराशेने त्याचा हात जमिनीवर आपटला. मैदानावर बसण्यापूर्वी तो इंटर मियामी बेंचकडे हळू चालत गेला. मेस्सीला कोणताही त्रास होत नाही, असे मियामीचे प्रशिक्षक जेवियर मास्चेरानो यांनी सामन्यानंतर सांगितले. ■

# इंग्लंडच्या तोंडातील घास हिसकावला

### ॲण्डरसन-तेंडुलकर चषक कसोटी मालिका २-२ ने बरोबरीत

### सामनावीर मोहम्मद सिराजसह कृष्णा विजयाचे शिल्पकार

### मालिकावीर शुभमन गिल व हॅरी ब्रुक

## भारताचा इंग्लंडवर ६ धावांनी रोमहर्षक विजय

◆ **लंडन, ४ ऑगस्ट**

ओव्हल मैदानावर रोमांचक ठरलेल्या पाचव्या आणि अखेरच्या कसोटी सामन्यात वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज व प्रसिध कृष्णाच्या प्रभावी कामगिरीच्या बळावर जोरदार मुसंडी मारत भारताने इंग्लंडवर ६ धावांनी रोमहर्षक विजय नोंदविला. या विजयाबरोबरच भारताने इंग्लंडविरुद्धची ॲण्डरसन-तेंडुलकर चषक पाच सामन्यांची कसोटी मालिका २-२ ने बरोबरीत राखली व इंग्लंडसोबत संयुक्तपणे विजेतेपदाचा मान मिळविला.

पहिल्या डावांत ४ बळी व दुसऱ्या डावांत ५ बळी टिपणारा मोहम्मद सिराज सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. या मालिकेत सर्वाधिक ७५४ धावा काढणारा भारतीय कर्णधार शुभमन गिल व ४८१ धावा काढणारा इंग्लंडचा हॅरी ब्रुक मालिकावीर पुरस्काराचे मानकरी ठरले.

भारताने इंग्लंडसमोर विजयासाठी ३७४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. सामन्याच्या चौथ्या दिवशी वाईट प्रकाश व मुसळधार पावसाने व्यत्यय आणण्यापूर्वी हॅरी ब्रुक व जो रूटच्या शानदार शतकांच्या जोरावर इंग्लंडने ७६.२ षटकांत ६ बाद ३३९ धावांपर्यंत मजल मारली होती. दरम्यान प्रसिध कृष्णाने नऊ चेंडूत दोन बळी घेत भारताच्या आशा जिवंत ठेवल्या.



पदक व चेंडू दाखवताना सामनावीर मोहम्मद सिराज

चौथ्या दिवसाचा खेळ थांबला, तेव्हा विजयासाठी इंग्लंडला केवळ ३५ धावांची, तर भारताला उर्वरित ४ फलंदाजांना बाद करण्याची गरज होती.

सोमवारी पाचव्या कसोटी सामन्यातील पाचव्या दिवशीच्या खेळाला सुरुवात झाली. कालचे नाबाद खेळाडू जेमी स्मिथ व जेमी ओव्हर्टन मैदानावर आले, मात्र भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने इंग्लंडला दोन जबरदस्त हादरे देत सामन्याचा कल भारताच्या बाजूने वळविला. सिराजने स्मिथला (२) यष्टिरक्षक ध्रुव जुरेलकडे झेल सोपवण्यास भाग पाडले, नंतर त्याने ओव्हर्टनला (९) पायचित करून तंबूत परत पाठविले. प्रसिध कृष्णाने जोश टोंगला भोपळा न फोडू देताच तंबूत परत पाठविले. नंतर गस ॲटकिन्सनने १७ धावांची खेळी करत इंग्लंडच्या विजयाच्या आशा कायम ठेवल्या, परंतु मोहम्मद सिराजने त्यालाही हिसका दाखविला. मोहम्मद सिराजने ॲटकिन्सचा त्रिफळा उडवून भारताचा विजय निश्चित केला.



मालिकावीरचा पुरस्कार पटकावल्याचा आनंद साजरा करताना शुभमन गिल

पहिल्या डावांत ४ बळी मिळविणाऱ्या मोहम्मद सिराजने दुसऱ्या डावांत १०४ धावांत ५ बळी टिपण्याची किमया केली. तसेच पहिल्या डावांत ४ बळी टिपणाऱ्या प्रसिध कृष्णाने चार बळी टिपून भारताच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. आकाश दीपने एक बळी टिपण्यात यश मिळविले. इंग्लंडच्या बेन डकेटचे अर्धशतक, हॅरी ब्रुक जो रूटचे शतक व्यर्थ ठरले. ◀(वृत्तसंस्था)

**सर्वाधिक धावा काढणारे पहिले अकरा फलंदाज**

| | |
|---|---|
| १. शुभमन गिल | ७५४ |
| २. जो रूट | ५३७ |
| ३. के.एल. राहुल | ५३२ |
| ४. रवींद्र जडेजा | ५१६ |
| ५. हॅरी ब्रुक | ४८१ |
| ६. ऋषभ पंत | ४७९ |
| ७. बेन डकेट | ४७२ |
| ८. जेरेमी स्मिथ | ४३४ |
| ९. यशस्वी जयस्वाल | ४११ |
| १०. ऑली पोप | ३०६ |
| ११. बेन स्टोक | ३०४ |

**सर्वाधिक बळी घेणारे पहिले अकरा गोलंदाज**

| | |
|---|---|
| १. मोहम्मद सिराज | २३ |
| २. जोश टोंगे | १९ |
| ३. बेन स्टोक्स | १७ |
| ४. जसप्रीत बुमराह | १४ |
| ५. प्रसिध कृष्णा | १४ |
| ६. आकाश दीप | १३ |
| ७. ख्रिस वोक्स | ११ |
| ८. शोएब बशीर | १० |
| ९. जोफ्रा आर्चर | ९ |
| १०. बी.ए. कार्से | ९ |
| ११. गस ॲटकिन्सन | ८ |

### १७ वर्षांखालील जागतिक कुस्ती स्पर्धेत

# सितेंदर मलिकने जिंकले सुवर्णपदक

### ३ वर्षांचा दुष्काळ संपवला

◆ **अॅथेन्स, ४ ऑगस्ट**

ग्रीसमधील अॅथेन्स येथे सुरु असलेल्या २०२५ च्या १७ वर्षांखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या सितेंदर मलिकने पुरुषांच्या ६० किलो फ्रीस्टाईलमध्ये सुवर्णपदक जिंकले. अंतिम फेरीत सितेंदरने जपानच्या रिहितो हिउराविरुद्ध ९-४ असा विजय मिळवत अव्वल स्थान मिळवले.



१६ वर्षीय सितेंदरने अॅथेन्समध्ये सुवर्णपदक जिंकून १७ वर्षांच्या अंडर १७ वयोगटात पुरुषांच्या फ्रीस्टाईल जागतिक कुस्ती स्पर्धेत भारताची तीन वर्षांची प्रतीक्षा संपवली.

त्याआधी, उपांत्य फेरीत सितेंदरने कझाकस्तानच्या बेकासिल असमबेकवर ५-१ असा विजय मिळवला होता. यापूर्वी त्याने इराणच्या एरियन मेहरालिझादेहविरुद्धचा उपांत्य फेरीचा सामना नियमानुसार ५-५ असा जिंकला होता. त्याने अथेन्समध्ये पात्रता फेरीत तांत्रिक श्रेष्ठतेच्या आधारे १०-० असा विजय मिळवला होता, तर उप-उपांत्यपूर्व फेरीतही त्याने हीच कामगिरी केली होती. ◀(वृत्तसंस्था)

## देशात प्रथमच तिरंदाजी लीग होणार

◆ **नवी दिल्ली, ४ ऑगस्ट**

भारतीय तिरंदाजी संघटनेने (एएआय) सोमवारी अशा प्रकारच्या पहिल्या तिरंदाजी लीगची घोषणा केली. या तिरंदाजी लीगमध्ये जगभरातील पुरुष व महिला रिकर्व्ह आणि कम्पाऊंड तिरंदाज फ्रॅन्चायझी शैलीतील स्पर्धेत भाग घेतील.

तिरंदाजी लीगची पहिली आवृत्ती या वर्षी ऑक्टोबरमध्ये दिल्लीतील यमुना क्रीडा संकुलात ११ दिवसांच्या कालावधीत होण्याची अपेक्षा आहे. या तिरंदाजी लीगला जागतिक तिरंदाजी, आशिया व क्रीडा मंत्रालयाकडून प्रोत्साहन मिळाले आहे.

लीगचा उद्देश भारत व जगभरातील एकूण तिरंदाजी परिसंस्था मजबूत करणे आहे. या लीगमध्ये जगातील अव्वल १० मधील परदेशी तिरंदाजांसह, सहा फ्रॅन्चायझी संघांचे प्रतिनिधित्व करणारे अव्वल भारतीय खेळाडू सहभागी होतील.

तिरंदाजी लीगच्या मदतीने आम्ही ही स्वप्ने पूर्ण करू शकू आणि अधिक संधी उपलब्ध करून देऊ शकू. चला आपण सर्वजण मिळून तिरंदाजीसाठी ही लीग सुरू करूया, जेणेकरून आपण देशात या खेळाला पुढील स्तरावर नेऊ शकू, असे भारतीय तिरंदाजी संघटनेचे अध्यक्ष अर्जुन मुंडा म्हणाले. या उपक्रमामुळे आमच्या खेळाचा प्रभाव वाढेल आणि भारतीय तिरंदाज तसेच भारताबाहेरून येणाऱ्या इतर तिरंदाजांमध्ये स्पर्धात्मक भावनेचे वातावरण निर्माण होईल, जेणेकरून ते त्यांची कामगिरी वाढवू शकतील आणि भविष्यात आणखी चांगले तिरंदाज होऊ शकतील, असे जागतिक तिरंदाजीचे सरचिटणीस टॉम डायलेन म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

# विजयामुळे शुभमन गिलच्या कर्णधारपदाची पडताळणी सोपी : बांगर

◆ **लंडन, ४ ऑगस्ट**

ओव्हल येथील रोमांचक पाचव्या कसोटीत सहा धावांनी मिळालेल्या विजयामुळे शुभमन गिलच्या कर्णधारपदाची पडताळणी सोपी होते. तो सर्वोच्च पदावरच्या जीवनाशी जुळवून घेत आहे, असे मत माजी भारतीय क्रिकेटपटू संजय बांगरने व्यक्त केले.

भारतीय कसोटी संघाचा कर्णधार म्हणून गिलची पहिली कामगिरी ॲण्डरसन-तेंडुलकर चषक मालिकेत संपली. ही मालिका २-२ अशी बरोबरीत राहिली.

अशा मालिकेत कामगिरी केल्याने भारतीय संघाचे नेतृत्व करण्याच्या गिलच्या क्षमतेबद्दलच्या सर्व शंका नक्कीच दूर होतात, कारण जर तो फलंदाज म्हणून त्याच्या प्राथमिक भूमिकेत धावा करत असेल तर मला वाटते की कर्णधारपद ही अशी गोष्ट आहे जी तुम्ही जाता जाता शिकता येते, असे बांगर म्हणाला.

कधीही परिपूर्ण कर्णधार नसतो व अशा विजयांमुळे तुम्ही कामावर स्थिरावता तेव्हा तपासणीचे ओझे कमी होते. या मालिकेत प्रत्येक खेळाडूने पुढाकार घेतला व एकत्रितपणे खेळले, असे तो म्हणाला. सुनील गावस्कर, विराट कोहलीने जेव्हा भारतीय संघाची सूत्रे हाती घेतली, तेव्हा त्या सर्वांनी कर्णधार म्हणून पहिली कसोटी मालिका शानदार केली व नंतर त्यांनी बराच काळ भारताचे नेतृत्व केले. त्यामुळे त्या दृष्टिकोनातून शुभमन गिलकडून मिळालेला हा शानदार विजय आहे, असे बांगर म्हणाला.

**ओव्हलमधील विजय गंभीरसाठी खूप महत्त्वाचा**

भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील हा एक खास क्षण आहे. गौतम गंभीरसाठीही हा एक अतिशय महत्त्वाचा विजय आहे. हो, शुभमन गिलने दौऱ्यावर काही खास गोष्टी केल्या आहेत, असे माजी क्रिकेटपटू संजय बांगर म्हणाला.

संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून गंभीरने ज्या प्रकारची सुरुवात केली मायदेशात न्यूझीलंडविरुद्ध पराभव, नंतर ऑस्ट्रेलियात मालिका गमावणे, परंतु भारतीय संघाने कधीही हार मानली नाही. प्रत्येक पराभवानंतरही भारताने झुंजत राहणे- पहिली कसोटी गमावणे, दुसरी जिंकणे, तिसरी गमावणे, चौथी अनिर्णित राखणे आणि नंतर संपूर्ण सामना तुमच्या विरोधात असताना असा विजय मिळवणे - हेच खरे आहे की त्यांनी हे घडवून आणले, असे त्याने निष्कर्ष काढले. ◀(वृत्तसंस्था)

# कसोटीत स्टोक्सचा उत्तराधिकारी हॅरी ब्रुक असावा : वॉन

◆ **लंडन, ४ ऑगस्ट**

हॅरी ब्रुकची मैदानावरील उपस्थिती एका महान खेळाडूची भावना निर्माण करते व वेळ आल्यावर तो कर्णधार बेन स्टोक्सची जागा घेण्यासाठी तयार असावा, असे मत इंग्लंडच्या सर्वोत्तम कसोटी कर्णधारांपैकी एक मायकेल वॉनने व्यक्त केले.

एक आक्रमक फलंदाज असलेल्या हॅरी ब्रुकने चालू कसोटीत ९८ चेंडूत १११ धावा करून इंग्लंडच्या आशा पुन्हा जागी केल्या आणि शेवटच्या दिवसाच्या सुरुवातीपर्यंत त्याचा संघ विजयापासून ३५ धावा दूर राहिला आणि त्याच्या हातात चार विकेट शिल्लक होत्या.

कर्णधार म्हणून ५१ कसोटींपैकी २६ कसोटी जिंकणारा वॉनला वाटते की ऑली पोप एक उत्तम उपकर्णधार आहे, परंतु जेव्हा स्टोक्सने वेळ काढण्याचा निर्णय घेतला तेव्हा ब्रुक इंग्लंडचे नेतृत्व करण्यासाठी आदर्श खेळाडू आहे.

'हॅरी ब्रुक माझ्यासाठी, एक नेता दिसतो. तो जन्मजात नेता दिसतो. जर भविष्यात बेन स्टोक्स जखमी झाला तर हॅरी ब्रुकला नेतृत्वाची भूमिका मिळू शकते, असो वॉन म्हणाला.

यॉर्कशायरच्या हॅरी ब्रुकला या वर्षाच्या सुरुवातीला इंग्लंडचा व्हाईट-बॉल कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले. त्याने वेस्ट इंडीजविरुद्धची पहिली मालिका जिंकली. वॉनने ऑली पोपऐवजी ब्रुकची निवड करण्याचे कारण सांगितले.

मी ऑली पोप सारख्या व्यक्तीकडे पाहतो, जो एक उत्तम उपकर्णधार दिसतो. तो एक हुशार व्यक्ती आहे, ज्याच्या शेजारी कल्पना मांडण्यासाठी कर्णधार असणे आवश्यक आहे. कधीकधी उपकर्णधार हुशार कर्णधार नसतात, असेही वॉन म्हणाला.२७ वर्षीय पोप पाचव्यांदा इंग्लंडचे कसोटीत नेतृत्व करत आहेत. गत वर्षी स्टोक्सला हॅमस्ट्रिंग दुखापत झाली तेव्हा तो यापूर्वीच संघात होता. ◀(वृत्तसंस्था)

# हव्याप्रमंच्या खेळाडूंना ५ रौप्य, १७ कांस्य पदके

### एरोबिक जिम्नॅस्टिक राज्य अजिंक्य स्पर्धा

◆ **अमरावती, ४ ऑगस्ट**

हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या अनंत क्रीडा मंदिर येथे नुकत्याच पार पडलेल्या २५ व्या एरोबिक जिम्नॅस्टिक राज्य अजिंक्य स्पर्धेमध्ये राज्यातील २३ जिल्ह्यातील तब्बल ३०७ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये १९५ खेळाडूंनी विजेतेपद पटकावले. यामध्ये हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जिम्नॅस्टिक विभागातील अमरावती संघाने नेत्रदीपक कौशल्य सादर करीत ५ रौप्य व १७ कांस्य पदकांचे मानकरी ठरले. मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांची विजेत्या खेळाडूंनी भेट घेत आपले यश त्यांना समर्पित केले. यावेळी वैद्य यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करीत त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा व आशीर्वाद दिले.



पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांचे आशीर्वाद घेताना विजेते खेळाडू

ह.व्या.प्र. मंडळाच्या जिम्नॅस्टिक प्रशिक्षण केंद्रामध्ये सराव करणाऱ्या अमरावती जिल्हा हौशी जिम्नॅस्टिक्स संघटनेच्या २७ खेळाडूंची २५ व्या एरोबिक जिम्नॅस्टिक राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी अमरावती संघात निवड झाली होती. सदर स्पर्धा या महाराष्ट्र हौशी जिम्नॅस्टिक्स संघटनेच्या मान्यतेने, अमरावती जिल्हा हौशी जिम्नॅस्टिक्स संघटना व हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आल्या होत्या.

सदर स्पर्धेत ओवी राऊत, विभा भारती व श्रिया फुणे यांनी पदार्पणातच उत्कृष्ट कामगिरी केली. महिला एकेरी प्रकारात सिद्धी ठाकरे, सुखदा हंबर्डे यांनी अनुक्रमे चतुर्थ आणि पाचवे स्थान प्राप्त केले, तर मिश्र दुहेरी प्रकारात मेधावी देशमुख व श्रवण कुन्हेकर आणि पुरुष एकेरी प्रकारात देवांश माहुलकर यांनी अनुक्रमे चतुर्थ आणि पाचवे स्थान पटकावले. या सर्व खेळाडूंना जिम्नॅस्टिक्स विभाग प्रमुख प्रा. आशिष हटेकर यांचे मार्गदर्शन आणि आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक डॉ. नीलेश जोशी, हेमा राजवैद्य, सचिन कोठारे, अक्षय अवघाते यांचे प्रशिक्षण लाभले.

या यशाबद्दल मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, महाराष्ट्र राज्य संघटना उपाध्यक्ष डॉ. माधुरी चेंडके, मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, जिल्हा जिम्नॅस्टिक्स संघटनेचे अध्यक्ष प्रा. रवींद्र खांडेकर, डॉ. विकास कोळेश्वर, कोषाध्यक्ष प्रा. राजेश पांडे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, डॉ. लक्ष्मीकांत खंडागळे, डॉ. संजय तिरथकर, प्रा. दीपा कान्हेगावकर, प्रा. कमलाकर शहाणे, मधुकर कांबे, अनंत निंबोळे, डॉ. कविता वाटाणे, प्रा. विलास दलाल, राजेश महात्मे, डॉ. ललित शर्मा, प्रा. नंदकिशोर चौव्हाण, विकास पाध्ये, रवी दलाल तसेच सर्व पालकांनी खेळाडूंचे व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले. ◀(तभा वृत्तसेवा)

# क्लारा टॉसनकडून इगा स्वियातेकचा पराभव

◆ **मॉण्ट्रियल, ४ ऑगस्ट**

डेन्मार्कच्या क्लारा टॉसनने दुसऱ्या मानांकित विम्बल्डन विजेत्या पोलंडच्या इगा स्वियातेकला ७-६ (१), ६-३ असे पराभूत करून नॅशनल बँक ओपन टेनिस स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

गुरुवार संपणाऱ्या या हार्ड-कोर्ट टेनिस स्पर्धेत १६ व्या मानांकित ६ फूट टॉसनने विम्बल्डनमध्ये स्वियातेककडून झालेल्या पराभवाचा बदला घेतला. आता क्लारा टॉसनने मंगळवारी अमेरिकेच्या सहाव्या मानांकित ऑस्ट्रेलियन ओपन विजेत्या मॅडिसन कीजशी सामना खेळण्याची संधी मिळवली. जानेवारीमध्ये न्यूझीलंडमध्ये टॉसनने तिचे एकमेव टूर जेतेपद जिंकले, तेव्हा तिने अंतिम सामन्यात जपानच्या नाओमी ओसाकाला हरवले.

मॅडिसन कीजने ११ व्या मानांकित कॅरोलिना मुचोव्हाला ४-६, ६-३, ७-५ असे हरवले.

क्लारा एक उत्तम आक्रमक टेनिसपटू आहे.तिची सर्व्हिस मोठी आहे. तिच्याकडे दोन्ही बाजूंनी खेळण्यासाठी खूप ताकद आहे. ती कोर्टवर चांगली कामगिरी करत आहे, असे मॅडिसन कीज क्लाराबद्दल म्हणाली.

नाओमी ओसाकानेही आगेकूच केली असून तिने लॅटव्हियाच्या ॲनास्तासिया सेव्हास्तोव्हाला ४९ मिनिटांत ६-१, ६-० असे पराभूत केले. ओसाकाचा हा कारकिर्दीतील दुसरा सर्वात जलद विजय आहे. ओसाकाने २०१६ च्या ब्राझीलमध्ये झालेल्या स्पर्धेत ४२ मिनिटांचा विजय मिळवला. ओसाकाने १९ महिन्यांत पहिल्यांदाच १००० किंवा ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धेच्या अंतिम आठमध्ये स्थान मिळवले. मंगळवारी तिचा सामना युक्रेनच्या १० व्या मानांकित एलिना स्विटोलिनाशी होईल. एलिनाने अमेरिकेच्या पाचव्या मानांकित अमांडा अनिसिमोवावर ६-४, ६-१ असा विजय मिळवला. उपांत्यपूर्व फेरीत १८ वर्षीय कॅनेडियन व्हिक्टोरिया म्बोको स्पेनच्या जेसिका बोझास मानेइरोशी आणि युक्रेनची मार्टा कोस्ट्युक नवव्या मानांकित कझाकस्तानच्या एलेना रायबाकिनाशी लढेल. ◀(वृत्तसंस्था)

# ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारतीय हॉकी संघ जाहीर

◆ **नवी दिल्ली, ४ ऑगस्ट**

आगामी १५ ऑगस्टपासून पर्थ येथे सुरू होणाऱ्या चार सामन्यांच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारताने सोमवारी युवा डिफेंडर पूवन्ना सीबीचा २४ सदस्यीय पुरुष हॉकी संघात समावेश केला आहे.

२९ ऑगस्टपासून राजगीर येथे घरच्या मैदानावर होणाऱ्या सर्वात महत्त्वाच्या आशिया चषकापूर्वी हा संघ एक अनुभवी दौरा म्हणून काम करेल, जो विश्वचषक पात्रता फेरी देखील आहे. बिहारमध्ये होणाऱ्या आशिया चषकापूर्वी आम्ही स्वतःला अधिक सक्षम करण्यासाठी पर्थ ऑस्ट्रेलियाला जात आहोत. दर्जेदार प्रशिक्षण आणि सराव सामन्यांद्वारे आमची शारीरिक स्थिती आणि तांत्रिक अंमलबजावणी सुधारण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल, असे मुख्य प्रशिक्षक क्रेग फुल्टन म्हणाले.

आम्ही काही तरुण खेळाडूंना दबावाखाली मौल्यवान अनुभव व कसोटी संयोजन देण्यासाठी संघात स्थान दिले आहे. हे शिबिर आमच्या तयारीचा एक महत्त्वाचा भाग आहे व घरच्या मैदानावर स्पर्धा करण्यापूर्वी वैयक्तिक व संघाची गती वाढवण्याची संधी आहे.



संघात गोलरक्षक म्हणून कृष्ण पाठक व सूरज करकेरा असतील, तर सुमित, जर्मनप्रीत सिंग, संजय, अमित रोहिदास, निलम संजीप झेस, जुगराज सिंग आणि कर्नाटकचे पूवण्णा हे बचावफळीची जबाबदारी सांभाळतील.

प्रतिभावान राजिंदर सिंग याला मिडफिल्डर म्हणून संघात स्थान देण्यात आले आहे. राजिंदरची तुलना भारताचा माजी कर्णधार सरदार सिंगशी केली जाते. तसेच राज कुमार पाल, हार्दिक सिंग, मनप्रीत सिंग, विवेक सागर प्रसाद, रविचंद्र सिंग मोइरंगथेम, विष्णू कांत सिंग यांचा समावेश आहे. मनदीप सिंग, शिलानंद लाक्रा, अभिषेक, सुखजीत सिंग, दिलप्रीत सिंग, सेल्वम कार्ती व आदित्य लालगे हे आक्रमक खेळाडू आहेत.

भारतीय संघ शुक्रवारी बंगळुरूहून ऑस्ट्रेलियाकडे रवाना होणार असून ते सध्या भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साई) केंद्रात सराव करत आहेत.

**भारतीय हॉकी संघ असा** : गोलरक्षक : कृष्णन बी पाठक, सूरज कारकर. बचावपटू: सुमित, जर्मनप्रीत सिंग, हरमनप्रीत सिंग (कर्णधार), संजय, अमित रोहिदास, निलम संजीप झेस, जुगराज सिंग, पूवण्णा सी. मध्य फळी : राजिंदर सिंग, राजकुमार पाल हार्दिक सिंग, मनप्रीत सिंग, विवेक सागर प्रसाद, रबिचंद्र सिंग मोइरंगथेम, विष्णू कांत सिंग. आक्रमक फळी : मनदीप सिंग, शिलानंद लाक्रा अभिषेक, सुखजीत सिंग, दिलप्रीत सिंग, सेल्वम कार्ती आदित्य लालगे. ◀(वृत्तसंस्था)

# पाकिस्तानने जिंकली टी-२० मालिका

### अखेरच्या सामन्यात वेस्ट इंडीजवर १३ धावांनी विजय

◆ **लॉडरहिल, ४ ऑगस्ट**

सैम अयुबने साहिबजादा फरहानसोबत केलेल्या १३८ धावांच्या सलामी भागीदारीच्या बळावर पाकिसतानने वेस्ट इंडीजचा १३ धावांनी पराभव करून तीन सामन्यांची टी-२० क्रिकेट मालिका २-१ अशी जिंकली. सॅम अयुबने अर्धशतक झळकावले आणि त्यानंतर एक महत्त्वपूर्ण बळीही टिपला.

प्रथम फलंदाजी करत पाकिस्तानने ४ बाद १८९ धावा उभारल्या आणि नंतर जोरदार गोलंदाजी करत वेस्ट इंडीजला ६ बाद १७६ धावांवर रोखले.

१७ व्या षटकात फरहान ७४ धावांवर बाद झाल्याने पाकिस्तानची सलामीची भागीदारी संपुष्टात आली. शमार जोसेफने (१-५७) लॉंग-ऑफवर थेट शाई होपला फुल-टॉस मारला, तेव्हा त्याची ५३ चेंडूंची खेळी संपली. पाकिस्तानच्या डावाच्या शेवटच्या षटकाच्या शेवटच्या चेंडूपर्यंत अयुबने धावा केल्या. तो ४९ चेंडूत ६६ धावांवर बाद झाला.

रुदरफोर्डने ३५ चेंडूत ५१ धावा करत वेस्ट इंडीजला स्पर्धेत टिकवून ठेवले पण शेवटच्या षटकात तो बाद झाल्याने पुनरागमन विजयाची कोणतीही शक्यता संपुष्टात आली. वेस्ट इंडीजचा सात सामन्यांमधील हा पहिलाच टी-२० विजय होता, यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध ५-० असा मोठा पराभव झाला होता. पाकिस्तानने मालिकेतील पहिला सामना १४ धावांनी जिंकला.दोन्ही संघ तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी कॅरिबियन बेटांवर जात आहेत. ◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...




## राज्यस्तरीय सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत उत्कर्ष विद्यालयाचे यश

**सांगोला, दि.४ ऑगस्ट -**

लोकमान्य टिळक जयंतीनिमित्त अष्टपैलू संस्कृती कला अकादमी, मुंबई आयोजित सुंदर हस्ताक्षर राज्यस्तरीय स्पर्धेत प्राथमिक विभागात येथील उत्कर्ष विद्यालयाची मुक्ता राऊत (इ.३ री) हिने तब्बल २८२ विद्यार्थ्यांतून राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत राज्यभरातून शेकडो विद्यार्थी सहभागी झाले होते, मात्र उत्कर्ष विद्यालयाचे विद्यार्थी आपल्या देखण्या हस्ताक्षराच्या जोरावर सर्वांचे लक्ष वेधून घेण्यात यशस्वी ठरले. तसेच माध्यमिक विभागातील प्रीता देशपांडे (इ.६ वी) हिने २३२ विद्यार्थ्यांमधून उत्तेजनार्थ, प्रेम हागरे (इ.७ वी) याने २३५ स्पर्धकांमध्ये उत्तेजनार्थ, साक्षी वसमळे (इ.१०वी) हिने २२३ विद्यार्थ्यांमधून तृतीय क्रमांक पटकावला. या यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षक, पालकांचे माता बालक उत्कृष्ट प्रतिष्ठानच्या अध्यक्षा दमयंती खर्डीकर, डॉ.संजीवनी केळकर व सर्व संस्था पदाधिकारी, तसेच प्राथमिकच्या मुख्याध्यापिका विश्रांती मागाडे, उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी, माध्यमिकचे मुख्याध्यापक सुनील कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रशांत भोसले यांनी अभिनंदन केले.




## सनराइज गुरुकुल स्कूलमध्ये विद्यार्थी पदग्रहण सोहळा

**टेंभुर्णी, दि. ४ ऑगस्ट-**

येथील सनराइज गुरुकुल स्कूलमध्ये निवडक विद्यार्थ्यांचा हेडबॉय, 'हेड गर्ल', 'हाऊस मास्टर' आणि 'हाऊस लीडर' या पदांवर निवड झालेल्यांचा पदग्रहण समारंभ उत्साहात झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे, संस्थेच्या सचिव सुरजाताई बोबडे, अॅकॅडेमिक डायरेक्टर शाहिदा पठाण आणि प्रशालेचे मुख्याध्यापक प्रभाकर, पालक शिक्षक समितीचे सदस्य प्रिया शहा, गोवर्धन नेवसे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर हेडबॉय आणि हेडगर्ल यांच्यासह सर्व हाऊस लीडर्सची निवड जाहीर करण्यात आली. संस्थेच्या सचिव बोबडे यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या नवीन जबाबदाऱ्यांची जाणीव करून दिली आणि पदाचे महत्त्व समजावून सांगितले. शाहिदा पठाण यांनी नवनिर्वाचित विद्यार्थी परिषदेच्या सदस्यांचा शपथविधी पार पाडत विद्यार्थ्यांना शिस्तीचे महत्त्व सांगितले आणि त्यांच्या कार्याची दिशा स्पष्ट केली. प्रिन्सिपल प्रभाकर यांनी सर्व नवनियुक्त विद्यार्थ्यांना शपथ दिली. क्रीडा शिक्षक राहुल काळे, अनिकेत आणि कलाशिक्षक सतीश साळुंखे आयोजन केले. मोनाली अनंतवार यांनी सूत्रसंचालन केले. शक्ती सोनवणे यांनी आभार मानले.

## 'सकाळ तर होऊ द्या' चित्रपट लवकरच भेटीला

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

'सकाळ तर होऊ द्या' हा चित्रपट १० ऑक्टोबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.श्रेय पिक्चर कंपनीच्या बॅनरखाली तयार झालेल्या 'सकाळ तर होऊ द्या' या चित्रपटाची निर्मिती नम्रता सिन्हा यांनी केली आहे. नम्रता सिन्हा यांनी आजवर अनेक लोकप्रिय टीव्ही मालिका आणि वेबसीरिजची निर्मिती केली आहे. तसेच, त्या सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते विनय सिन्हा यांच्या कन्या आहेत. ज्यांनी 'अंदाज अपना अपना' आणि 'नसीब' यांसारख्या अनेक अजरामर हिंदी चित्रपटांची निर्मिती केली आहे. आता नम्रता सिन्हा यांनी 'सकाळ तर होऊ द्या' या चित्रपटाद्वारे मराठी सिनेसृष्टीत पदार्पण केले आहे. आजवर हिंदीत महत्त्वपूर्ण कामगिरी बजावणाऱ्या आलोक जैन यांनी 'सकाळ तर होऊ द्या'चे लेखन व दिग्दर्शन केले आहे. या चित्रपटाबाबत दिग्दर्शक आलोक जैन म्हणाले की, दोन व्यक्तिरेखांच्या बळावर प्रेक्षकांना अखेरपर्यंत खिळवून ठेवण्याची किमया या चित्रपटात पाहायला मिळेल.

## निधन वार्ता..

### बाई मळेवाडी



**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील सिंदखेड येथील शारदाबाई आण्णाराव मळेवाडी यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा सिंदखेड येथील राहत्या घरातून उद्या मंगळवारी सकाळी दहा वाजता निघणार आहे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील निवृत्त शिक्षक भीमाशंकर मळेवाडी यांच्या त्या मातोश्री होत.

### केशव सावंत



**मोडनिंब, दि.४ ऑगस्ट-**

अरण (ता.माढा) दत्त मंदिर येथील गायक केशव तानाजी सावंत (बोधले) यांचे दीर्घ आजाराने नुकतेच निधन झाले. सुस्वर भजन गवळणी गायनात त्यांची ख्याती होती. त्यांचे पश्चात आई, वडील, दोन भाऊ, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

### फौजदार मुसा शेख



**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

स्वागत नगर परिसरातील लता नगर येथील रहिवाशी सेवानिवृत्त लोहमार्ग सहायक फौजदार मुसा हाजी इब्राहिम शेख यांचे वयाच्या ७८ यावर्षी आज सोमवार रोजी सकाळी राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन विवाहित मुली, सून, नातवंडे, तीन भाऊ, तीन बहिणी असा परिवार आहे.

# जिल्ह्यात लंपीने घेतला ३३ जनावरांचा बळी

## जिल्हा परिषदेने स्वनिधी १५ लाखातून केली लस खरेदी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

जिल्ह्यात मागील महिन्यापासून लंपी आजाराचा प्रादुर्भाव मोठा आहे. त्यातून आतापर्यंत सुमारे ३३ जनावरांचा बळी गेला आहे. लंपीला रोखण्यासाठी जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडून जनावरांच्या लसीकरणाची मोहीम राबवली जात आहे. त्यासाठी जिल्हा परिषदेने स्वनिधीतून सुमारे १५ लाखांची तरतूद केल्याची माहिती प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

लंपी आजार संसर्गजन्य असल्याने त्याच्या प्रतिबंधासाठी सर्व पशुपालकांनी जनावरांचे लसीकरण करून घ्यावे, त्याबरोबरच जनावरांची तसेच गोठ्याची स्वच्छताही करावी असे आवाहन श्री. जंगम यांनी केले आहे.

जिल्ह्यात मागील एक महिन्यापासून १ हजार ५४४ गाय वर्ग पशुधन लंपी आजारामुळे बाधित झालेले आहे, त्यापैकी १ हजार १०८ जनावरे बरी झाली असून आत्तापर्यंत ३३ जनावरांचा लंपी आजारामुळे मृत्यू झालेला आहे. तर ४०३ जनावरांवर उपचार सुरू आहेत. प्रशासनामार्फत लंपी आजार प्रतिबंधासाठी जनावरांना लस देण्यात येत आहे. लस खरेदीसाठी जिल्हा परिषदेच्या स्व निधी मधून १५ लाखाचा निधी मंजूर केलेल्या होता, त्यातून लस खरेदी केलेली असून लसीकरण मोहीम वेगाने सुरू असल्याची माहिती श्री. जंगम यांनी दिली. माळशिरस तालुक्यात लंपी आजार बाधित जनावरांचे प्रमाण जास्त होते परंतु मागील काही दिवसापासून संसर्ग होण्याचे प्रमाण कमी झालेले असून सध्या माढा तालुक्यात लंपी आजार बाधित जनावरांची संख्या वाढत आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील सर्व पशुपालकांनी जनावरांचे लसीकरण करून घ्यावे, त्याबरोबरच जनावरांची स्वच्छता तसेच गोठ्यांची स्वच्छता ही ठेवावी. हा आजार संसर्गजन्य असल्याने अधिक काळजी घेणे गरजेचे असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जंगम यांनी यावेळी सांगितले.



## हर्षदच्या शस्त्रक्रियेसाठी बार्शीतील पत्रकारांकडून दोन लाख

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.४ ऑगस्ट-**

'व्हाईस ऑफ मीडिया' डिजिटल विंगचे प्रदेशाध्यक्ष हर्षद लोहार यांच्यावर मागील महिन्यात बार्शीतील एका खासगी रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली. या उपचारासाठी लागणारा खर्च मोठा असल्याने, हर्षद लोहार त्याचे मित्र, ,सामाजिक कार्यकर्ते तसेच पत्रकार बांधवांनी पुढाकार घेऊन आर्थिक मदतीसाठी पुढाकार घेतला होता.

'व्हाईस ऑफ मीडिया'चे संस्थापक अध्यक्ष संदीपजी.काळे व राज्य उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत, 'व्हाईस ऑफ मीडिया' बार्शी शाखेचे सदस्य व शहर व तालुक्यातील अनेक पत्रकारांनी आर्थिक मदत गोळा केली. या मदतीतून एकूण २ लाख १५ हजार रुपयांची रक्कम जमा करण्यात आली. ही संपूर्ण रोख रक्कम आज हर्षद लोहार यांच्या आईकडे अधिकृतरित्या सुपूर्द करण्यात आली. या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीचा एक सुंदर आदर्श निर्माण झाला असून, पत्रकाराच्या एकतेचे प्रत्यक्ष उदाहरण पाहायला मिळाले. यावेळी व्हाईस ऑफ मीडीया राज्याचे उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ, बार्शी शाखेचे शाम थोरात, विजय शिंगाडे, निलेश झिंगाडे, जमीर शेख, उमेश काळे, मयूर थोरात, समाधान चव्हाण, अमोल आजबे, संदीप आलाट, तात्या माळी, प्रविण पावले, विक्रांत पवार, रामचंद्र ईकारे सह अनेक सहकारी पत्रकार, बांधव उपस्थित होते. लोहार परिवाराने मदतीसाठी मनापासून आभार मानले.




## अक्कलकोट येथे कारगिल विजय दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ ऑगस्ट-**

अक्कलकोट येथे माजी सैनिक संघटनेकडून कारगिल विजय दिन साजरा करण्यात आला.

अक्कलकोट पंचायत समिती सभागृहामध्ये कारगिल विजय दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी माजी सैनिक संघटना अक्कलकोट अध्यक्ष बाळासाहेब भोसले, उपाध्यक्ष विठ्ठल फडतरे, सचिव कडचे, रामचंद्र शिंदे, श्रीकांत मोरे, विजय कुमार काकडे, स्वामी, क्षिरसागर , कुंभार, श्रीमती मीरा बुद्रूक, बापूराव सुरवसे, मेजर लवटे आदीची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी मेजर लवटे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळा तर्फे माजी सैनिकांनां चहा, अल्पोपहार याची सोय करण्यात आली होती.

## ग्राहकांच्या हक्कांसाठी पुढाकार; सोलापूरमध्ये दर महिन्याला 'जनता दरबार'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

वैधमापन शास्त्र यंत्रणेच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता वाढविणे, लोकसंपर्क दृढ करणे आणि ग्राहकांच्या तक्रारींचे वेळेवर निराकरण करण्याच्या उद्देशाने, सोलापूर जिल्ह्यात दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी 'जनता दरबार' आयोजित करण्यात येणार आहे.

हा दरबार दुपारी २:०० वाजता उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र कार्यालय, उजनी वसाहत, सोलापूर येथे होणार आहे तरी नागरिकांनी या अनुषंगाने आपल्या तक्रारी द्याव्यात असे आव्हान वैद्य मापन शास्त्र अधिकारी अ.ध. गेटमे यांनी केले आहे. या उपक्रमात माहितीचा प्रचार, जनजागृती, हितधारकांचा सहभाग, तक्रारींची नोंद व कार्यवाही यांचा समावेश असेल. वैधमापन शास्त्र अधिनियम तसेच आवेष्टीत वस्तू कायद्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने ग्राहक व जनतेच्या तक्रारी ऐकल्या जातील. फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांविरुद्ध तक्रार असल्यास तीही मांडता येईल. सामान्य ग्राहक, ग्राहक संघटना, पॅकबंद वस्तूंचे उत्पादक, पॅकर, आयातदार, किरकोळ विक्रेते, वजन व मापे परवानाधारक उत्पादक, दुरुस्तक व विक्रेते यांनी उपस्थित राहून यंत्रणेच्या कामकाजाविषयी सूचना व अभिप्राय द्यावा, असे आवाहन उपनियंत्रक वैधमापन शास्त्र अधिकारी अ.ध. गेटमे यांनी केले आहे.

## किसान एकता संघाच्या उपाध्यक्षपदी चंद्रकांत पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ ऑगस्ट-**



किसान एकता संघ भारत दिल्ली संघटनेच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी अक्कलकोट तालुक्यातील बोरोटी येथील चंद्रकांत पाटील यांची निवड करण्यात आली.

राष्ट्रीय अध्यक्ष सोरन प्रधान दिल्ली यांनी सदरची निवड एकमताने केली आहे. यावेळी महाराष्ट्र संरक्षक सुनिता येरणे, प्रदेश प्रभारी व प्रदेशाध्यक्ष सुधीर इंगळे, महाराष्ट्र प्रदेश राज्य कार्य अध्यक्ष तात्यासाहेब मते, महाराष्ट्र राज्य प्रदेश महिला अध्यक्ष मालती मुळे, युवती महाराष्ट्र प्रदेश महिला अध्यक्ष कल्याणी मुळे, बुलढाणा जिल्हा अध्यक्ष पुरुषोत्तम गायकी,सोलापूर जिल्हा अध्यक्ष तुकाराम गायकवाड पाटील आदींची उपस्थिती होती. तालुका युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष म्हणून पाटील यांनी काम केले आहे. श्री. पाटील यांच्या निवडी बद्दल बोरोटी गावात स्वागत करण्यात आले. माजीमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांचे कट्टर समर्थक म्हणून श्री.पाटील ओळखले जातात. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी सरकाराला धारेवर धरणार असल्याची माहिती श्री. पाटील यांनी दिली.

## प्रा. धनाजी चव्हाण यांना बेस्ट कॅबिनेट ऑफिसर पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.४ ऑगस्ट-**

सांगोला लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष प्रा.धनाजी चव्हाण यांचा बेस्ट कॅबिनेट ऑफिसर पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

येथे संपन्न झालेल्या पदग्रहण समारंभामध्ये माजी प्रांतपाल सुनील सुतार यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला. यावेळी मार्गदर्शक माजी प्रांतपाल प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सांगोला लायन्स क्लबचे अध्यक्ष उन्मेष आटपाडीकर, रिजन चेअरमन श्रीनिवास कटकुर, झोन चेअरमन सोमशेखर भोगडे उपस्थित होते. लायन वर्ष २०२४-२५ मध्ये प्रा. झपके यांचे मार्गदर्शनाखाली प्रांत ३२३४ ड १ मध्ये ब्लड डोनेशन




कॅम्प याविषयी प्रा.धनाजी चव्हाण यांनी कॅबिनेट ऑफिसर या पदाच्या माध्यमातून केलेले कार्य प्रमाण मानून प्रातांच्या जयघोष या अॅवॉर्ड नाईट समारंभामध्ये प्रांतपाल अॅड. एम.के.पाटील यांनी हा पुरस्कार घोषित केला होता. याबद्दल प्रा.धनाजी चव्हाण यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## एक राखी सैनिकांसाठी : मनपा शाळा क्रमांक २९चा उपक्रम

### विद्यार्थ्यांनी या राख्यांसोबत पाठवली आदर, कृतज्ञतेने भरलेली पत्रे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ ऑगस्ट-**

भवानी पेठ, सोलापूर येथील मनपा मुलांची मराठी शाळा क्रमांक २९ येथे एक राखी सैनिकांसाठी या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेल्या राख्या देशभरातील विविध राज्यांमध्ये सेवेवर असलेल्या भारतीय सीमेवरील




जवानांना पाठवल्या.

विद्यार्थ्यांनी या राख्यांसोबत प्रेम, आदर आणि कृतज्ञतेने भरलेली पत्रेही लिहिली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, सृजनशीलता व संवेदनशीलतेची भावना जागृत झाली. या उपक्रमासाठी मुख्याध्यापक नवनाथ माळी सरांनी विद्यार्थ्यांना सैनिकांप्रती असणाऱ्या आदरभावनेचे महत्त्व समजावून सांगितले. शिक्षक अरुण डोके यांनी विद्यार्थ्यांना पत्रलेखनाचे मार्गदर्शन केले. सहशिक्षक अविनाश हिंगणे यांनी सैनिकांशी थेट संपर्क साधून सर्व पत्ते मिळवून दिले आणि उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. या उपक्रमात बालवाडी विभागाचाही मोलाचा सहभाग होता. बालवाडी शिक्षिका कांचन गोपाळकर आणि सेविका कल्पना शिंदे यांनी लहान मुलांना राखी बनवण्यास मार्गदर्शन करून उत्साहपूर्वक सहभाग नोंदवला. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये देशसेवा, कृतज्ञता, पत्रलेखन कौशल्य आणि सृजनात्मकतेचा सुंदर संगम घडवून देणारा ठरला.

# जिल्ह्यात अनेक लाडक्या बहिणींचा लाभ बंद

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ४ ऑगस्ट-**

विधानसभा निवडणूकीपुर्वी महायुती शासनाने महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही योजना सुरू केली. यामध्ये महिन्याला दीड हजार रुपये एवढा लाभ दिला जातो. निवडणूकीपूर्वी कोणताही निकष न लावता सुरू केलेल्या योजनेची आता मात्र पडताळणी करण्यात आली. त्यामुळे जवळपास ४० लाख २८ हजार महिला या योजनेसाठी अपात्र ठरल्या आहेत.

तसेच महाराष्ट्रातील नमो सन्मान योजनेतील चौथा लाख महीला या नमो सन्मान योजनेतील लाभार्थी आहेत त्यांचा लाभ एक हजार रुपयांनी कमी करण्यात आला आहे. तर ज्या कुटुंबाचे उतपन्न अडीच लाखापेक्षा जास्त आहे त्या महिलांच्या नावापुढे एफ एसी ( फायनांनशिअली स्ट्राग कंडीशन) असा शेरा मारीत सदर महीलेचा लाभ बंद करण्यात आला आहे. एक जुलै २०२४ पासुन म्हणजेच विधानसभा निवडणूकीपुरवी ही योजना सुरू करण्यात आली तेव्हा कोणतेही निकष लावण्यात आले नव्हते मात्र आता त्याची तपासणी केली असता १४ हजार २९८ पुरुषांनी कागदपत्रे बदलुन लाभ घेतला आहे तसेच दोन हजार २८९ शासकीय नोकरी करणाऱ्या महीलांनी तर संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेणाऱ्या दोन लाख




बत्तीस हजार महीलांनी याचा लाभ घेतला आहे, ६५ वर्षाच्या पुढील एक लाख दहा हजार महीलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे तर एकाच कुटुंबातील चार लाख महीलांनी तर चारचाकी वाहनधारक सव्वा दोन लाख महीलांनी सुद्धा या योजनेचा लाभ घेतला आहे. तर एक लाख साठ हजार महीलांनी स्वतः हुन लाभ नाकारला आहे.हे सर्व पाहता महाराष्ट्रातील जवळपास अर्धा कोटी महीलांचा मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ बंद झाला आहे. विधानसभा निवडणूकीपुरवी २.५९ कोटी लाभार्थी होते ते आता २ कोटी राहीले असुन त्यावेळी जवळपास प्रत्येक महीन्याला ३,८८५ कोटी एवढी रक्कम लागत होती तर जवळपास ४६,००० कोटीची तरतूद आता अंतिम पडताळणी नंतर २ कोटी लाभार्थी साठी प्रत्येक महीन्याला ३,००० कोटी व तरतुद ३६,००० कोटी

> यामध्ये गैरमार्गाने १४ हजार २९८ पुरुष व शासकीय कर्मचारी दोन हजार २८९ यांच्या कडुन मात्र रक्कम वसुल करण्याचे स्पष्ट संकेत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिले आहेत.

यामुळे सरकाचे जवळपास दहा हजार कोटीची रक्कम वाचली आहे. सध्या अनेक महीलांना या योजनेचा लाभ बंद झाला आहे कारण ज्या कुटुंबाचे वार्षीक उत्पन्न अडीच लाख रुपयापेक्षा जास्त आहे. अशया महिलांच्या नावापुढे एफ एससीचा शेरा मारला आहे अश्या महीलांना यापुढे या योजनेचा लाभ मिळणार नाही असे प्रशासनाने जाहीर केले आहे.

## महत्वाचे...



### सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनच्या प्रभारी सरचिटणीसपदी उमाकांत गायकवाड

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनच्या प्रभारी सरचिटणीसपदी उमाकांत तिप्पण्णा गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यकारणीच्या बैठकीत त्यांची नियुक्ती करण्यात आली. मावळते सरचिटणीस ए.बी. संगवे यांनी त्यांच्याकडे सरचिटणीस पदाचा कार्यभार सुपूर्त केला. या बैठकीत यंदाच्या वर्षातील जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजक व स्थळ ठरविण्यात आले. पुरुष व महिला स्पर्धा उत्कर्ष क्रीडा मंडळ, कुमार व मुली स्पर्धा किरण स्पोर्ट्स क्लब तर किशोर व किशोरी स्पर्धा श्री छत्रपती शिवाजी विद्यालय वीट (ता. करमाळा) यांनी आयोजित करावे असे ठरले.तसेच या बैठकीत विशेष निमंत्रित सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. प्राचार्य रवींद्र चव्हाण, गुलाम मुजावर, सुरेश खुर्द भोसले, पुंडलिक कलखांबकर, शिवशंकर राठोड, विनोद ढेरे (करमाळा) व संदीप ठोंगे (बार्शी) या सदस्यांची नियुक्ती करण्यात आली.



### महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या उपाध्यक्षपदी भरत मेकाले

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

राज्य कुस्तीगीर परिषदेवर निवड झाल्याबद्दल भरत मेकाले यांचा छत्रपती शिवाजी जिमखाना विभागाच्या वतीने सन्मान, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या उपाध्यक्षपदी भरत मेकाले यांची निवड झाल्याबद्दल श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संकुल जिमखाना विभाग सोलापूर यांचे वतीने प्राचार्य डॉ अरुण मित्रगोत्री प्रा संतोष गवळी व सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा सचिन गायकवाड यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. उपमहाराष्ट्र केसरी श्री मेकाले हे छत्रपती शिवाजी शिक्षण संकुलाचे माजी विद्यार्थी असून त्यांनी शालेय जीवनापासून विविध राज्य व राष्ट्रीय स्पर्धा तसेच आंतर विद्यापीठ स्पर्धेत उत्तुंग यश मिळविले असून त्यानंतर इंडियन नेव्ही मध्ये कर्तव्य बजावून सध्या श्रीकृष्ण तालीम व्यायाम शाळेच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यातील अनेक खेळाडूंना मार्गदर्शन करण्याचे कार्य ते करत आहेत याचा छत्रपती शिवाजी शिक्षण संकुलाला सार्थ अभिमान आहे. या सत्कार समारंभ प्रसंगी महाविद्यालयाचे प्र प्राचार्य डॉ अरुण मित्रगोत्री, डॉ अरुण सोनकांबळे, प्रा युवराज सुरवसे, प्रा ओहोळ, प्रा सौ मोटे, प्रा अमोल वाघमोडे, शहाजी जाधव, राजाभाऊ गधुरे, दत्ता भोसले यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### जीएसटी गुप्तचर यंत्रणेच्या कारवाईतील अटक वकील साजिद शेख यांना जामीन मंजूर

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

येथील रहिवासी जी.एस.टी सल्लागार वकील साजिद अहमद शेख (वय ४६, रा सोलापूर) यास बोगस कंपन्यांची खरेदी-विक्रीची बिले सादर करून त्याद्वारे सुमारे ४४ कोटी रुपयांची वस्तू व सेवा विक्रीकर (जीएसटी) फसवणूक केल्याप्रकरणीच्या गुन्ह्यात कोल्हापूर येथील न्यायदंडाधिकारी कोर्टाने जामीन मंजूर केला. यात जी.एस. टी कार्यालयाचा आरोप असा की, येथील जी एस टी सल्लागार वकील साजिद अहमद शेख याने ३० बनावट कंपन्या सुरू केल्या होत्या. आरोपी हा प्रत्यक्षात वस्तूंची विक्री न करताच बनावट बिलांच्या आधारे कर चोरी केल्याचा संशय होता, त्यावरून केंद्रीय जीएसटी गुप्तचर अधिकाऱ्यांच्या पथकाने अटकेपूर्वी आरोपीच्या सोलापुरातील कार्यालयावर छापा टाकला होता. त्याचदिवशी त्याच्या १२ कंपन्यांची चौकशी केली. त्यात सुमारे ४४ कोटीपर्यंत कर चोरी केल्याचे जी.एस.टी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले होते. इतर १८ कंपन्यांसह कर चोरीची रक्कम ४४ कोटींच्या वर वाढण्याच्या अधिकाऱ्यांचा अंदाज आहे. या आरोपीने शासनाची गेल्या चार वर्षापासून कर चोरी करून फसवणूक केल्याप्रकरणी २२ मे २०२५ रोजी अटक केली होती. त्यानंतर या आरोपीची न्यायालयाने न्यायालयीन कोठडीत रवानगी केली होती. याकामी आरोपीने कोल्हापूर येथील न्यायल्यामध्ये जामीन अर्ज दाखल केला. या जामीन अर्जाची सुनावणी झाली. यावेळी आरोपीच्या वकिलांनी न्यायाल्यासमोर असा युक्तिवाद केला की, आरोपीस केवळ संशयच्या आधारे अटक झालेली आहे, आरोपीने कोणाचीही फसवणूक केलेली नाही अथवा कर चुकवेगिरी देखील केलेली नाही, आरोपीस अटक करुन ६० दिवस झाले आहेत. या आरोपीविरुद्ध वेळेत आरोप पत्र दाखल केलेली नाही. त्यामुळे आरोपी जमिनास पात्र आहे. आरोपी वकील असून कार्यवाही कामी संपूर्ण सहकार्य करत आहे. त्यामुळे आरोपीस जमिनावर सोडावे. त्याकरिता त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे निवाडे सादर केले. आरोपीच्या जामीनास सरकारी वकिलांनी तीव्र विरोध केला. तथापि आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीस पासपोर्ट जमा करण्याच्या, तपासकामी सहकार्य करण्याच्या, परदेशात न जाणाच्या, तसेच १० कोटी रक्कम कोर्टात जमा करणेच्या अटी व शर्तीवर जामीन मंजूर केला. याकामी आरोपीतर्फे यांचेतर्फे ॲड. शशी कुलकर्णी, ॲड. गुरुदत्त बोरगांवकर, ॲड. देवदत्त बोरगावकर, ॲड. सचिन शिंदे (कोल्हापूर) यांनी तर सरकारतर्फे विशेष सरकारी वकील ॲड. शेखर टोणपे यांनी काम पहिले.



## एक तासाच्या फरकाने

# शहरात दोन ठिकाणी जबरी चोरी

### चार लाखांचे सोन्याचे दागिने धुम स्टाईलने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट -**

शहरात शनिवारी रात्री एक तासाच्या फरकाने दोन ठिकाणी महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी धुम स्टाईलने जबरदस्तीने चोरून नेले. या दोन्ही घटनांबाबत सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

इंदुबाई तानाजी कांबळे (वय ५५, रा. विष्णु मिल चाळ, डोणगाव रोड, सोलापूर) या व त्यांचे भाऊ बाबूराव भोपळे (रा. वांगी, ता. दक्षिण सोलापूर) हे दोघे २ ऑगस्ट रोजी सायंकाळी सातच्या सुमारास लक्ष्मी विष्णु चाळ कडे जात होते. त्यावेळी डोणगाव रोडवरील भोजप्पा तांड्याजवळील कॅनॉल जवळील नागोबा मंदीरजवळ दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी त्यांना सेंटलमेंटकडे जाणारा रस्ता कोणता आहे असे विचारले, त्यावेळी इंदुबाई या रस्ता सांगत असताना दुचाकीवर पाठीमागे बसलेल्या चोरट्याने इंदुबाई यांच्या गळ्यातील ५० हजार रुपये किंमतीचे एक तोळ्याचे सोन्याचे गंठण जबरदस्तीने हिसका मारून ओढून नेले. याबाबत सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



तर दुसऱ्या घटनेत वयोवृद्ध महिलेच्या घरात पार्सल आल्याचे बहाणा करून घरात घुसला, महिलेस धक्का देत खाली पाडले, चाकूचा धाक दाखवून पायावर उभा राहत महिलेच्या दोन्ही हातातील पाटल्या, अंगठी व गळ्यातील माळ असे एकुण ८ तोळ्याचे दागिने लंपास केले. ही घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील बाळे स्टेशन, सुपाते वस्ती सोलापूर या ठिकाणी घडली आहे. याबबात कमल राजाराम सुपाते (वय ७६ रा. सुपाते वस्ती, बाळे स्टेशन सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन अनोळखी व्यक्तीवर गुन्हा नोंद झाला आहे. दोन ऑगस्ट रोजी कमल सुपाते या रात्री घरी एकट्यास असताना दोन व्यक्ती त्यांच्या घरात घुसले. त्यांनी कमल यांना ढकलून खाली पाडले. एकजण सुपाते यांच्या पायावर उभा राहिला. त्या अनोळखी दोघांनी चाकूचा धाक दाखवून वयोवृध्द महिलेस धम कावले व पैसे कुठे ठेवल्याची विचारणा केली, त्यावेळी फिर्यादीने पैसे नाहीत असे सांगितले. त्यामुळे दोघांनी सुरुवातील दोन्ही हातातील पाच तोळ्याच्या पाटल्या कटरने कापून घेतल्या. डाव्या हातातील ३ ग्रॅमची अंगठी कापून घेतली तसेच वयोवृध्द महिलेच्या गळ्यातील दिड तोळे सोन्याच्या मण्याची माळ असे एकुण ३ लाख ४० हजाराचा ऐवज जबरदस्तीने काढून घेऊन पोबरा केला. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक शिंदे पुढील तपास करीत आहेत.

## हरवलेले रत्ने मूळ मालकाचा शोध घेवून परत

### सोलापूर शहर पोलीसांचा प्रामाणिकपणा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट -**

हरवलेले रत्ने मूळ मालकाचा शोध घेवून सोलापूर शहर पोलिसांकडून परत करण्यात आली.

पोलीस आयुक्त कार्यालय दोषसिध्दी पथकात कार्यरत असलेल्या महिला पोलिस हवालदार अश्विनी लोकरे या ३ ऑगस्ट रोजी माणिक चौक परिसरातील आजोबा गणपती मंदिर परिसरात खरेदीसाठी गेल्या होत्या. त्यावेळी त्यांना रस्त्यावर एक पाकीट मिळाले, त्यामध्ये पाचू व मोती ही रत्ने होती. मिळालेल्या पाकीटावरून महिला पोलिस कर्मचारी अश्विनी लोकरे यांनी या पाकिटाचे मूळ मालक विजय ज्वेलर्सचे मालक संतोष मोहन-



लाल शहा यांचा मोबाईल क्रमांक मिळवून त्यांना पाचू व मोती ही ८ हजार रुपयांची रत्ने परत केली. लोकरे यांना मिळालेले हे पाकीट विजय शहा यांच्या कामगाराकडून डिलीव्हरीसाठी घेवून जात असताना, पडून गहाळ झाले होते अशी माहिती मिळाली.

महिला पोलिस हवालदार अश्विनी लोकरे यांनी प्रामाणिकपणे नमूद पाकीट मूळ मालक यांना परत केल्याने, संतोष यांनी लोकरे यांचे कौतुक करून सोलापूर शहर पोलीस दलाचे आभार मानले.



## अनिता माळगे राज्य समन्वयकपदी नियुक्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ ऑगस्ट-**

बोरामणी (ता. दक्षिण सोलापूर) येथील यशस्विनी ॲग्रो प्रोड्यूसर कंपनी या देशातील पहिल्या महिला शेतकरी कंपनीच्या संस्थापिका शिवसेना शिंदे गटाच्या जिल्हा महिला संपर्कप्रमुख अनिता माळगे यांची राज्य महिला सक्षमीकरण स्मन्वयकपदी नियुक्ती झाली आहे.

मुंबईत पक्षनेत्या मीनाताई कांबळी, उपनेत्या शीतलताई म्हात्रे, सचिव संजय मोरे, रामभाई रेपाळे, प्रियांका परांडे यांच्या उपस्थितीत सौ. माळगे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. शिवसेनेचे मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सौ. माळगे यांना हि जबाबदारी दिली. सोलापूर जिल्हात शिवसेना पक्षाची ताकत वाढवण्यात सौ. माळगे यांची भूमिका महत्वाची ठरली आहे. शेतकरी महिला कंपनी व बचत गट कामामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी, कृषिमंत्री शिवराजसिंह चव्हाण व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सौ. माळगे यांचा गौरव केला आहे.

## सेवानिवृत्त प्राचार्य, प्राध्यापकांच्या हक्कासाठी करणार आंदोलन

### प्राचार्य के.एम. जमादार; सहविचार सभेत प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

केंद्र सरकारने सेवानिवृत्त प्राचार्य प्राध्यापक तसेच सरकारी कर्मचाऱ्यांच्या विरोधात फायनान्स अँक्ट २०२५ पारित केला त्यामुळे देशभरातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यावर अन्याय झाला आहे सेवानिवृत्त व्यक्तीं ची मानसिक अवस्था विचित्र झाली आहे अशा स्थितीत आमचे न्याय हक्क हिरावून घेऊ नका अन्यथा आम्हास सनदशीर मार्गाने आंदोलन करावे लागेल असा इशारा प्राचार्य के एम जमादार यांनी दिला.

सात रस्ता परिसरातील संगमेश्वर महाविद्यालयात असोसिएशन ऑफ कॉलेज अँड युनिव्हर्सिटी सुपर अँन्यूएड टीचर्स संघटनेने आयोजित केलेल्या सहविचार सभेत ते बोलत होते व्यासपीठावर विभागीय अध्यक्ष प्राचार्य एम ए शेख सचिव प्रा उत्तमराव चौगुले प्रा पांडुरंग कुलकर्णी प्रा विद्यासागर आगाशे प्रा



मारुती साळुंखे उपस्थित होते

प्राचार्य एम. ए. शेख यांनी केंद्र सरकारच्या जाचक कायद्यातील अटीचे विश्लेषण केले आयुष्यभर सरकारी सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना यापुढे महागाई भत्ता आठवा वेतन आयोग देण्यास केंद्राने असमर्थता दर्शविली आहे असे सांगितले संघटनेच्या आदेशानुसार सरकारच्या विरुद्ध कायदेशीर लढाई देण्याची वेळ आल्यास सभासदांनी सज्ज रहावे असे आवाहन देखील त्यांनी केले. सेवानिवृत्त प्राचार्य प्राध्यापकांच्या ज्वलंत प्रश्नावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केलेल्या सहविचार सभेस जिल्ह्यातून ७८ प्रतिनिधी उपस्थित होते, संघटनेच्या आदेशानुसार अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रतिज्ञा यावेळी उपस्थित प्रतिनिधींनी केली. प्रास्ताविक प्रा उत्तमराव चौगुले यांनी केले, डॉ नभा काकडे यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे प्रा डॉ राजकुमार मोहोरकर डॉ मल्लिनाथ अंजुगीकर यांनी प्रयत्न केले.

## शेटेनगर येथील दूषित पाण्याचा प्रश्न निकाली

### आयुक्त डॉ. ओम्बासे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ ऑगस्ट-**

शेटे नगर येथील दूषित पाण्याचा प्रश्न तात्काळ कार्यवाही करत निकाली लावल्याबद्दल तेथील रहिवाशांनी समाधान व्यक्त करत महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचा सत्कार केला. शेटेनगर भागातील नागरिकांना गेल्या काही महिन्यांपासून नळाद्वारे येणाऱ्या दूषित पाण्यामुळे त्रास सहन करावा लागत होता. या समस्येची गंभीर दखल सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी तात्काळ घेत शेटेनगर येथे नवीन पाईपलाईन घालण्याचे आदेश संबंधित विभागास दिले.नागरिकांना आता स्वच्छ व शुद्ध पाणी मिळण्यास



प्रारंभ झाला आहे.

या कामाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली असून नागरिकांना आता स्वच्छ व शुद्ध पाणी मिळण्यास प्रारंभ झाला आहे. या कामात विभागीय अधिकारी जावेद पानगल, राजेंद्र गायधनकर, अजिंक्य विपत, अवर अभियंता राजेश काकडे, राजा नवगिरे व त्यांच्या टीमने विशेष परिश्रम घेतले. या समस्येचे त्वरित निराकरण झाल्यामुळे शेटेनगर परिसरातील सर्व नागरिकांनी समाधान व्यक्त केले. त्यांनी सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचे आभार मानले. नागरिकांनी आयुक्त डॉ. ओम्बासे यांचा सत्कार देखील केला.यावेळी शेटे नगर येथील संजय भांडरे, राजेश गवळी, सूर्यकांत सरवदे, महेश जगताप, किरण फडके यांच्यासह परिसरतील नागरिक उपस्थित होते. सोलापूर महानगरपालिका नेहमीच नागरिकांच्या गरजा, समस्या आणि त्यांच्या सोयीसाठी तत्पर असून भविष्यातही अशीच तत्परता आणि कार्यक्षमता दाखवत राहील, असा विश्वास महापालिकेकडून महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी व्यक्त केला.

## आयुष्यात शिस्तप्रिय व्हा

### प्राचार्या दीपा फाटक यांचा विद्यार्थ्यांना सल्ला

**तभा वृत्तेसाव**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

शैक्षणिक वाटचालीतील इयत्ता दहावीचा महत्त्वपूर्ण टप्पा पार केल्यानंतर कनिष्ठ महाविद्यालयीन इयत्ता अकरावी व बारावीचे महत्त्व आणि त्यासाठी करावे लागणारे प्रयत्न सांगत आयुष्यात शिस्तप्रिय होण्याचा सल्ला हरीभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या दीपा फाटक यांनी आपल्या अभिभाषणात विद्यार्थ्यांना दिला.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता अकरावी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे वर्ग ४ ऑगस्टपासून सुरू करण्यात आले. याप्रसंगी या कनिष्ठ म



हाविद्यालयात इयत्ता अकरावीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्राचार्यांनी स्वागत केले आणि महाविद्यालयात उपलब्ध भौतिक, शैक्षणिक सुविधा, घेतले जाणारे उपक्रम, नियम आणि शिस्त याबद्दल माहिती दिली. विद्यार्थ्यांनी ज्ञानार्थी बनून उज्वल भविष्याची गुढी या महाविद्यालयात रोवावी आणि आपल्या कुटुंबाचा, समाजाचा आणि देशाचा सन्मान वाढवावा असा सल्ला दिला. पर्यवेक्षक श्री बनसोडे यांनी महाविद्यालयाचे नियम सांगून विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयातील वर्तनाबद्दल सूचना दिल्या. सर्व शिक्षकांचा परिचय राऊत यांनी करून दिला. प्रास्ताविक पर्यवेक्षक कुंभार यांनी केले. प्राचार्यांचा परिचय अनपट यांनी करून दिला. सूत्रसंचालन श्रीमती चव्हाण यांनी केले.पाटील यांनी आभार मानले.

# मालमत्ता कराची यंदा विक्रमी वसुली



### जुलै महिन्याचे १६ कोटींच्या उद्दिष्टाच्या पार २४ कोटींची वसुली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट -**

सोलापूर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाने मालमत्ता कराची यंदा विक्रमी वसुली केली आहे. जुलै महिन्याचे १६ कोटींच्या उद्दिष्टाच्या पार करून २४ कोटींची वसुली करण्यात आली आहे.

**उल्लेखनीय यशाबद्दल आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी केले कौतुक**

या उल्लेखनीय यशाबद्दल आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी उपायुक्त आशिष लोकरे, व विभागप्रमुख युवराज गाडेकर व सर्व संबंधित कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले असून पुढील काळात हीच कामगिरी अधिक गतिमानपणे पुढे नेण्याच्या सूचना देखील दिल्या आहेत.

सोलापूर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाने आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपायुक्त आशिष लोकरे यांच्या नियंत्रणाखाली मागील तीन महिन्यांतील उद्दिष्ट यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. विशेषतः जुलै २०२५ महिन्यात मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट १६ कोटी रुपये इतके निर्धारित करण्यात आले होते, परंतु या उद्दिष्टाच्या तुलनेत तब्बल ८ कोटी रुपयांनी जास्त, म्हणजेच एकूण २४.९९ कोटी रुपयांची प्रभावी वसुली करण्यात या विभागाला यश आले आहे. ही कामगिरी मालमत्ता कर विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सातत्याने घेतलेले परिश्रम, जनजागृती उपक्रम तसेच तांत्रिक साधनांच्या प्रभावी वापराचा परिपाक आहे. नागरिकांनी देखील शहराच्या विकासात आपले योगदान समजून वेळेवर कर भरण्यास प्रतिसाद दिला, ही बाब निश्चितच स्वागतार्ह आहे. मालमत्ता कर विभागाकडून वसुली वाढवण्यासाठी मागील काही महिन्यांपासून विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये घरपोच कर बिल वितरण, ऑनलाइन भरणा सुलभता, कर न भरलेल्या मालमत्तांची यादी तयार करून त्यांच्यावर कार्यवाही, तसेच विशेष वसुली मोहिमा हाती घेण्यात आल्या. सोलापूर शहराच्या समग्र विकासासाठी मालमत्ता कर हा एक महत्त्वाचा आर्थिक स्त्रोत आहे. नागरिकांनी कर भरणे ही आपली सामाजिक जबाबदारी समजून यामध्ये सातत्याने सहभाग नोंदवावा, असे आवाहन सोलापूर महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे.



## ठोकळ प्रशालेत आनंददायी शनिवार

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट**

इंदिरा ज्ञानवर्धिनी संचलित श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात 'आनंददायी शनिवार उपक्रम अंतर्गत ७०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी घोटीव कागदापासून फुलं, कागदी छड्या, आर्ट अँड क्राफ्टच्या विविध वस्तू, सजावटीसाठी साहित्य, तसेच भारतीय स्वातंत्र्य दिनानिंमित्त तिरंग्याच्या रंगांची कलाकुसर विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी तयार केली. विविध रंगांनी सजवलेल्या या वस्तूंमधून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचा आणि हस्तकलेचा उत्कृष्ट नमुना दिसून आला. उत्तर प्रदेशमधील सुरेंद्र रॉय यांनी ही कार्यशाळा घेतली. यामुळे विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांपलीकडील शिक्षण, सृजनशीलता आणि गटात काम करण्याची संधी मिळाली. याचे आयोजन प्राचार्य डी. डी. गाजरे यांनी केले. या आयोजनाबद्दल संस्थापक अध्यक्षा निर्मलाताई ठोकळ, अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे व संचालिका शिल्पाताई ठोकळ यांनी विद्यार्थी स्टाफचे कौतुक केले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



**वृद्धांसाठी मोटर कारची सोय**
सोलापूर : सिद्धेश्वर मंदिरात दुसऱ्या श्रावण सोमवारी भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यामध्ये वृद्ध भाविकांसाठी मंदिरात येण्या-जाण्यासाठी मोटर कारची सोय करण्यात आली आहे.



## महत्वाचे...

### मनोज जरांगे-पाटील उद्या सोलापुरात

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर लढा देण्याकरिता दिशा ठरविण्यासाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे बुधवार, दि. ६ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता सात रस्ता येतील शासकीय विश्रामगृह येथे दाखल होणार आहेत. जरांगे पाटील यांच्या आगमनानंतर डाक बंगला येथे दिवसभर सोलापूर शहर व जिल्ह्यातील मराठा आंदोलनातील सर्व मराठा बांधवांची ते भेट घेणार आहेत.



तरी सोलापूर जिल्ह्यातील मराठा बांधवांनी या बैठकीस उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन सकल मराठा समाज शहर व जिल्ह्याच्या वतीने करण्यात आले आहे.आंदोलनामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मराठा बांधवांसोबत मनोज जरांगे पाटील हे दिवसभर चर्चा करण्याकरिता सोलापूरमध्ये उपलब्ध असणार आहेत. समाज बांधवांकडून करण्यात येणाऱ्या सूचनांबाबत ते चर्चा करतील आणि नंतर सर्वांच्या विचार विनिमयानंतर निर्णय जाहीर करणार आहेत.

### हत्तुर येथील शेतातून सव्वा लाखांचे साहित्य चोरीस

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तूर गाव येथील शेतात असलेल्या वीजेवरील दोन मोटार, सहा मीटरचे तीन सेट पाईप व स्प्रिंकलर असे एकुण सव्वा लाखाचे साहित्य चोरून नेले आहे. याबाबत अॅड. रणजित शामराव पवार (रा.१९ बी डॉ. कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सागर स्वामीनाथ अंबाडे (रा. अमृत नगर विजापूर रोड सोलापूर) यांच्यावर विजापूर नाका पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. ही घटना जुलै २०२४ ते १७ जुलै २०२५ दरम्यान घडली. हत्तुरगाव येथील शेतात १लाख ३० हजार १०० रुपयाच्या किंमतीच्या हेरिटेज ग्रुप व कोणार्क अॅग्रो कंपनीचे डायरेक्टर कांतीलाल शहा यांच्या मालकीच्या वीजेवरील मोटार, लिंबाचे झाड व इतर झाडे तोडली आहेत, सदरच्या वस्तू ही शेतातून चोरून नेल्याचे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस हवालदार हार करीत आहेत.

### राज्य गतका स्पर्धेसाठी ११ ऑगस्टला निवड चाचणी

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

जिल्ह्याचे गतका संघ निवडण्यासाठी ११ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज येथे निवड चाचणी आयोजित केली आहे. गतका हा पारंपरिक पंजाबी लढाऊ खेळ असून, तो केवळ एक खेळ नसून शौर्य, सहनशीलता आणि आत्म संरक्षणाची संस्कृती देखील शिकवतो. इच्छुक विद्यार्थ्यांनी १० ऑगस्टपूर्वी ९९६०७८३००६ अथवा ९४२१० २२१६९ यानंबरवर नोंदणी करावी, असे सोलापूर गतका असोसिएशनचे अध्यक्ष संतोष गवळी, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर काळे आणि सचिव स्वाती म्यागेरी यांनी कळविले.

# एक दिवस सोलापूरसाठी...

## आ. सुभाष देशमुखांचे सोलापूरकरांना आवाहन

- येत्या सप्टेंबर अखेरीस सोलापुरात पर्यटन सप्ताह
- लोकसहभाग गरजेचा; लेकींचे सासर अन् सुनेच्या माहेरच्यांना निमंत्रण...




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

सोलापूरचा विकास करावयाचा असेल तर तो सोलापूरकरांच्या पुढाकाराशिवाय तो सहजरित्या होणार नसल्याने सोलापूरकरांनी एक दिवस सोलापूरसाठी द्यावा आणि येत्या २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान साजऱ्या होणाऱ्या सोलापूर पर्यटन महोत्सवात शहर व जिल्ह्यातील प्रत्येक कुटुंबाने सहर्ष सहभाग घ्यावा. आपल्या विवाहित लेकीला सासरच्या मंडळींसह आणि आपल्या सुनेच्या माहेरच्यांना सहकुटुंब या पर्यटन सप्ताहात सोलापुरात निमंत्रित करावे. ग्रामदैवत श्री सिध्देश्वर मंदिर, श्री सिध्दरामेश्वरांनी स्थापन केलेले अष्टविनायक मंदिर, भुईकोट किल्ला, अक्कलकोटच्या स्वामी समर्थांचे दर्शन, सोलापूरी चादर, टॉवेल, खाद्य संस्कृतीसह येथील धार्मिक पर्यटनाचा पाहुण्यांनी लाभ घ्यावा, असा उद्देश या उपक्रमामागे आहे.



सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील धार्मिक, ऐतिहासिक पर्यटन तसेच जिल्ह्यातील उत्पादित मालाचे मार्केटिंग करण्यासाठी यंदाच्या जागतिक पर्यटन सप्ताहात आमदार सुभाष देशमुख एक नवीन संकल्पना जिल्हावासियांसमोर मांडत आहेत. यात सोलापूर जिल्ह्यातील तमाम नागरिकांनी सहभाग नोंदविला तर जिल्ह्याचा आर्थिक आलेख उंचावणार असल्याची माहिती आमदार सुभाष देशमुख यांनी आज (दि. ४) दैनिक तरुण भारत कार्यालयास दिलेल्या सदिच्छा भेटीत दिली. प्रारंभी मुख्य संपादक प्रशांत माने यांनी आमदार देशमुख यांचे स्वागत केले.

आमदार देशमुखांनी पर्यटन सप्ताहाची संकल्पना मांडली. त्यांच्या पर्यटन सप्ताहाच्या संकल्पनेनुसार सोलापूर शहरासह जिल्ह्यातील प्रत्येक गावच्या नागरिकांनी आपल्या परगावी राहणाऱ्या लेकी, सुना, पै-पाहुणे यांना आपल्या सोलापूर जिल्ह्यातील पर्यटनासाठी या सप्ताहात आग्रहाने बोलवावे. जिल्ह्यातील ४० लाख लोकांनी नातेवाईकांना जिल्ह्यातील धार्मिक, ऐतिहासिक पर्यटनासाठी बोलावले तर जिल्ह्याची महती सर्वदूर पोहचले.

सोलापूरच्या शक्तीस्थळांची माहिती महाराष्ट्रभर पोहचून सोलापूरला येणाऱ्यांची संख्या वाढेल. यासाठी सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांनी आपले पै-पाहुणे आणि लेकी-सुनांना जिल्ह्यातील पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, सोलापूरचा श्री सिध्दरामेश्वर, गाणगापूर या तीर्थक्षेत्राची विस्तारित माहिती देवून त्या पाहुण्यांना या सप्ताहात (दि.२७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर) आपापल्या गावी बोलवावे. यातून जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनाबरोबर आपल्या गावातील माणसांची, आपल्या गावच्या उत्पादित मालाचीही मार्केटिंग होते. यामधून आपल्या जिल्ह्यात करोडोंनी उलाढाल होवून सर्वअनुषंगाने सोलापूरच्या प्रगतीचा आलेख उंचावत जाईल.

### सोलापूरच्या विकासासाठी लोकसहभाग महत्वाचा

यंदाचे हे पहिले वर्ष आहे. यावर्षी सर्व नागरिकांना आवाहन करुन आपल्या ऐतिहासिक, धार्मिक पर्यटनस्थळांची माहिती देण्यात येणार आहे. या सप्ताहात लोकांचा चांगला प्रतिसाद लाभला तर हा सप्ताह महिनावरच काय वर्षभर देखील अविरत सुरु राहू शकतो. यासाठी लोकमंगल परिवार, स्थानिकच्या विविध संस्था, सर्वपक्षीय नेतेमंडळींचा सहभाग आवश्यक आहे. एकंदरीत, सोलापूर शहर-जिल्ह्यातील तमाम नागरिकांचे यासाठी योगदान आवश्यक आहे. कारण लोकसहभागाशिवाय विकास शक्य नाही आणि नक्कीच सोलापूरकर सोलापूरच्या विकासासाठी आपला एक दिवस देतील यात शंका नसल्याचा विश्वास आ. सुभाष देशमुख यांनी व्यक्त केला. आपल्या सोलापूरची वाटचाल आर्थिक उन्नतीकडे होईल, हाच माझा प्रामाणिक उद्देश आहे.

**- सुभाष देशमुख,**
माजी सहकार मंत्री तथा आमदार

### एक दिवस आपल्या गावासाठी द्या

आपल्या गावातून लग्न होवून परगावी गेलेल्या लेकी, नोकरीनिमित्त देश-विदेशात गेलेल्यांनी या सप्ताहात एक दिवस आपल्या गावासाठी द्यावा. या दिवशी आपल्या जिल्ह्यातील काही पर्यटन स्थळांना भेटी द्याव्यात किंवा आपल्या गावच्या धार्मिक, ऐतिहासिक स्थळांना भेट द्यावी. शाळांनी माजी विद्यार्थ्यांचे गेटटुगेदर भरवावे, विद्यार्थ्यांच्या सहली काढाव्यात, सामाजिक संघटनांनी पुढाकार घेवून पाहुण्यांसाठी उपक्रम राबवावेत, व्यापाऱ्यांनी पाहुण्यांसह सोलापूरकरांना खरेदीसाठी डिस्काऊंट द्यावे. शहर व जिल्ह्यातील प्रत्येक सोलापूरकर यासाठी सरसावला तर या उपक्रमात शासन-प्रशासन देखील सहभागी होईल, असा विश्वासही आ. सुभाष देशमुख यांनी व्यक्त केला.

# जयंतीसाठी आला अन् पोलिसांच्या तावडीत सापडला

- अल्पवयीन मुलीस पळवून नेणाऱ्यास अटक
- अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने केली अटक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट -**

रविवारी निघालेल्या साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे जयंतीच्या मिरवणुकीसाठी आला अन् पोलिसांनी गेल्या चार वर्षापूर्वी अल्पवयीन मुलीस पळवून नेणाऱ्यास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने अटक केली.





विशाल उर्फ विश्वजीत शंकर गोणी (रा. मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर, सोलापूर) असे ताब्यात घेण्यात आलेल्याचे नाव आहे. विशाल गोणी याने अल्पवयीन बालिकेस पळवून नेल्याबाबत सन २०२१ मध्ये जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गु. र. नं. ४०६ नुसार गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्ह्यातील अल्पवयीन बालिका व विशाल गोणी हे गेली चार वर्षापासून पोलिसांना मिळून आले नव्हते. त्यामुळे हा गुन्हा जोडभावी पेठ पोलिसांकडून अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे वर्ग करण्यात आला आला होता. हा गुन्हा वर्ग होताच गेल्या ७२ दिवसापासून पिडीत बालिका व संशयित आरोपीचा शोध पोलिसांकडून घेण्यात येत होता. त्यावेळी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पथकास पिडीत बालिका व विशाल गोणी हा आण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर येथे आला असल्याची माहिती मिळाली होती. त्यावेळी पोलिसांनी आंबेडकर नगरात जाऊन विशाल गोणी यास ताब्यात घेऊन जोडभावी पेठ पोलिसांच्या ताब्यात दिले. ही कारवाई अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे निरीक्षक धनाजी शिंगाडे, हवालदार बंडगर, पटेल, गोरे, महिला कर्मचारी नागरगोजे, बांबळे, खोगरे यांनी केली.



**योग समाधीला फुलांची सजावट**
सोलापूर : श्री सिद्धेश्वर मंदिरात श्री सिद्धेश्वर महाराजांच्या योग समाधीला श्रावणाच्या दुसऱ्या सोमवारी फुलांची सजावट करण्यात आली होती. (छायाचित्र : केवल तिवारी)

# विवाहितेचा छळ; पतीसह चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह चौघांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत युक्ता ऋषिकेश बेळमकर (वय २५, रा. घोंगडे वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती ऋषिकेश, सासरे दत्तात्रय, सासू मंजुळा, विमल (सर्व रा. भवानी पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. युक्ता ही १७ डिसेंबर २०२३ ते १० मे २०२५ या कालावधीत पती ऋषिकेश याच्यासोबत सासरी नांदण्यास होती. त्यावेळी पती ऋषिकेश हा युक्ताने माहेरून पाच लाख रुपये आणावेत तसेच तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिच्याशी जबरदस्तीने संबंध ठेवायचा. तसेच अश्लिल व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी द्यायचा. तसेच सासू व सासऱ्यांनी लग्नात मानपान केला नाही, सोने घातले नाही, लग्नाचा निम्मा खर्च दिला नाही असे म्हणून माहेरून पाच लाख रुपये घेऊन ये नाही तर घटस्फोट दे असे म्हणून युक्ताचा छळ केला. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार वाडीकर पुढील तपास करीत आहेत.



# दोघां सराईत चोरट्यांना अटक; दोन लाखांचा मुद्देमाल जप्त

**एमआयडीसी पोलिसांची कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट -**

एमआयडीसी पोलिसांनी दोघां सराईत गुन्हेगारांना अटक करून त्यांच्याकडून दोन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणले. या कारवाईत पोलिसांनी १ लाख ९१ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. बंडु मधुकर पवार (वय २८, रा. ढोक बाभुळगाव, ता मोहोळ) आणि उमेश प्रकाश काळे (वय ३०, रा. मलीक पेठ, ता मोहोळ) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

एमआयडीसी पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून कोंड्याल शाळेजवळून सोने विक्री करण्यासाठी आलेल्या बंडू पवार व उमेश काळे या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडील मुद्देमालाबाबत चौकशी केली. त्यावेळी त्यांनी शहरातील एमआयडीसीमधील विनायक नगर व बोळकोटे नगर येथे रात्रीच्या घरफोड्या केल्याचे सांगितले. त्यावरून पोलिसांनी त्यांच्याकडे अधिक चौकशी करून ३७.३६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व १९८.८० ग्रॅम वजनाचे चांदिचे दागिने असा एकूण १ लाख ९१ हजार ७०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. या दोघांकडून एमआयडीसी पोलिस ठाण्यातील दोन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उप-आयुक्त विजय कबाडे, सहा. पोलीस आयुक्त प्रताप पोमण, वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद वाघमारे, विजय खोमणे यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक भरत चंदनशिव, हवालदार राकेश पाटील, एकनाथ उबाळे, सचिन भांगे, मंगेश गायकवाड, सुहास अर्जुन, शंकर याळगी, कुमार बोल्ली, शैलेश स्वामी,अमर शिवसिंगवाले, किशोर व्हनगुंटी, अविनाश डिगोळे, अमसिध्द निंबाळ, सकलेन मुकादम, अय्याज बागलकोटे यांनी केली.

# प्रेमसंबंधातील धोक्यामुळे तरूणीची आत्महत्या

**तरूणाविरुध्द गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट -**

प्रेमसंबंधातील धोक्यामुळे तरूणीने घराच्या गच्चीवरून उडी मारून आत्महत्या केली. तरूणीच्या आत्महत्येस कारणीभूत ठरल्याप्रकरणी तरूणाविरुध्द अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सावली उमाजी दिंडोरे (वय १९, रा. कृष्णा कॉलनी, गणेश नाईक शाळेजवळ, जुळे सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या तरूणीचे नाव आहे. याबाबत उमाजी दगडू दिंडोरे (वय ४६) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दिनेश शंकरसिंग परदेशी (रा, कमला नगर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील दिनेशपरदेशी हा एका कॉलेजमध्ये लायब्रअिन म्हणून काम करीत असताना त्याने सावली हिस डिसेंबर २०२४ पासून लग्नाचे आमिष दाखवून तिच्याबरोबर प्रेमसंबंध ठेवले. परंतु, दिनेशपरदेशी याने सावली हिस धोका देऊन दुसऱ्या मुलीबरोबर प्रेमसंबंध करून दुसऱ्या मुलीबरोबर लग्न करण्याचे ठरविले.

याबाबत सावली हिने दिनेशयास विचारणा केली असता त्याने तिला शिवीगाळ करून जर यापुढे मला फोन केला तर बघ, मझ्या घरी आली तर बघ असे म्हणून धमकी दिली. सावली ही मागासवर्गीय जातीची आहे म्हणून तिच्याबरोबर दिनेशयाने लग्नास नकार दिल्यामुळे व दुसऱ्या मुलीबरोबर लग्न करण्याचे ठरविल्यामुळे सावली हिच्या मनावर परिणाम होऊन ती मानसिक तणावाखाली वावरत होती. प्रेमसंबंधात आलेल्या धोक्यामुळे सावली हिने घराच्या गच्चीवरून उडी मारून आत्महत्या केली. सावलीच्या आत्महत्येस दिनेशपरदेशी हाच कारणीभूत असल्याप्रकरणी तसेच अॅट्रॉसिटी कायद्यानुसार विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस आयुक्त सुधीर खिरडकर पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत

Precision PRINTS

सस्नेह निमंत्रण

४१वा वर्धापन दिन...

सन्माननीय वाचक ____________

सप्रेम नमस्कार,
गेली ४१ वर्षे 'सोलापूर तरुण भारतने' सोलापूर जिल्ह्यासह मराठवाडा, प.महाराष्ट्र तसेच कर्नाटकात आपल्या राष्ट्रीय विचारांचा ठसा उमटविला आहे. वाचक, हितचिंतक व जाहिरातदार यांच्यामुळेच हे साध्य झाले आहे. मराठवाडा, सोलापूर तसेच नागपूर, मुंबई, पुणे, जळगाव येथेही तरुण भारतच्या माध्यमातून राष्ट्रीय विचार पोहचवित आहोत.
अत्याधुनिक तंत्रज्ञानासह 'प्रिसिजन प्रिंटस्‌ने' कमर्शिअल प्रिंटींग क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे.
दै. सोलापूर तरुण भारत, प्रिसिजन प्रिंटस् आदिंचा

॥ वर्धापन दिन ॥

आपले स्नेहांकित
सोलापूर तरुण भारत मिडिया लिमिटेड
श्री. दिलीप यशवंत पेठे (मुख्य समूह संपादक) | श्री. विवेक घळसासी (अध्यक्ष) | श्री. प्रशांत माने (मुख्य संपादक)
संचालक मंडळ, तरुण भारत व प्रिसिजन प्रिंटस् परिवार

* स्थळ *
बुधवार दि. ६ ऑगस्ट २०२५, सायं. ६ ते ९ पर्यंत
दि सोलापूर इंडस्ट्रियल को-ऑप. इस्टेट सोसायटी फंक्शन हॉल, तरुण भारत प्रेसच्या मागे, होटगी रोड, सोलापूर.

# श्रवण, मनन आणि मुक्तीचा मार्ग - श्रीमद्भागवत कथेचे महात्म्य : हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ ऑगस्ट-**


श्रावणमास प्रवचनमाला
भाग - १०

श्रीभगवंत मंदिर, बार्शी येथे सुरु असलेल्या श्रावणमास प्रवचनमालेच्या दहाव्या सत्रात पूजनीय श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी 'श्रीमद्भागवत कथा चिंतन' या विषयावर भावपूर्ण निरुपण करताना श्रवणाबरोबर मननाचेही अत्यंत महत्त्व विशद केले. ते म्हणाले, 'फक्त श्रवण करुन भागत नाही, तर त्यासोबत मनन करणेही तितकेच आवश्यक आहे. कारण श्रवण आणि मननाच्या द्वारेच खरे ज्ञान प्राप्त होते आणि हाच ज्ञानाचा प्रकाश जीवाला मोक्षाकडे नेतो.' परंतु हे ज्ञान प्राप्त व्हावे, यासाठी विवेकाचे अस्तित्व अनिवार्य आहे. विवेक म्हणजेच सार-असाराचे भान, जे ज्ञानाच्या प्राप्तीचा मूलाधार ठरतो. महाराज पुढे सांगतात, 'श्रवण सर्वजण करतात, पण मनन सर्वच करत नाहीत.' श्रीमद्भागवत श्रवण करताना त्या कथेचे श्रवण, मनन आणि निदिध्यास या त्रिसूत्री प्रक्रियेतूनच आत्मिक उन्नती शक्य होते. भागवत महात्म्यात धुंधुकारीचे उदाहरण दिले आहे. तो पापी असूनही भागवत कथा ऐकून त्याने मनन केले, म्हणूनच मोक्षास पात्र ठरला. त्यामुळे श्रवणाबरोबर मनन करणाऱ्यालाच मुक्ती प्राप्त होते, हे भागवत तत्वज्ञान स्पष्ट करते. डॉ. जयवंत महाराज मार्गदर्शन करताना सांगतात, श्रवण करताना सर्व इंद्रियांनी त्याचे आश्रय घेतले पाहिजे. तेव्हाच 'कथामृत' रसाचे खरे सेवन होऊ शकते. लक्षपूर्वक श्रवण आत्महिताची बीजे रोवते, जीवनात साक्षात पूर्णत्व निर्माण करते आणि जीवाच्या हृदयात शाश्वत आनंदाचे झरे उगम पावतात. हीच आहे मननयुक्त श्रवणाची अपूर्वाई, जी महाराज भाविकांपुढे नेमकेपणाने उलगडतात. जे ज्ञान चित्तामध्ये दृढ होत नाही, ते व्यर्थ; प्रमादपूर्वक केलेले श्रवण व्यर्थ; संशयभावनेतून केलेले मंत्रपठण निष्फळ आणि चंचल चित्ताने केलेला जप देखील निष्फळ ठरतो. या सिद्धांतांचा विस्तार डॉ.जयवंत महाराज विविध उदाहरणांच्या माध्यमातून भाविकांपर्यंत पोहोचवतात. श्रवण करताना काय भाव अपेक्षित आहेत? याचे वर्णन करताना ते सांगतात - गुरुवाक्यावर पूर्ण विश्वास असावा, स्वतःत दीनता असावी, मनातील दोषांवर विजय मिळवावा आणि कथा ऐकताना बुद्धी स्थिर ठेवावी. कैमुत्तिक न्यायाने त्यांनी एक सुंदर दृष्टांत दिला - जर निर्जीव बांबूच्या गाठी भागवत श्रवणामुळे सुटू शकतात, तर चेतन जीवाच्या अंतरंगात असलेल्या अज्ञानाच्या गाठी सुटणार नाहीत का? या दृष्टांतातून भागवत कथा ही अज्ञानाच्या गाठी सोडणारे प्रभावी साधन आहे, हे अधोरेखित होते. नंतर त्यांनी धर्मराज आणि भगवान विष्णू यांच्यातील संवादाचे उदाहरण दिले. धर्मराज भगवंताला म्हणतात - 'हे प्रभो! मी पापक्षालनासाठी तीर्थयात्रेला जात आहे.' त्यावर भगवंत त्याला कडुलिंबाची एक छोटी काडी देतात आणि सांगतात - 'स्नान करताना ती देखील बुडव.' तीर्थयात्रेनंतर परतल्यावर भगवंत विचारतात - 'कडुलिंबाची चव बदलली का?' धर्मराज म्हणतो - 'नाही, ती अजूनही कडूच आहे!' या उदाहरणातून महाराज स्पष्ट करतात की, परमार्थामध्ये केवळ कृती नव्हे तर त्यामागची भावना देखील शुद्ध असली पाहिजे. चित्तातील संस्कार हेच माणसाच्या वर्तनातून प्रकट होतात. आहार, वावरण्याचे वातावरण, संस्कृती आणि समवेत असलेली ऊर्जा यांचा परिणाम चित्तावर होतो. आणि हेच चित्त शुद्ध करण्याचे कार्य श्रीमद्भागवत कथा करते. म्हणून ही कथा हे 'कथातीर्थ' आहे - जे शरीर नव्हे तर चित्त आणि मनाचे स्नान घडवते. इतर तीर्थांत शरीराचे स्नान होते, पण भागवत कथारुपी तीर्थात मनाचे शुद्धिकरण होते. हेच शुद्ध मन जीवाला मुक्तीकडे नेतं. पण यासाठी आपणाला त्या भागवत कथारुपी तीर्थामध्ये मनोभावे स्नान करणे आवश्यक आहे. असा हा भागवत चिंतनाचा अमृतमय गंगा प्रवाह जो जीवाला परिपक्व करतो, विवेक जागवतो आणि मुक्तीकडे घेऊन जातो. डॉ. जयवंत महाराज बोधले यांचे आजच्या सत्रातील मार्गदर्शन आत्मदर्शनाची वाटचालीसाठी पूरक होते.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - |
| दि. ५ ऑगस्ट २०२५ | पुत्रदा एकादशी |
| विक्रम संवत् २०८२ | मंगळागौरी पूजन |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. एकादशी (१३.११) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - ज्येष्ठा (११.२२) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - ऐंद्र (०७.२३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - विष्टी (१३.११) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा,
**वृषभ** : अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल.
**मिथुन:** आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता. वाचनाची गोडी वाढेल.
**कर्क:** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा.
**सिंह** : व्यवहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल.
**कन्या** : व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.
**तुळ** : आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा.
**वृश्चिक** : मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. काम काजाचा विस्तार होईल.
**धनु** : व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.
**मकर** : सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.
**कुंभ** : धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.
**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. नियंत्रण ठेवा.




# बार्शीच्या राजवर्धन तिवारी, वेदांत खळदे यास दुहेरी मुकुट

## सुभाष भालचंद्र बुबणे स्मृती करंडक टेबल टेनिस स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

सुभाष भालचंद्र बुबणे स्मृती करंडक टेबल टेनिस स्पर्धेत बार्शीच्या राजवर्धन तिवारी याने ११ व १४ वर्षे मुलांच्या गटात तर वेदांत खळदे याने पुरुष एकेरी व १७ वर्षे मुलांच्या गटात अजिंक्यपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. पार्क स्टेडियमवरील मुळे पव्हेलियनमध्ये झालेल्या या स्पर्धेत बार्शीच्या वेदांत खळदे याने पुरुष एकेरी व १७ वर्षे मुले या गटात अजिंक्यपद प्राप्त केले. तसेच मुलींमध्ये अनुष्का रावत हिने वेदांतिका पाटीलला हरविले.

बक्षीस वितरण समारंभ सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजीव प्रधान, सचिव झेड. एम. पुणेकर व हर्षवर्धन बुबणे यांच्या उपस्थितीत पार पडला. राजवर्धनने महाराष्ट्र मानांकित स्पर्धेत रौप्य पदक पटकाविल्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी गोवर्धन **अवांशक,** सिद्रामप्पा मुनोळी यांनी प्रयत्न केले.

**अंतिम निकाल याप्रमाणे :**
११ वर्षे मुले : राजवर्धन तिवारी (बार्शी) विजयी विरुद्ध रियान बोले (केएलई स्कूल) ३-०. मुली : अमृता आंबे संगे विजयी विरुद्ध जीवनी धारणे ३-१)

१४ वर्षे मुले : राजवर्धन तिवारी ( बार्शी) वीरेन मालवे ३-०. मुली : शिवानी सानप विजयी विरुद्ध शांभवी सोलापुरे ३-०

१७ वर्षे मुले : वेदांत खळदे विजयी विरुद्ध सुजित खुरंगळे ३-१. मुली : वेदांकिता पाटील विजयी विरुद्ध अनुष्का रावत ३-१.

महिला एकेरी : अनुष्का रावत विजयी विरुद्ध वेदांकिता पाटील ३-२.

पुरुष एकेरी : वेदांत खळदे विजयी विरुद्ध विनोद मगजी ३-०.

प्रौढ एकेरी : आनंद नवले विजयी विरुद्ध सुभाष उकरंडे ३-१.




# अहिल्याबाई महाविद्यालयात अकरावीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

अहिल्याबाई कनिष्ठ महाविद्यालय, आदर्श नगर, कुमठा नाका येथे आज अकरावीच्या नवागत विद्यार्थ्यांचे प्राचार्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रस्ताविक पर्यवेक्षक प्रा.अनंत सुरते यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.धनाजी धेंडे यांनी केले. यावेळी प्रा. शितल राठोड, प्रा.अर्चना दीक्षित उपस्थित होते. आभार प्रा. महेंद्र ढवाण यांनी मानले. संस्थेचे संस्थापक सचिव हाजी बंदे नवाज शेख यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.



# उमाबाई श्राविका विद्यालयात लोकमान्य टिळक, अण्णाभाऊ साठे यांना आदरांजली

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

उमाबाई श्राविका विद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, वरिष्ठ दिप्ती शहा यांच्या उपस्थितीत प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी वेदांत कुलकर्णी या विद्यार्थ्याने तर शिक्षक सुकुमार वारे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख माधवी खोत यांनी केले तर आभार प्रिती वराडे यांनी मानले.

# रखमाबाई हत्तुरे महाविद्यालयात अकरावी विद्यार्थ्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**




रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय येथे इयत्ता ११ वी विद्यार्थ्यांचे स्वागत व प्रवेशोत्सव प्रभारी प्राचार्य रमेश दिंडोरे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी प्रमुख पाहुणे कनिष्ठ महाविद्यालयाचे मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, अनिलकुमार गावडे यांची उपस्थिती होती.

सुरुवातीस ढोल ताशाच्या गजरात विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन व पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेचे व लिंगैक्य रखमाबाई हत्तुरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. इ.१२ वी विद्यार्थ्यांच्या हस्ते मान्यवरांचे बुके देऊन स्वागत करण्यात आले व इ.११ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना अतिथींच्या हस्ते पेन देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी श्रद्धा कलशेट्टी, आकांक्षा पवार, पूनम राठोड या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषण प्रभारी प्राचार्य रमेश दिंडोरे यांनी केले. यावेळी लक्ष्मीकांत पनशेट्टी, श्रीनिवास कोलप्याक, प्रशांत हारके, विरेश हचडे, संतोष टकले, अनुराधा देशमुख, कल्पना माळगे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक श्रुती कोळी यांनी केले. लक्ष्मी चन्ने व अल्फिया मुजावर यांनी सूत्रसंचालन केले. लखन भिंगे यांनी आभार मानले.



# आईच्या दुधात पोषक मूल्य : डॉ. श्रीकांत येळेगावकर

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

स्तनपान हे बाळासाठी अमृततुल्य असते. आईच्या दुधात सर्व आवश्यक पोषणमूल्ये नैसर्गिकरित्या उपलब्ध असल्यामुळे ते बाळासाठी कवच-कुंडल्यासारखे कार्य करते. मातांनी आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे आणि स्तनपानास प्राधान्य देण्याचे आवाहन फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले. ते रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईट, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, नेटवर्क ऑफ सोलापूर बाय पीपल लिविंग वुईथ एच. आय. व्ही./ एड्स समग्र प्रकल्प सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक स्तनपान जनजागृती सप्ताह निमित्त एच.आय.व्ही. सहज जीवन जगणाऱ्या गरोदर महिला, स्तनदा मातां व बालकांना प्रोटीन पावडर वाटप कार्यक्रमात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईटचे अध्यक्ष बालमुकुंद राठी, माजी अध्यक्ष अतुल सोनी, सोलापूर शाखेचे सदस्य प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख, समग्र प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक विजय शिंदे, मीनाक्षी रणदिवे, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत विजय शिंदे यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन कल्पना गडगडे यांनी केले तर आभार मीनाक्षी रणदिवे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आकाश गायकवाड, आरती रेड्डी, श्रेया पडवळे, बबिता दुपारगुडे, ऋषिकेश चव्हाण, किरण गुंडला,सुवर्णा रुईकर आदींनी परिश्रम घेतले.



# अमन संस्थेतर्फे सामुदायिक विवाह संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

मरहबा हॉल नई जिंदगी येथे चार नव वधू-वरांचा विवाह मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी वधूवरांना संस्थेतर्फे गादी, पलंग, कपाट, संसार उपयोगी सामान, कपडे, आधी सामान देण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील, हाजी एम.डी. शेख, माजी नगरसेवक तौफिक शेख, प्रदेश चिटणीस शशिकांत कांबळे, युवक अध्यक्ष सुहास कदम, रियाज शेख, नुरुद्दीन मुल्ला, रजाक मालक, इम्रान शेख, अल्ताफ कुरेशी, सलीम नदाफ, रऊफ शेख, जावेद सय्यद, जमीर पटेल, रमजान चिंचोळकर, हाजी जाहिद कुरेशी, समीर कुरेशी, जलाल शेख, सद्दाम पठाण, यांच्यासह वऱ्हाड मंडळी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

आभार आयोजक इरफान शेख, गौस कुरेशी यांनी मानले.

# शिवाजी प्रशालेमध्ये लो. टिळक, अण्णाभाऊ साठे यांना आदरांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

छत्रपती शिवाजी प्रशालेमध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर् अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

प्रशालेच्या सहशिक्षिका मनिषा शिंदे, सहशिक्षक विजय वाडेकर यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगत मुख्याध्यापिक सुजाता जुगदार यांनी व्यक्त केले. प्रशालेचे उपमुख्याध्यापक श्रीपाद जगदाळे लोक मान्य टिळकांनी केलेल्या कार्याची सविस्तर माहिती दिली. पर्यवेक्षक सुरेश जगताप, पर्यवेक्षक किरण देशमुख, सांस्कृतिक विभाग प्रमुख विजया मोठे उपस्थित होते. सूत्रसंचालन घंटेनवरू यांनी केले तर आभार यादव यांनी मानले.



# ए. जी. पाटील अभियांत्रिकीमध्ये तीन प्रिंटिंग फिलामेंट मेकिंग मशीनची निर्मिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

सोलापूर, महाराष्ट्र सोलापूर शहरातील ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या मेकॅनिकल इंजिनीअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी एक अभिनव आणि पर्यावरणपूरक प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केला आहे. विद्यार्थ्यांच्या या चमूने टाकाऊ प्लास्टिक बाटल्यांचा पुनर्वापर करून '३ प्रिंटिंग फिलामेंट मेकिंग मशीन' तयार केली आहे. या मशीनद्वारे ३ प्रिंटरसाठी आवश्यक असलेले फिलामेंट तयार करता येते, जे पारंपरिक बाजारात महागड्या दराने उपलब्ध असते.

प्रकल्पामध्ये बी.ई. अंतिम वर्षातील विद्यार्थी वीरेश शिंपी, व्यंकटेश पतंगे, समृद्ध ठेंगील आणि अभिषेक राठोड यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या प्रकल्पाला प्रा. अभिजीत मळेकर यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभले, ज्यामुळे हा प्रयोग शास्त्रीय दृष्टिकोनातून अचूक रित्या पार पडला.

विद्यार्थ्यांनी या संपूर्ण यंत्राची रचना, फॅब्रिकेशन, आणि चाचण्या स्वतः पार पाडल्या, ज्यामुळे त्यांच्या व्यावसायिक कौशल्यात लक्षणीय वाढ झाली.

उपक्रमास विभागप्रमुख डॉ. एस. बी. गडवाल आणि प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांचे मार्गदर्शन लाभले. विभागप्रमुख डॉ. एस.बी. गदवाल, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम.ए. चौगुले, संस्थेचे ट्रस्टी एस. एस. पाटील व संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

# 'सह्याद्री' मध्ये एम.फार्मसी प्रवेशासाठी मोफत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.४ ऑगस्ट-**

इ.स.२००५ ची स्थापना असलेल्या सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे, (ता. सांगोला) येथे प्रथमवर्ष पद्युत्तर/एम.फार्मसी अभ्यासक्रमाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रिया अर्ज सुविधा केंद्र म्हणून महाराष्ट्र शासनाकडून मंजुरी मिळाली आहे अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले यांनी दिली. या सुविधा केंद्रामध्ये बी.फार्मसी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे पद्युत्तर (एम.फार्मसी) प्रथम वर्ष प्रवेशकरिता ऑनलाईन अर्ज दि.८ ऑगस्ट पर्यंत स्वीकारले जाणार आहेत व तात्पुरती मेरिट लिस्ट दि.११ ऑगस्टला तर अंतिम मेरिट लिस्ट दि.१७ ऑगस्ट रोजी आहे. कॉलेज ऑफ फार्मसीच्या या सुविधा केंद्रामध्ये विद्यार्थ्यांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन व मूळ कागदपत्रे पडताळणी, अर्ज निश्चिती होणार आहे. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत पालक व विद्यार्थ्यांच्या असणाऱ्या विविध शंका व अडचणी याबाबत मोफत सखोल मार्गदर्शन या महाविद्यालयातील अनुभवी व तज्ञ प्राध्यापकांमार्फत उपलब्ध होणार आहे. तरी सर्व विद्यार्थी व पालकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ.दिलीपकुमार इंगवले यांनी केले आहे. याबाबत अधिक माहितीसाठी प्रा.एस. एस.काळे (९८२२०४७२३६), डॉ.ए.एम. तांबोळी (९९७५४०२४६५), पी.एस.लोखंडे (९८२३१०७३७१) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांनी केले आहे.

# 'लोकमंगल'च्या सभासदांना अपघाती विमा लागू



## वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी संस्थापक अध्यक्ष आ.सुभाष देशमुख यांची घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

लोकमंगल पतसंस्थेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोलापुरातील जामगुंडी मंगल कार्यालयात झाली. यावेळी बोलताना आ. देशमुख यांनी पतसंस्थेच्या १००० रु. च्या पुढील शेअर्स असणाऱ्या सर्व सभासदांना दीड लाखापर्यंत अपघाती विमा लागू केल्याची घोषणा केली, याबरोबरच मागच्या सर्वसाधारण सभेत आलेल्या सूचनेनुसार देशासाठी लढणाऱ्या आजी सैनिकांना एक वर्षापुढील ठेवीवर चालू व्याजदरापेक्षा अर्धा टक्का ज्यादा व्याज देण्याचीही घोषणा यावेळी आ. देशमुख यांनी यावेळी केली. तसेच सभासदांना १२.१५ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.

प्रारंभी संस्थेचे चेअरमन गुरण्णा तेली यांनी प्रास्ताविक केले. यानंतर सरव्यवस्थापिका अलका देवडकर यांनी अहवाल वाचन केले. यानंतर सभी प्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्मिता पाटील, सोमनाथ हुलगे, अश्विनी चव्हाण, अरुण शिंदे, सुजित पाटील यांचा सिन्मान करण्यात आला याबरोबरच गत आर्थिक वर्षात वेगवेगळ्या गटामधून सर्वाधिक व्यवसाय करणाऱ्या अक्कलकोट, मोडनिंब, मांजरी व कुंभारी तर सर्वोत्तम शाखा म्हणून मोहोळ या शाखेतील सर्व कर्मचाऱ्यांचा बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे संचालक गजानन भाकरे, वैधानिक लेखापरीक्षक जे.डी.भैसे, स्मिता पाटील आदी मान्यवरांनी आपली मनोगत व्यक्त केली. यावेळी सल्लागार धनंजय केकडे, कर सल्लागार दिपक दरगड, संस्थेचे चेअरमन गुरण्णा तेली, व्हा. चेअरमन निर्मला कुंभार, कार्यकारी संचालक मनीष देशमुख, तज्ञ संचालक गजानन भाकरे, विठ्ठल ढेकळे, संचालक समाधान पाटील, शहाजी साठे, फैयाज मुलानी, शिवाजी माळी, युवराज गायकवाड, भीमाशंकर कलशेट्टी, लक्ष्मी नडगेरी, सरोजिनी टिपे, सरव्यवस्थापिका अलका देवडकर उपस्थित होते. सूत्रसंचालन सतीश लोंढे यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### अक्कलकोट येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**अक्कलकोट, दि. ४ ऑगस्ट-**

अक्कलकोट येथे मातंग समाजाकडून लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष डॉक्टर सुवर्णा मलगोंडा, पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, माजी नगराध्यक्ष अश्फाक बळोरगी, अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, माजी उपनगराध्यक्ष महेश हिंडोळे, यशवंत धोंगडे, बाबासाहेब पाटील, काँग्रेस पक्ष युवक आघाडी तालुकाध्यक्ष निशांत कवडे, सामाजिक कार्यकर्ते बुडन तांबोळी, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बागाव आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रतिमेचे पूजन अमोलराजे भोसले, पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉक्टर सुवर्ण मलगोंडा अशपाक बळोरगी, महेश हिंदोळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक बागाव आदींनी मार्गदर्शन केले. उपस्थित मान्यवरांचा सत्कार मातंग समाज अध्यक्ष सुनील खवळे व जयंती समिती पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमास सुनील खवळे, अनिल गवळी, शंकर हातागळे, अभिमान वाघमारे, बेळळे, विशाल ठोंबरे, भारत देडे, देविदास खवळे, समर्थ कांबळे, अविनाश पारखे, गणेश खवळे, शेखर देडे, आनंद गवळी, तानाजी खवळे, अनिल शितोळे, अमर देडे, रमेश पारखे, सुरेश दसाडे, स्वामी शितोळे, नेताजी खवळे, आदिनाथ कांबळे, मल्हारी पारधे, गणेश खवळे, समर्थ देवकुळे, रामा बाळशंकर, आकाश हातागळे, राजू देडे, अंबादास शितोळे, संतोष खवळे, दत्ता केंदळे, परशु देडे, गोपाळ खवळे, नितीन पवळे, आकाश कांबळे, रोहित देवकुळे, बापू शिरसाठ, रणबा देडे उपस्थित होते.




### स्मार्ट मीटर सक्ती विरोधात माळशिरस आरपीआयचे निवेदन

**वेळापूर, दि.४ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यात महावितरण व खासगी कंपन्यांकडून ग्राहकांच्या इच्छेविरुद्ध स्मार्ट प्रीपेड वीज मीटर बसविण्यात येत असल्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) माळशिरस तालुक्याच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अकलूज येथील कार्यकारी अभियंता यांना निवेदन देण्यात आले. स्मार्ट मीटर बसवल्यानंतर घरगुती वापर असूनही औद्योगिक दराने वीजबिल आकारले जात असल्याच्या तक्रारी पूर्वी ३००-४०० रुपये येणारे बिल आता ७००-८०० रुपयांवर मीटर युनिट्स व प्रत्यक्ष वापर याम ध्ये फरक आहे. कोणतीही पूर्वसंमती न घेता सक्तीने मीटर बसवले जाणे गैर असल्याने मीटरची स्वतंत्र व तांत्रिक तपासणी करावी, ग्राहकांची पूर्वसंमती न घेतलेली मीटर तत्काळ काढून टाकावीत, अतिरिक्त आकारलेली रक्कम ग्राहकांना परत करावी, ग्राहकांना पुन्हा पोस्टपेड पर्याय उपलब्ध करून द्यावा, धोरण ठरवताना लोकांशी थेट संवाद साधावा या मागण्यांकडे तात्काळ लक्ष दिले नाही तर तालुका आरपीआय (आठवले) तर्फे तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांनी दिला आहे. यावेळी पश्चिम महाराष्ट्र संघटक एस एम गायकवाड, युवक आघाडी प्रदेश उपाध्यक्ष किरण धाईंजे, तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, युवक तालुकाध्यक्ष दशरथ नवगिरे, संघटन सचिव पोपट गेजगे, अकलूज शहराध्यक्ष अजित मोरे, संपर्कप्रमुख अण्णासाहेब भोसले, युवक तालुका सरचिटणीस प्रवीण साळवे, तालुका उपाध्यक्ष संतोष कांबळे, लोकनेते प्रतिष्ठान अध्यक्ष जुल्कर शेख, युवक तालुका उपाध्यक्ष बाबुराव भोसले, तुषार केंगार, सोमनाथ वाघमारे, तानाजी बाबर, अण्णासो कुचेकर उपस्थित होते.



### सांगोल्यात आर्थिक व्यवस्थापनवर मार्गदर्शन

**सांगोला, दि. ४ ऑगस्ट-**

चार्टर्ड अकाउंटंट नवेली देशपांडे यांचे आर्थिक व्यवस्थापन या विषयावर उत्कर्ष कौशल्य विकसन केंद्र, शनि गल्ली, सांगोला येथे मार्गदर्शन संपन्न झाले. यावेळी नवेली देशपांडे यांनी महिलांना पैशाचे नियोजन कसे करायचे या विषयावर मार्गदर्शन केले. पैशाला तुमच्यासाठी कामाला लावा नाहीतर आयुष्यभर तुम्हाला पैशासाठी काम करावे लागेल असे त्या म्हणाल्या. याप्रसंगी अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाची मान्यता प्राप्त बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्गाचे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन मधुरा शास्त्री, नीता लाटणे यांनी केले. आभार माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान संस्थेच्या सचिव वसुंधरा कुलकर्णी यांनी मानले.

### बंधन बँकेतर्फे पंढरपुरात नवीन शाखेचे उद्घाटन

**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

बंधन बँकने आज महाराष्ट्रातील पंढरपूर येथे आपल्या नवीन शाखेच्या उद्घाटनाची घोषणा केली. या शाखेचे उद्घाटन पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे आणि बंधन बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पार्था प्रतिम सेनगुप्ता यांच्या उपस्थितीत केले. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांमध्ये सचिन लंगुटे,उपविभागीय दंडाधिकारी, सोलापूर यांचा समावेश होता. शाखा नेटवर्कचा विस्तार हा बंधन बँकच्या देशभरातील स्थान मजबूत करण्याच्या आणि विविधतेवर भर देण्याच्या धोरणात्मक दृष्टिकोनाचा भाग आहे.या उद्घाटनानंतर, बँकेची महाराष्ट्रात ३५० हून अधिक आणि संपूर्ण भारतात ६,३५० पेक्षा अधिक बँकिंग आऊटलेट्स झाली आहेत. या प्रसंगी बोलताना बंधन बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पार्था प्रतिम सेनगुप्ता म्हणाले, हपंढरपूर मंदिर परिसरात सौरऊर्जेवर चालणारे स्ट्रीटलाइट्स बसवण्याच्या आमच्या सीएसआर उपक्रमातून आम्ही ज्या समाजाला सेवा पुरवितो त्यांच्यात सकारात्मक, दीर्घकालीन परिणाम घडवून आणण्याच्या आमचा उद्देश प्रतिबिंबित होतो.

# अकलूजमध्ये सरावाद्वारे आपदा मित्रांनी गिरवले धडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**



रायगड येथे आपदा मित्र व सखी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या स्वयंसेवकांसोबत अकलूज नगर परिषदेतर्फे दोन दिवसांचा सराव अभ्यास घेण्यात आला. यामध्ये जलप्रलय, इमारत कोसळणे, आग लागणे अशा विविध आपत्ती परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देण्याच्या तंत्रांचा सराव करण्यात आला.

सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अंतर्गत अकलूज नगरपरिषद कर्मचारी यांचा संयुक्त शोध व बचाव कार्याचा हा सराव अभ्यास होता. अकलूजचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्या सहकार्याने, तर निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्या निर्देशानुसार हा सरावा घेण्यात आल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिशागर ढोले यांनी दिली. सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अंतर्गत आयोजित या उपक्रमात आपत्ती व्यवस्थापन अधिकारी आणि सोलापूर रेस्क्यू स्काडचे प्रशिक्षित स्वयसेवक अनिल सल्ले यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणामध्ये आपदा मित्र व सखी आणि नगरपरिषद कर्मचारी यांना प्राथमिक उपचार, शोध व बचाव उपकरणांचा वापर, सुरक्षिततेची काळजी, तसेच समन्वयात्मक कार्यपद्धती याचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमामुळे अकलूज शहरातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम होणार असून, भविष्यातील संकटांना तोंड देण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. सदर प्रशिक्षणामुळे आपदा मित्र व सखींचा आत्मविश्वास वाढला असून त्यांनी सामाजिक उत्तरदायित्वाची भूमिका अधिक प्रभावीपणे पार पाडण्याची तयारी दर्शवली असल्याचे श्री. ढोले यांनी सांगितले.



## अण्णाभाऊ साठे वक्तृत्व स्पर्धेत साताऱ्याचा मिथुन माने प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.४ ऑगस्ट-**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बार्शी येथे झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत साताऱ्याचा मिथुन माने प्रथम, पांगरीच्या प्रणाली धस द्वितीय, सुरभी कसबे यांना तृतीय तर श्रवण अडसूळ व आरिफ गोरे उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले.

बार्शीतील स्व. यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक भवन येथे झालेल्या या स्पर्धेचे उदघाटन काँग्रेसचे शहराध्यक्ष डॉ. विजय साळुंके यांच्या हस्ते झाले. यावेळी रिपाइं नेते अविनाश गायकवाड, प्रशासन अधिकारी प्रकाश वाठोरे, भारत मुक्ती मोर्चाचे तानाजी बोकेफोडे, माजी नगरसेवक म हेदिमिया लांडगे, कामगार नेते मक्रोज बोकेफोडे व अतुल पेटाडे, दलित महासंघाचे संदीप अलाट उपस्थित होते. प्रा. भाऊसाहेब कांबळे यांनी परिक्षक म्हणून काम केले.

यावेळी विजेत्यांना आयु. भारत क्षीरसागर, नगरसेवक अमोल चव्हाण व समर्थ कन्स्ट्रक्शन यांच्या वतीने बक्षिसे देण्यात आली. नितीन मस्के, अय्याज पठाण, संभाजी कदम, दिलीप सरवदे, बालाजी अंधारे यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक अजित कांबळे यांनी केले.

## गुरुदेव आश्रमात अध्यात्मिक प्रवचन

**श्रावण मासानिमित्त आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**



श्रावण मासानिमित्त गुरुदेव आश्रम, बालगाव येथे आध्यात्मिक प्रवचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रम ३ ऑगस्टपासून दररोज सकाळी ६.३० ते ७.३० सुरु झाला असून सदर प्रवचनमाला २० दिवस चालणार आहे.

कर्नाटक व महाराष्ट्र जत तालुका सीमावर्ती भागात बालगाव, आकळवाडी, कात्राळ, बोर्गी या निसर्गरम्य वातावरणात गुरुदेव आश्रम येथे ज्ञानयोगी डॉ.अमृतानंद महास्वामी यांचे आपल्या अमृतमय वाणीतून जीवनमूल्ये, भक्तीमार्ग, संत परंपरा आणि श्रद्धेचे महत्त्व यावर विवेचन व अध्यात्मिक प्रवाचनाचे आयोजन केले आहे. गुरुदेव आश्रम सद्या पंचक्रोशीत अध्यात्मिक केंद्र बनत आहे. परमपूज्य ज्ञान योगी सिध्देश्वर महास्वामी यांचे सानिध्य या आश्रमाला लाभले. डॉ. अमृतानंद महास्वामी हे त्यांचे आवडते शिष्य.

यावेळी बसवानंद स्वामी, बेल्लगिरी आश्रम, गिरिशानंद स्वामी, कंकनाळ, प्रज्ञानंद स्वामी, नागठण तसेच प्रवचनकार तुकाराम महाराज, लमान्हट्टी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. अध्यात्म म्हणजेच 'स्वतः च्या आत्म्यापर्यंत पोहोचण्याचा मार्ग सांसारिक सुखांपलीकडे जाऊन अंतर्गत शांती, समत्व, आणि मोक्ष प्राप्त करणे हे अध्यात्माचे अंतिम उद्दिष्ट आहे, असे मत प्रज्ञानंद स्वामी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरूवात मल्लिकार्जुन स्वामी, जिरांकलगी यांच्या प्रार्थनेने झाली. कार्यक्रमाची सुरूवात मुचंडी यांनी केले. सूत्रसंचालन रमेश खरोशी यांनी केले.

## महसूल सप्ताहात अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप

**तहसीलदार सचिन लंगुटे: पुराव्यांसह अर्ज करण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ ऑगस्ट-**

शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबापैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना सदर अतिक्रममित जागांचे पट्टे वाटप दिनांक २ ऑगस्ट रोजी कार्यक्रम घेण्यात आला.

यात अतिक्रमण असलेल्या कुंटुबाची यादी करुन, पात्र लार्भाथ्याचे अर्ज, सर्व आवश्यक कागदपत्रासह छानणी करुन, शक्ती प्रदत्त करुन छानणी करण्यात आली. हे कागदपत्रे जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांच्याकडे सादर करणेच्या सुचना देण्यात आल्या. तसेच सन २०११ पुर्वीपासुन अतीक्रमीत जागेवर रहात असलेबाबतचा पुराव्यासह लोकांनी अर्ज पंचायत समीतीकडे सादर करावेत, असे आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे. दिनांक १ ते ७ ऑगस्ट २०२५ दरम्यात महसुल सप्ताह सुरु आहे. शनिवार दिनांक ०२ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर सन २०११ पुर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबापैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना सदर अतिक्रममित जागांचे पट्टे वाटप करणेबाबत कार्यक्रम तहसिल कार्यालय पंढरपूर येथे घेण्यात आलेला आहे. या कार्यक्रमावेळी तहसिलदार पंढरपूर सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी पंचायत समीती पंढरपूर, सर्व गांवाचे ग्राम सेवक, सर्व ग्राम महसुल अधिकारी, सर्व मंडळ अधिकारी तसेच सन २०११ पुर्वीपासुन अतीक्रमण जागेवर रहात असलेले गांवातील गावकरी सदर कार्यक्रमणाला उपस्थित होते.

## शून्य सर्पदंश अभियानांतर्गत जनजागृती अभियान

**पक्षीमित्र श्रीकांत बनसोडे यांनी केले मार्गदर्शन**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ ऑगस्ट-**

श्री हनुमान विद्यामंदिर येथे नागपंचमीनिमित्त प्राणीमित्र संस्था, निसर्गप्रेमी, साप रेस्क्यु टीम यांच्या संयुक्त विद्यमाने शून्य सर्पदंश अभियानांतर्गत सर्प माहिती तथा सर्प जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी पक्षीमित्र पक्षीमित्र संघटनेचे उपाध्यक्ष श्रीकांत बनसोडे यांनी पर्यावरण व परिसर संवर्धन, वृक्ष लागवड व प्राण्यांची सुरक्षितता काळाची नितांत गरज असल्याचे सांगितले. प्रशालेचे मुख्याध्यापक आप्पासाहेब हत्तुरे अध्यक्षस्थानी होते. यावेळी निसर्गप्रेमी संस्थापक सर्पमित्र भीमसेन लोकरे यांनी सोलापूर शहर-जिल्ह्यात आढळून येणाऱ्या सापांच्या विविध प्रजाती, अतिविषारी, निम विषारी व बिनविषारी प्रकार, पर्यावरण संरक्षणासाठी सापांचे महत्व, सर्पदंश आणि उपचार, सापांच्या विषापासून होणारी औषध निर्मिती,२६ जातीच्या सापांचे छायाचित्र प्रदर्शित करून महत्वपूर्ण विषयावर मार्गदर्शन करून सर्पमित्रांच्या अविस्मरणीय कार्याची माहिती दिली. यावेळी प्रणिमित्र संस्थेचे मल्लिकार्जुन धुळखेडे, सुनील अरळीकट्टी, निसर्गप्रेमी अध्यक्ष रविचंद्र स्वामी, यश पांढरे, गणेश बहिरवडे आदी उपस्थित होते. यावेळी जेष्ठ शिक्षक अमोल भावसार यांनी सूत्रसंचालन केले. श्रेयस पाटील यांनी आभार मानले. यावेळी पंडीत कुंभार, श्रीमती एन एस राऊत, सुप्रिया जामगे आदी उपस्थित होते.

### मंगळसूत्र महोत्सवाचे एकविसाव्या वर्षात पदार्पण

**सोलापूर :** महाराष्ट्रातील घराघरांमध्ये परंपरेसह, विश्वासाने घेतले जाणारे नाव,पीएनजी ज्वेलर्स यांचा प्रतिष्ठित आणि बहुप्रतीक्षित 'मंगळसूत्र महोत्सव' यंदा २१ व्या वर्षात पदार्पण करत आहे.या वर्षी पहिल्यांदाच १८ कॅरेट सोन्यातील मंगळसूत्रे पीएनजी ज्वेलर्सने ग्राहकांसाठी उपलब्ध केली आहेत.७ वेगवेगळ्या प्रकारांत - पारंपरिक, आधुनिक, हलक्या वजनाचे, ऐतिहासिक, पोल्की, हिरे आणि गोकाक यांचे २००० हून अधिक डिझाइन्स म हाराष्ट्र आणि गोव्यातील पीएनजी ज्वेलर्सच्या सर्व शाखांमध्ये सादर करण्यात येणार आहेत.मंगळसूत्र म होत्सवानिमित्त ग्राहकांना सोन्याच्या मंगळसूत्राच्या घडणावळीवर ५०% पर्यंत सवलत आणि हिऱ्यांच्या मंगळसूत्राच्या घडणावळीवर १००% पर्यंत सवलत मिळणार आहे.संचालक,डॉ.सौरभ गाडगीळ म्हणाले, २१ वर्षांचा हा प्रवास अभिमानाचा आहे.

## परवानगीशिवाय गौण खनिज उत्खनन; गुन्हा दाखल होणार

**तहसीलदार पाटील यांचा इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि.४ ऑगस्ट-**

परवानगी न घेता वाळू, मुरुम, दगड या गौण खनिजांचे उत्खनन व वाहतूक केल्याचे आढळून आल्यास दंडात्मक तसेच फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले असून त्यानुसार रितसर परवानगी घेऊनच उत्खनन व वाहतूक करावी अन्यथा कारवाई करण्यात येईल,असा इशारा उत्तर सोलापूरचे तहसीलदार निलेश पाटील यांनी दिला.

दिवसेंदिवस मोठ्या प्रम णात गौण खनिजांचे उत्खनन होत असल्याने पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे. शिवाय रितसर परवानगी न घेता वाळू, मुरुम उत्खनन केले जात आहे,ही बाब राज्य शासनाच्या निदर्शनास आल्याने याला आळा घालण्यासाठी राज्याचे महसूलमंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी अवैधरित्या गौण खनिजांचे उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश २९ मे रोजी झालेल्या बैठकीत दिली होती.या पार्श्वभूमीवर महसूल व वनविभागाने १७ जुलै रोजी परिपत्रक काढून अवैधरित्या गौण खनिजांचे उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना सूचित केले होते. त्यानुसार आता परवानगी घेऊनच गौण खनिजांचे उत्खनन व वाहतूक करावी जर अवैधरित्या कोणी गौण खनिजांचे उत्खनन व वाहतूक केल्याचे आढळून आले तर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४८ च्या (७) व (८) नुसार दंडात्मक कारवाई, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२),३१०(२),११८(१),११५(२),३३२(सी)३(५), पर्यावरण संरक्षण अधिनियम १९६६ च्या कलम ९ व १५ व खाण व खनिज अधिनियम १९५८ कलम ३,४ ,२१ व सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम कलम ३ व ७ अन्वये गुन्हे दाखल करून फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात येईल.

गौण खनिजाबाबत राज्य शासनाचे कडक निर्बंध आहेत तेव्हा उत्तर सोलापूर तालुक्यातील गौण खनिज व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींनी रितसर परवानगी घ्यावी,असे आवाहन तहसीलदार निलेश पाटील यांनी केले आहे.

## नागपंचमीनिमित्त वेळापुरात झालेल्या स्पर्धांना महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दहीहंडीला महिलांचा उत्साह शिगेला**

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ४ ऑगस्ट-**





येथील श्री महादेव देवस्थान देवालय ट्रस्टतर्फे नागपंचमीनिमित्त आयोजित विविध स्पर्धांना महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यामधील विजेत्यांना पैठणीसह विविध बक्षीसे देण्यात आली.

स्पर्धेचे उद्घाटन शशिकांत तेरखेडकर, हरिभाऊ माने यांच्या हस्ते प्रतिमापूजनाने झाले. यावेळी श्रीमती शिलप्रभादेवी सूर्यकांत माने-देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. सरोजिनी कुलकर्णी, जयश्री माने-देशमुख, आशा टिंगरे, अर्चना कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. अध्यक्षस्थानी करुणा धुमाळ-देशमुख होत्या. यावेळी रांगोळी, मेहंदी, संगीत खुर्ची, उखाणे, फनी गेम, बकेट बॉल गेम अशा विविध स्पर्धा पार पडल्या. मेहंदी स्पर्धेमध्ये ५ ते ९ वी या गटामध्ये शिवानी माने यांनी प्रथम, द्वितीय वैष्णवी कुंभार व तृतीय ईश्वरी उरणे यांनी मिळवला. दहावी ते कॉलेज गटामध्ये आरती माने यांनी प्रथम तर द्वितीय सोनाली साठे व तृतीय क्रमांक प्रियाणी जोशी यांनी मिळवला तर विवाहित गटांमध्ये सोनाली माने यांनी प्रथम क्रमांक, द्वितीय आरिफ तांबोळी व तृतीय क्रमांक शिवानी सुतार यांनी पटकाविला. तसेच संगीत खुर्ची स्पर्धेमध्ये पहिली ते चौथी यामध्ये अविरा सावंत प्रथम, श्रुती कदम द्वितीय, तृतीय क्रमांक आरोही गालफाडे यांनी मिळवला. पाचवी ते कॉलेज गट यामध्ये यज्ञा कदम प्रथम तर सायली जाधव द्वितीय व शिवानी माने तृतीय क्रमांक मिळवला. तर महिला गटांमध्ये डॉ गौरी गायकवाड प्रथम, द्वितीय चांदणी अनिल घाडगे, तृतीय क्रमांक वैशाली मेहेर यांनी मिळवला. रांगोळी स्पर्धा या चार गटांमध्ये पार पडल्या. यामध्ये पहिली ते चौथी गटामध्ये आराध्या अनिल घाडगे यांनी प्रथम, द्वितीय स्नेहल घाडगे व तृतीय क्रमांक शिवश्री माने-देशमुख यांनी मिळवला. ५ वी ते ९ वी गटामध्ये प्रथम समृद्धी पुणेकर, द्वितीय श्रेया माने-देशमुख, तृतीय क्रमांक ज्ञानेश्वरी सावंत यांनी मिळवला. दहावी ते कॉलेज गट यामध्ये प्रथम वैष्णवी गाढवे, द्वितीय काजोल चव्हाण-पाटील, तृतीय क्रमांक संस्कृति वाडकर यांनी मिळवला. विवाहित महिला गटामध्ये प्रथम प्रणिता कोरे, द्वितीय चांदणी अनिल घाडगे व तृतीय क्रमांक कोमल शिंदे यांनी मि ळवला. वेशभूषा स्पर्धेमध्ये कुमारी मुलींचा गट यामध्ये प्रथम प्रांजली साठे, द्वितीय भक्ती उरणे, तृतीय अभिरुची वाडकर यांनी मिळवला. यामध्ये उत्तेजनार्थ विजेते म्हणून आरती घाडगे, आदिती पवार, शुभ्रा माने, संस्कृती शहा, आराध्या घाडगे यांनाही बक्षिसे देण्यात आली. विवाहित महिला या गटांमध्ये महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यामध्ये प्रथम विशाखा अवघडे, द्वितीय अपर्गा पौडवाल व तृतीय क्रमांक सुनंदा सुतार यांनी पटकाविला. बकेट बॉल गेम या स्पर्धेमध्ये ललिका मोरे प्रथम, वैष्णवी पिसे द्वितीय व कोमल चव्हाण तृतीय पटकावला. उखाणे स्पर्धेमध्ये प्रथम राणी गाडे तर द्वितीय वैशाली मेहेर, तृतीय क्रमांक पूनम बाळापुरे मिळवला. फनी गेम स्पर्धेमध्ये चार महिलांचा एक गट असे अनेक गट सहभागी झाले होते. यामध्ये विजेत्या गटातील महिला सोनाली साठे, माधुरी सावंत, शहनाज आतार, फिरदोश आतार यांनी फनी गेमचे बक्षीस पटकावले. सदरचा कार्यक्रम महादेव देवस्थान देवालय ट्रस्टचे अध्यक्ष अमृतराज माने-देशमुख व विश्वस्त पांडुरंगराव माने-देशमुख यांच्या आयोजनाखाली पार पडला. परीक्षक म्हणून शशिकांत तेरखेडकर , हरिभाऊ माने, सुनंदा माने, संध्या माळी यांनी काम पाहिले. स्पर्धेतील विजेत्या महिलांना घरगुती उपयोगी वस्तू व प्रशस्तीपत्र देण्यात आले तर प्रथम क्रमांकाच्या महिलांना पैठणी साडी बक्षिस म्हणून देण्यात आली.



## जिल्हा ग्राहक भांडारच्या उपाध्यक्षपदी रमेश बसाटे बिनविरोध

**सोलापूर,दि.४ ऑगस्ट-**

येथील सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी घाऊक व किरकोळ ग्राहक भांडार संस्थेच्या सन २०२५-२६ व २०२७ -२०२८ करीता व्हा. चेअरमन म्हणून दै. तरूण भारतचे माजी उपसंपादक रमेश बसाटे यांची अविरोध निवड झाली. यावेळी निवडणुक निर्णय अधिकारी एस. एस. जुजगार, संस्थेचे चेअरमन सिध्दाराम जोडभावी, संचालक प्रभाकर हंजगे, अ‍ॅड आर. एस. पाटील, शिवाजी कांबळे, संगण्णा वाघमारे, विलास वाघोले, बसवराज वळसंगे, संचालिका भारती कटारे, राजश्री बरबडे व सरव्यवस्थापक श्री. माणिकशेट्टी, खरेदी अधिकारी नागेश हिंगमीरे, हिशोबनीस मन्मथ परशेट्टी आदी उपस्थीत होते. श्री. बसाटे यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## महत्वाचे...



### प्रत्येक संकटाला आव्हान म्हणून स्वीकारा महादेव घोंगडे; फॅबटेकमध्ये व्याख्यान

**सांगोला, दि.४ ऑगस्ट -**

जीवनात प्रामाणिक कष्टाद्वारे पैसा सन्मानाने मिळवा, आई वडीलांशी मन मोकळेपणाने बोला. आयुष्यातील प्रत्येक संकटाला आव्हान म्हणून स्विकारावे असे मत महादेव घोंगडे यांनी व्यक्त केले. येथील फॅबटेक पब्लिक स्कूल अँड ज्यु.कॉलेजमध्ये आयोजित व्याख्यान कार्यक्रमात ते बोलत होते. ग्रामीण जीवन शैली, वास्तव जीवन आणि भविष्यातील करिअर या बद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागृता व्हावी यासाठी प्राचार्य सिकंदर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता ४ ते १० वी मधील विद्यार्थ्यांसाठी या व्याखानाचे आयोजन केले होते. निसार इनामदार यांनी सूत्रसंचालन केले. स्कूलच्या सीईओ सारिका रूपनर, सुपरवायझर वनिता बाबर तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



### सांगोल्यात वीरशैव लिंगायत समाजाच्यावतीने प्रसाद वाटप

**सांगोला, दि.४ ऑगस्ट -**

श्रावण मासानिमित्त दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी दुसऱ्या श्रावण सोम वार निमित्त केळी व राजगिरा लाडू महादेव मंदिर, महादेव गल्ली, सांगोला येथे महाराष्ट्र वीरशैव सभा व महात्मा बसवेश्वर युवक संघटनेच्या वतीने वाटप करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र सभेचे सांगोला तालुका अध्यक्ष महेश गुळमिरे, महात्मा बसवेश्वर युवक संघटनेचे अध्यक्ष संदेश पलसे, सचिव प्रतीक कळशे, कार्याध्यक्ष वैभव गवळी, संजय कोठावळे, काशिनाथ ढोले, संतोष महिमकर, देवराज लोखंडे, सिताराम महिमकर, ओंकार उकळे, सुरज चांदणे, ऋषिकेश लोखंडे, शिवतेज पाटणे उपस्थित होते.

### आजाराला कंटाळून वृद्धाची आत्महत्या

**सोलापूर, दि.४ ऑगस्ट-**

आजाराला कंटाळून वृद्धाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. सॅमसन शामराव केदार (वय ५७, रा. हरिभाई देवकर प्रशालेच्या पाठीमागे) असे त्या मृत रुग्णाचे नाव आहे. मृत सॅमसन हे मागील काही दिवसांपासून आजारी होते. त्यांच्यावर उपचार सुरू होते. सोमवारी सकाळी सॅमसनचे नातेवाईक जीवन हे उपचारासाठी त्यांना नेण्यासाठी त्यांच्या घरी आले. त्यावेळी ही घटना उघडकीस आली. य जीवन यांनी पोलिसांना याबाबची माहिती दिली. सदर बाझार पोलिस ठाण्याचे हवालदार के. एम. राठोड यांनी नातेवाइकांच्या मदतीने त्यांना खाली उतरवून शासकीय रुग्णालयात दाखल केले. उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

### चक्कर येऊन पडल्याने तरुणी जखमी

**सोलापूर, दि.४ ऑगस्ट-**

दुचाकीवरून डबल सीट जाताना अचानक चक्कर येऊन पडल्याने म हिला जखमी झाली. हा प्रकार मोहोळ ते वडवळ या दरम्यान सोमवारी सकाळी नऊ वाजता घडला. श्रीदेवी गणेश व्हनमाने (वय २८, या. डोके वस्ती मोहोळ) असे तरुणीचे नाव आहे. सोमवारी सकाळी श्रीदेवी ही सकाळी नऊच्या सुमारास दुचाकीवर पाठीमागे बसून वडवळच्या दिशेने जात होते. दरम्यान चंद्रमौळी जवळ अचानक तिला चक्कर आली त्यामुळे ती चालत्या दुचाकीवरून खाली पडली. यात तिच्या डाव्या कानाला आणि उजव्या हाताला जखम झाली. तिच्यावर मोहोळ येथील सरकारी रुग्णालय उपचार करण्यात आले. त्यानंतर सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### टोलनाक्याजवळ तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि.४ ऑगस्ट-**

सोलापूर मंगळवेढा रस्त्यावरील देगाव येथील टोलनक्याजवळ तरुणाचा कोणतेतरी औषध प्राशन करून आत्महत्येच प्रयत्न केला. कौटुंबीक कारणातून हा प्रकार घडला असल्याची चर्चा आहे. कानीकेश भास्कर कांबळे (वय २७, रा. सांगोला सध्या या. समता नगर सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या तरुणाचे नाव आहे. कानीकेश हा सांगोला येथे राहतो. तो रविवारी विजापूर रोडवरील समता नगर येथे आला होता. तेथे कौटुंबिक कारणातून वाद झाला. यानंतर तो घरातून निघून गेला. त्याने देगाव रोडवरील टोलनाच्या जवळ कोणते तरी औषध राशन केले. त्यामध्ये त्याला त्रास होऊ लागल्याने ऋषिकेश याने रात्री शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. उपचारानंतर त्याला घरी सोडण्यात आल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### दुचाकी वाहनाच्या धडकेत वृद्ध जखमी

**सोलापूर, दि.४ ऑगस्ट-**

पोलीस मुख्यालय परिसरातील रस्त्यावर पेट्रोल पंपा जवळ दुचाकीच्या धडकेत वृद्ध जखमी झाला. इब्राहिम मो मुजावर ( वय ६५, या. तेलंगी पाचा पेठ सोलापूर) असे मोटरसायकलच्या धडकेत जखमी झालेल्या वृद्धाचे नाव आहे. इब्राहिम हे सोमवारी दुपारी अशोक चौकीतून राहत्या घराकडे जात होते. दरम्यान पोलीस मुख्यालय येथील पेट्रोल पंप येथै आल्यानंतर त्यांना पाठीमागून दुचाकी स्वाराने धडक दिली. तसेच सर्वांगास मुक्कामार लागल्याने रुग्णालयात उपचारात दाखल करण्यात आल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

# ‘जल जीवन मिशन’च्या ठेकेदारांना ७६ लाखांचा दंड

**४१ लाख रूपये वसूल; प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ ऑगस्ट-**

ग्रामीण भागात मागील तीन वर्षापासून जल जीवन मिशन योजनेच्या माध्यमातून हर घर जल योजना राबविण्यात येत आहे. ठेकेदारांना या योजनेतून मंजूर करण्यात आलेली कामे सुरु न झाल्याने व निकृष्ट दर्जाची कामे केल्याने सुमारे ९० ठेकेदारांना जिल्हा परिषदेने ७६ लाख रुपयांचा दंड केला असून, त्यातील ४१ लाख रुपये वसूलही करण्यात आल्याची माहिती प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.




जिल्ह्यात जल जीवन मिशनची सुमारे २ हजार कोटी रुपयांची कामे मागील तीन वर्षापासून सुरू आहेत. काही ठिकाणी कामे सुरु झाली नाहीत, काही ठिकाणी जागेची अडचण आहे, तर काही ठिकाणी निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचे दिसून आल्याने ठेकेदारांना दंड करण्यात आला आहे. काही ठिकाणी जमिनीत पाईप टाकताना अपेक्षित खोलीकरण केले नसल्याचे समोर आले आहे. जागा उपलब्ध करून देऊनही कामे पूर्ण करण्यास विलंब केल्याच्या कारणावरून ठेकेदारांना दंड आकारण्यात आला असल्याचे जंगम यांनी पत्रकारांना सांगितले. सध्या चालू असलेल्या जलजीवन मिशनच्या कामांची मुदत डिसेंबर २०२६ पर्यंत आहे. जीएसटीत झालेल्या बदलांमुळे २०६ कामांचे सुधारित प्रस्ताव तयार करण्यात आले आहे. त्यासाठी वाढीव १०० कोटी रुपये निधी लागणार आहे. तशी मागणी शासनाकडे करण्यात आल्याचेही जंगम यांनी सांगितले. जल जीवन मिशन योजनेतंर्गत पूर्ण झालेल्या कामांची बिले मिळावी, यासाठी ७० कोटी रुपयांचा निधी शासनाकडे मागणी करण्यात आला आहे. हा निधी प्राप्त झाल्यानंतर ठेकेदारांना बीले देण्याची कार्यवाही सुरु करण्यात येणार आहे. जलजीवन मिशनच्या माध्यमातून तीन वर्षात एकूण १ हजार ३२९ कामांना मंजुरी मिळाली आहे. त्यातील ४०० कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरीत कामांना गती देण्यात येत आहे. ३२० ठिकाणी नळजोडणीचे काम असून, यातील २०० कामेही पुर्ण झाली असल्याचे जंगम यांनी सांगितले.

**‘त्या’ वनखात्याच्या जमिनीस पर्यायी जमिन शासन देणार**

बोरामणी येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळावर नाईट लॅडिंगची सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच आवश्यक माहिती घेतली आहे. बोरामणी विमानतळावरील ३२ हेक्टर वनखात्याच्या जमिनीचे संपादन करुन त्याऐवजी वनखात्यास पर्यायी जमिन देण्याचे प्रयत्न सुरु असल्याचे जंगम यांनी यावेळी सांगितले.

# डंपरच्या धडकेने मांडवे-गिरवी पूल तुटला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ ऑगस्ट-**

मांडवे-गिरवी दरम्यान असलेल्या नीरा उजवा कालव्याच्या पुलाची संरक्षण भिंत अवैध वाहतूक करणाऱ्या डंपरच्या धडकेत कोसळली. त्यामुळे नातेपुतेवरून भांबला जाणारी एसटी बस बंद झाली. परिणामी ज्येष्ठ नागरिक, महिला, शेतकऱ्यांचे हाल झाले. शिवाय भांब, गिरवीवरून मांडवे, नातेपुते येथील शाळांना येणाऱ्या ७० विद्यार्थ्यांची शाळा बुडून त्यांचे शैक्षणिक नुकसान झाले.



अवैध मुरुमाचा वाहतूक करणारा टिपर या पुलाच्या संरक्षण भिंतीला धडकल्यामुळे या पुलाची संरक्षण भिंत कोसळली. भांब परिसरातील गावांतून लोक दवाखाना, खरेदी, बाजारासाठी जातात. त्या लोकांची मोठी अडचण होत आहे. रुग्णांचीही तारांबळ होत आहे. गिरवी ग्राम पंचायतीने खचलेल्या पुलाबाबत ठराव मंजूर केला. त्या ठरावाची प्रत संबंधितांना दिली. भांब-गिरवीवरून मांडवे, नातेपुते येथील शाळेत शिकण्यासाठी जाणारे जवळपास ६०-७० विद्यार्थी असून, या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. प्रथम घटक चाचणी परीक्षा चालू होत असून, विद्यार्थ्यांना त्याचा मोठा फटका बसणार आहे.

# आ. पाटील यांना ९ हजार ७९९ वह्यांची भेट

**नाना-भैय्या युवा मंचाचा उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.४ ऑगस्ट-**

माढा विधानसभेचे आमदार अभिजीत पाटील यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त रावसाहेब देशमुख व राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस (श.प.) पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख यांच्या संकल्पनेतून नाना-भैय्या युवा मंचाच्या वतीने ९ हजार ७९९ वह्यांची भेट देण्यात आली.

आ. पाटील यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी येत असताना हार, फुले, पुष्पगुच्छ न आणता एक सामाजिक जाणिवेतून गरजू विद्यार्थ्यांसाठी वही, पेन, कंपास व शालेय साहित्य आणावे. आपली ही मदत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ देणारी ठरेल असे आवाहन केल्यानंतर तालुक्याचे नेते रावसाहेब देशमुख व राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस (श.प) जिल्हाध्यक्ष देशमुख यांच्या संकल्पनेतून पंढरपूर येथे जाऊन आ. पाटील यांना नाना-भैय्या युवा मंचाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी ९ हजार ७९९ इतक्या वह्याची अनोखी भेट दिली. या वह्या आपण गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणार असून त्यांनी आपण केलेल्या वह्यास इतक्या मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिल्याबद्दल रावसाहेब देशमुख व सुरज देशमुख यांचे आभार मानले.



> माढा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्री.अभिजीत आबा पाटील यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त हारतुरे न आणता वह्या व शालेय साहित्य आणण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार सर्व सहकाऱ्यांसह चर्चा करून त्यांच्या आवाहनास ९७९९ इतक्या वह्या आम्ही देत आहोत. या वह्या गरजू विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल करण्यासाठी उपयोगी ठरणार आहेत.
>
> **-सुरज देशमुख, जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस (शरदचंद्र पवार)**



**श्रावण सोमवारनिमित्ताने बार्शीच्या उत्तरेश्वर मंदिरातील प्रसन्न पूजा...**

बार्शी : सौम्य महाकाल मिष्ठान्न महापूजा, गुप्त गोदावरीसह पूजा व रोषणाई करण्यात आली त्याचे छायाचित्र. (छाया - अरुण बळप, बार्शी)



# लोकमंगलमध्ये कृषी यांत्रिकीकरण प्रात्यक्षिक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ ऑगस्ट-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी म हाविद्यालय वडाळा येथे दिनांक ४ ऑगस्ट रोजी कृषी यांत्रिकीकरणा अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी बहुउपयोगी पावर विडर आणि इंजिनचलित कोळपणी यंत्र इत्यादीचे प्रात्यक्षिक महाविद्यालयाच्या प्रांगणात दाखविण्यात आले.

`वाढती मजूर टंचाई आणि निसर्गाचा लहरीपणा यामुळे शेतातील कामे वेळेवर आणि कमी खर्चात करण्यासाठी कृषी यांत्रिकीकरण अत्यंत आवश्यक आहे. कृषी महाविद्यालयात विद्यार्थ्यांना यांत्रिकीकरणाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी पावर विडर यंत्र उपलब्ध झाले असून त्याचे औपचारिक पूजन श्री. अमित जमदाडे यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी गणेश मशिनरी, पंढरपूर येथील होंडा पावर विडर कंपनीचे वितरक श्री. गणेश तोंडले यांनी पावर विडर व कोळपणी यंत्र याची प्रात्यक्षिकासह माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांनी देखील यंत्राबाबतची सर्व माहिती प्रश्नोत्तराच्या माध्यमातून जाणून घेतली आणि कार्यपद्धती प्रात्यक्षिकातून समजून घेतली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे, कृषी अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. सुजाता चौगुले, प्रा. नम्रता गोरे, प्रा. संजय सिरसट, प्रा. अंश आडे, प्रा. अभिजीत नारायणकर, डॉ. शिवकुमार वरारकर, प्रा. अनिकेत घोडके, प्रा. ओंकार पाटील, श्री.साळुंखे आणि प्रथम व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांची उल्लेखनीय उपस्थिती होती.

# महामार्गावर अपघातांची शक्यता; सर्व्हिस रोडवर धोकादायक भेग



**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.४ ऑगस्ट-**

सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गाच्या साईडपट्ट्यालगत मोडनिंब येथून अरण, वरवडे, आहेरगाव, अकुंभे ते टेंभूर्णी गावापर्यंत मोठमोठे खड्डे पडले असून वाहनचालकांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. त्याप्रमाणे सर्व्हिस रोडवर वरवडे टोलनाक्याच्या एक किलोमीटर अंतरावर मोठी साधारण चार इंचाची आडवी तर २५ ते ३० फूट उभी मोठी भेग पडली आहे. याबाबत वरवडे टोल नाका कंपनी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे.

कुठे रस्ता अपूर्ण तर कुठे सोलापूरला गेलेल्या समांतर जालवाहिनीच्या कामामुळे सर्व्हिस रोडच्या साईडपट्ट्याच गायब झाल्या आहेत. त्यामुळे सर्व्हिस रोडने जाणाऱ्या वाहनधारकांना अंदाज येत नाही व त्यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. त्याचबरोलवर रस्त्याच्या साईडच्या बाजूस मोठ-म ोठे खड्डे तयार झाले आहेत. त्यामुळे दुचाकीस्वार घसरून पडत आहेत. साईडपट्ट्या दुरुस्त करण्यात याव्यात तसेच रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात यावेत अशी मागणी वाहनचालकांतून होत आहे.

काही ठिकाणी हा रस्ता खचू लागला आहे. ही बाब स्थानिकांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणच्या निदर्शनास आणून दिली. मात्र कोणतीही कार्यवाही झाली नाही.सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या सम ांतर जलवाहिनीचे मोडनिंब बसस्थानक परिसरातील काम पूर्ण झाले आहे. जलवाहिनीच्या काम ासाठी बसस्थानक कार्यालयाच्या समोरून खोदाई करण्यात आली होती. तेही काम सर्व्हिस रोडला चिटकून आहे. खोदाई कामातून निघालेल्या मातीमूळे वाहतूक नियंत्रक कक्ष कार्यालयासमोर चिखल पसरल्यामुळे तेथील निसरडी जागा तयार झाली आहे. यामूळे बस चालक, वाहकांसह प्रवाशी त्रस्त झाले आहेत. तरीही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण याकडे डोळेझाक करीत आहे.

वरवडे टोलनाक्याच्या माध्यम ातून दररोज लाखो रुपयांची वाहनचालकांकडून टोल वसुली होते. प्रत्यक्षात मात्र त्या वाहनचालकांना रस्त्यांवरचे, साईड पट्ट्यालगतचे खड्डे यातून धोकादायकरित्या मार्ग काढण्याची वेळ आली आहे. रस्त्याच्या साईड पट्ट्यालगत आधार म्हणून लावण्यात येत असलेला मुरूम न लावल्यामुळे पावसाळ्यात त्याठिकाणचे खड्डे झाले असून रात्री अंधारात दुचाकी वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नसल्यामुळे अपघातांच्या प्रमाणात वाढ होण्याची होत आहे.

> सोलापूर महानगरपालिकेसाठी गेलेल्या पाईपलाईनच्या कामात त्यांनी माती वरच्यावर टाकून गेले आहेत. तो रोड दुरुस्त आम्ही करणार नाही. ते काम सोलापूर महानगरपालिकेचे आहे. आम्ही सोलापूर महानगरपालिकेकडे त्याबाबत बोललो आहे.
>
> **- व्यंकट रेड्डी,** मेंटेनन्स मॅनेजर, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण